म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय नाटक
दा. क्र. २९३६०
IRBK-0121360

२९३६०
६।५।८६

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. २९३६० नों. दि. ६।५।८६
वि. नाटक क्र.

# प्रयोगक्षम निवडक एकांकिका

संपादक

डॉ. वि. भा. देशपांडे

IRBK-0121360

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

या संग्रहातील एकांकिकांच्या प्रयोगासाठी
संबंधित लेखकांशी पत्रव्यवहार करून, आधी परवानगी घेणे आवश्यक आहे.

---

© ज्या त्या एकांकिकेचे सर्व हक्क त्या त्या लेखकाच्या स्वाधीन आहेत.

---

**प्रकाशक**
अनिलकुमार मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
'धनश्री' अपार्टमेंट्स
१२१६ सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०

**मुद्रक**
ज. ता. गायकवाड
मायबोली प्रिंटर्स
४०५/९ नारायण पेठ
पुणे – ४११०३०

**मुखपृष्ठ**
रविमुकुल, पुणे

**प्रथमावृत्ती**
बलिप्रतिपदा
दि. १३ नोव्हेंबर १९८५

---

**मूल्य**
**तीस रुपये**

# प्रास्ताविक

गेल्या काही वर्षांत एकांकिका-लेखन आणि प्रयोग आणि स्पर्धा घेण्याचे प्रमाण वाढते आहे. महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या शहरांमधल्या भिन्न भिन्न संस्था अशा स्पर्धांचे आयोजन करीत आहेत. ह्या स्पर्धांमध्ये आपण सहभागी व्हावे असे अनेक होतकरू कलाकारांना वाटते. काही वेळेला तर प्रस्थापित संस्था आणि बिनीचे कलाकारही स्पर्धेत सहभागी होताना दिसतात. ह्या स्पर्धांची गरज भागविणाऱ्या नाट्यसंहिता मोठ्या प्रमाणात निर्माणही होतात. पण त्यांतल्या अनेक नाट्यसंहिता त्या त्या स्पर्धांच्या बरोबर संपुष्टात येतात. कारण एकांकिका संहितांना नियतकालिकांतून प्रसिद्धी मोठ्या प्रमाणात मिळतेच असे नाही. मिळाली तरी त्यांना संग्रहरूपाने प्रकाशित होण्याचे भाग्य लाभतेच असे नाही. म्हणून निरनिराळ्या स्पर्धांमधून किंवा एरवीही प्रयोगाच्या दृष्टीने ज्या एकांकिका महत्त्वाच्या वाटल्या त्यांतल्या काहींना संग्रहामध्ये समाविष्ट करावे आणि ज्यांना त्यांचे प्रयोग करावयाचे असतील त्यांना ती उपलब्धी करून द्यावी म्हणून संपादनाचा हा प्रपंच मांडायचे निश्चित केले.

सध्या एकांकिकांचे लेखन इतक्या विपुल प्रमाणात होते आहे की, त्यातून 'काहीं'ची निवड करायची हे अवघड काम आहे. कारण निरनिराळ्या वयोगटातील किंवा सामाजिक स्तरांतील लेखक एकांकिका-लेखन करताना आढळतात. यांतील बहुसंख्य लेखकांना रंगभूमी या माध्यमाचे भान आपापल्या ताकदीनुसार असतेच. आपली एकांकिका केवळ साहित्यमूल्याच्या कसोटीवर उत्तम असून चालणार नाही, तर तिला प्रयोगमूल्य किंवा रंगमूल्य तितक्याच प्रमाणात हवे याची जाण उत्तरोत्तर वाढते आहे. ही वाढती जाण सुलक्षणी आहे.

संग्रहासाठी निवड करताना वेगवेगळे निकष वापरता येतात अथवा वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून त्याकडे पाहता येते. विशिष्ट वर्षातील एकांकिका-लेखन डोळ्यांसमोर ठेवून ही निवड करणे शक्य आहे. तसे प्रयत्नही झाले आहेत. पण त्यातली काल-मर्यादा जशी काही वेळेला सोयीची वाटते तशीच ती अडचणीचीही वाटते. म्हणून विशिष्ट काळातील किंवा सालातील एकांकिका न निवडता गेल्या दोन-चार वर्षांतील ज्या एकांकिका प्रयोगाच्या संदर्भात महत्त्वाच्या वाटल्या त्यांची निवड झाली. विषय, आशय आणि ते व्यक्त करण्याची पद्धती यांचाही विचार निवडीमागे निश्चितच आहे. 'गाहान' एकांकिकेत प्रेमानंद गज्वींनी दलित जीवनाच्या अनुभवाला नाट्यरूप दिले आहे. तसेच सुभाष सोनवणे 'विछिन्न'मध्ये आणखी एक दलित – ग्रामीण जीवनातला वेगळा अनुभव आपल्या एकांकिकेतून व्यक्त करतात. या दोघांच्या लेखनाला सामाजिक संदर्भ जरूर आहे, पण केवळ तेवढेच वैशिष्ट्य नाही, तर त्या संदर्भांना नाट्यरूप देऊन परिणामकारी करण्याची ताकद आहे. असाच एक सामाजिक स्तरावरचा आजचा असणारा शहरी जीवनातील विदारक अनुभव प्रकाश बुद्धिसागर यांनी 'सुनीला पारनामे शाळेत चालली होती' यामध्ये मांडला आहे. मूळची कथा

रत्नाकर मतकरींची आहे. सुनिला पारनामेच्या आयुष्यातील काही प्रश्नांमुळे आपणही अंतर्मुख होऊन काही गोष्टींचा गांभीर्याने विचार करू लागतो. 'एक सुन्न म्हातारा' ही एकांकिका राजकीय आशय घेऊन येते आणि कोणत्याही लोकशाही राष्ट्रातील काही मूलभूत प्रश्नांमधले नाट्य आपल्या समोर उभे करते. शफाअत खानची 'क' ही नावापासूनच एक कुतूहल चाळवते. 'क' हा कंटाळ्यातला आहे. हा कंटाळ्याचा अनुभव प्रयोगकर्त्यांना आवाहन करणारा आहे. राजीव कुलकर्णींची 'सन दोन हजार एक' ही प्रतीकात्मक उपरोधिक रूप घेऊन भविष्यातील एका भयाण प्रश्नाविषयी सांगणारी एकांकिका आहे. अतुल पेठेच्या 'चेस' मध्ये मानसशास्त्रीय पातळीवर एका व्यक्तिमत्त्वाचा शोध आहे.

असे अनेक पद्धतींचे अनुभव घेऊन येणाऱ्या एकांकिका प्रयोगमूल्यांच्या संदर्भात तितक्याच महत्त्वाच्या आहेत. ज्यांना स्पर्धेत किंवा अन्य वेळी वेगवेगळ्या पद्धतीच्या एकांकिका प्रयोगरूपाने करून पाहायच्या आहेत, त्यांना उपयोगी पडाव्यात अशाच हिशेबाने एकांकिका निवडीचा प्रयत्न आहे. यामध्ये प्रेमानंद गज्वी, सुभाष सोनवणे, प्रकाश बुद्धिसागर, राजीव जोशी आणि शफाअत खान ही नावे एकांकिका करणाऱ्या कलाकारांना परिचित आहेत. राजीव कुलकर्णी आणि अतुल पेठे हे दोघेही अलिकडच्या काही काळात एकांकिका-लेखन करणारे आहेत. ह्या सर्वांच्या लेखनाला प्रयोगरूप लाभले आहे. कधी लेखन तर कधी प्रयोग असे निरनिराळ्या स्तरांवर त्यांचे स्वागत कलाकार, प्रेक्षक आणि परीक्षक यांनी वेळोवेळी केलेले आहे. अशा गुणी एकांकिका-लेखकांच्या लेखनाचा गुच्छ नाट्यरसिकांना देताना आनंद होत आहे.

हा आनंद होण्यास जसा आमच्या लेखकमित्रांचा सहकार्याचा भाग महत्त्वाचा आहे, तसाच मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता यांचा वाटा मोलाचा आहे. त्यांनी संपादनाची संधी दिली म्हणून या एकांकिकांचे एकत्रित प्रकाशन करणे सुलभ झाले. पुन्हा एकदा सर्वांचे आभार.

पुणे,
बलिप्रतिपदा, १३ नोव्हेंबर १९८५

**वि. भा. देशपांडे**

---

## अनुक्रम

**गाहाण** / प्रेमानंद गज्वी / १ ● **विच्छिन्न** / सुभाष सोनवणे / १५ ● **सुनीला पारनामे शाळेत चालली होती** / प्रकाश बुद्धिसागर / ३० ● **क** / शफाअत खान / ४२ ● **सन दोन हजार एक** / राजीव कुलकर्णी / ६३ ● **एक सुन्न म्हातारा** / राजीव जोशी / ८७ ● **चेस** / अतुल पेठे / ९७.

# लेखक-परिचय

## प्रेमानंद गज्वी

जन्म : १५ जून १९४७.
कारगाव, ता. उमरेड, जि. नागपूर ( विदर्भ ).
बी. पी. टी. मुंबई येथे नोकरी.
शिक्षण : इंटरपर्यंत.
लेखनारंभ : १९७० पासून.
सुमारे ६० कथा विविध मासिकांमधून प्रसिद्ध.
काही कविताही प्रसिद्ध.

| | | |
|---|---|---|
| पुस्तके ( प्रकाशित ) : | ' घोटभर पाणी ' | ( एकांकिका संग्रह ) |
| | ' बेरीज वजाबाकी ' | ,, |
| | ' देवनवरी ' | नाटक |
| | ' वांझ माती ' | ,, |
| | ' लागण ' | गूढकथासंग्रह |
| | ' जागर ' | कादंबरी |
| अप्रकाशित : | ' किरवंत ' | नाटक |
| | ' तुमचं तुमीच ' | नाटक |
| लेखनाधीन : | ' पांढरा बुधवार ' | नाटक |
| | ' जय जय रघुवीर समर्थ ! ' | नाटक |

सर्व एकांकिकांना सर्वोत्कृष्ट लेखनाची परितोषिके प्राप्त.

' किरवंत ' नाटकास लेखनाचे, महाराष्ट्र राज्य नाट्य-स्पर्धेत दुसरे, तसेच चिंतामणराव कोल्हटकर नाट्य-स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले. ( सन १९८१–८२ ).

' देवनवरी ' सर्वोत्कृष्ट एकांकिका १९८० मध्ये समाविष्ट.

' घोटभर पाणी ' दलित रंगभूमी ( मराठीत ) व दलित रंगमंच ( हिंदी ) करिता निवड.

याशिवाय हिंदी, गुजराती, मल्याळम्‌मध्ये ' घोटभर पाणी ' विशेष गाजली.

प्रयोगासाठी संपर्क :
प्रेमानंद गज्वी
१९६/७६९० कल्पना-विहार,
कन्नमवारनगर एक
विक्रोळी, मुंबई ४०००८३.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय ठाणे.
दा. क्र. 29380 नों. दि 61.5.14
वि. नाटक क्र. ..........

# गाहान

## प्रेमानंद गज्वी

( मन्या आणि किसन्या 'जिकना–जिकनीचा' खेळ खेळत आहेत. त्यांचा हा खेळ मन्शा पहात असतो. दोघांनाही डाव जिंकण्यास मदत करतो. त्याच्या मदतीमुळं डाव हरणारा त्याच्यावर वैतागतो वगैरे. ( या खेळात जमिनीत तळहाताएवढया आकाराचे दोन खड्डे केले जातात. कोणत्याही एका खड्डयात सीताफळाच्या बिया गुपचूप ठेवून वर माती लोटली जाते. बिया मिळाल्या की, हरणाऱ्याने जिंकणाऱ्यास दुप्पट बिया द्यायच्या असतात. ) दूरवर शाळेची घंटा वाजते. अंगात मळकट जीर्ण शर्ट-पॅंट घातलेला, हातात पाटी-पुस्तक असलेला वाशा येतो. त्यांचा खेळ पहात रंगाळतो. )

**किसन्या :** वाशा खेल्तो का ?

**मन्या :** बिया नस्तीन नं त म्या देतो.

**वाशा :** नगं. तुमचा ह्यो खेळ न्हाय आवडत मला. हातपाय भरत्यात मातीनं. मन्शा, चल आपुन इटीदांडू खेळू.

**मन्शा :** माज्याकडं न्हाय बा काई.

**वाशा :** माज्याकडं हाय. ( विटी खिशातून काढतो ) चल.

**मन्शा :** पर खेळाचं कशानं ?

**वाशा :** ती तिकडं काठी हाय बग पडल्य'ली. आन जा. ( मन्शा धावत जाऊन ती काठी घेऊन येतो. दोघंही खेळायला सुरुवात करणार इतक्यात मन्या व किसन्या पुढं येतात. )

**किसन्या :** आमाला बी घ्या की खेळू. गडी गडी खेळू.

**वाशा :** तुमी दोघं. मी नं मन्शा. हं. ( त्यांचा खेळ सुरू होतो. मध्येच डावावरून भांडण होतं. मिटतं. पुन्हा खेळात रंगतात. डाव वाशानं जिंकलेला आहे. विटी ते खोदण असं अंतर मोजलं जातं. त्यावरून हमरीतुमरी होते. मग वाशा खोदण ते विटी असं अंतर मोजू लागतो. तो मोजत असताना मालक आणि मुकादम येतात. त्यांना पाहून बाकीचे पळून जातात. वाशा अंतर मोजत विटीजवळ येतो. विटीऐवजी त्याला दिसतो मालकाचा पाय. )

मालक : नाव काय रं तुजं ?
वाशा : वाश्या.
मालक : कोनाचा तू ? नाव काय तुज्या बाचं ?
वाशा : गन्या.
मुकादम : ह्यांना वळखतो ?
वाशा : व्हय. मानूस हाय नव्हं ?
मुकादम : टपरीच्या सरड उत्तर दे.
मालक : गन्या म्हन्लं नव्हं तुज्या बाचं नाव ?
वाशा : व्हय.
मालक : काय करतो रं ?
वाशा : इटीदांडू खेळतो.
मालक : माज्या बरूबर खेळनार ?
मुकादम : मालक !
मालक : तू गप. काय पोरा, तू माज्यासंगं खेळनार ?
वाशा : आपून काय कुना बी संगं खेळतो. खेळता आलं म्हंजी बस्स्.
मालक : पैजंवर ?
वाशा : पैजंवर.
मालक : काय लावनार ?
वाशा : ही हाय नव्हं माजी इटीदांडू ! पर तुमी काय लावनार ?
मालक : त्ये बगू मग. अदुगर पायाखालची ही इटी काढून दाखव. बगू तरी तुजी ताकत !
वाशा : ( जोर लावून काढतो ) पाह्यली का आमची ताकद !
मालक : कुनाच्या अन्नावर जगतो रं ?
वाशा : माज्या बाच्या.
मालक : कुटनं आन्तो तुजा बा ?
वाशा : घाम गाळितो.
मालक : कुनाकडं ?
वाशा : सांगितलं नव्हं मगा, मालकाकडं घाम गाळितो म्हून.
मुकादम : तू वळखतो मालकाला ?
वाशा : न्हाय बा. आप्ला काय संबंद ?
मालक : जा, घरला जा. मालकानं बोलवलं म्हून सांग तुज्या बाला.
( वाशा पाटी-पुस्तक उचलून पळत सुटतो. मालक व मुकादमही निघतात. अंधार...प्रकाश येतो तेव्हा गण्या मालकाच्या घरी पायरी-जवळ बसलेला दिसतो, मालक बाहेर येतो. )

**गण्या** : पायलागी मालक. (मालक लाथ हाणतो...मुकादम येतो.)

**मालक** : मालकानं तुला लाथ हानली ?

**गण्या** : व्हय मालक.

**मालक** : का हानली ?

**गण्या** : मला कसं कळनार देवा !

**मालक** : हानली म्हन्जी, कायतरी चुकलं आसंलच का न्हाय ?

**गण्या** : काय बी कळंना बगा.

**मालक** : माजा सांगावा कोनी सांगला ?

**गण्या** : माज्या पोरानं.

**मालक** : एक तरी मानूस आमच्या डोऱ्याला डोरा भिडवतो ?

**गण्या** : आसं कंदी झालं देवा !

**मालक** : पर आज आसं झालं. आज या नेमाचा भंग झाला. तुजा पोर... वाश्या आमच्या डोऱ्याला डोरा भिडवूनशान बोलला. नुस्ती मान वर केली तर मान मुरगळून टाकण्याची आमची परंपरा. पर त्यी बी राखण्याचा धीर झाला न्हाय. का, ठावं हाय ? आमाला मान्साची ताकत लय प्यारी. त्येंच्या ताकतीवर आमची भिस्त. गन्या, तुज्या पोराची ताकत आमी आजमावली. उद्यापास्नं त्येला आमच्याकडं पाठवून दे.

**गण्या** : आवं, पर त्यो साळंत जातो.

**मालक** : आता त्यो आमच्या शाळंत शिकंल. आमाला शबूद दिला हाय गण्या तू. जा. मागल्या दारी जा. काई भाकरतुकडा आसंल त घेऊन जा घरला. दे तुज्या पोराला. (गण्या हताशपणे जातो.) मुकादम ... आसूड.

**मुकादम** : जी मालक.

**मालक** : नवं जनावर...नवा आसूड.

**मुकादम** : व्हय मालक.

**मालक** : नवं जनावर उद्यापास्नं हितं येनार.

**मुकादम** : व्हय मालक.

**मालक** : जनावर कामाला जुंपायचं तर, त्येचं आंड ठेचून त्येच्या नाकात येसण घालाया पायजे.

**मुकादम** : व्हय मालक.

**मालक** : जनावर रमंतवरी त्येला शिकवाया पायजे.

**मुकादम** : व्हय मालक.

**मालक** : व्हय व्हय काय लावलंय भाडया ! जा. नवा आसूड तेलात बुडवून ठिव.

( मुकादम जातो. ) त्येचं रगतानं भ्येगा पडल्यालं आंग पाह्यचं हाय; रगतानं भ्येगा पडल्यालं आंग !

[ अंधार ... प्रकाश येतो. तेव्हा वाशा आपल्या झोपडीच्या अंगणात पुस्तक वाचत असताना दिसतो. ]

**वाशा** : " माणसाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून दिली की, तो बंड करून उठतो. " ( पण पाठांतर होत नाही. पुस्तकात न पाहता तो पूर्वार्ध म्हणतो परंतु उत्तरार्ध " तो बंड करून उठतो. " हे विसरतो. त्याचं हे असं वाचन चाललेलं असताना गण्या घरी येतो. वाचनात मग्न असलेल्या वाशाला कौतुकानं डोळ्यात साठवून घेतो. बापाची चाहूल लागताच तो थांबतो. )

**गण्या** : वाच माज्या लेकरा, वाच. ( त्याच्याजवळ बसतो. )

**वाशा** : वाचितो बा, पर तुजा गळा का दाटून आला ? आन् ह्ये तुज्या डोऱ्यात पानी कसं ?

**गण्या** : आसंच. सुखाचं ! तू लिवतो वाचतो त्याचं ह्ये पानी. वाच बापा, वाच.

**वाशा** : तू का रडला त्ये सांग अदुगर.

**गण्या** : न्हाय रं, न्हाय रडलो ! तू वाच.

**वाशा** : न्हाय. तू रडला. समजतंया मला.

**गण्या** : तुला समजलं नव्हं म्या रडलो ? मंग वाच आता.

**वाशा** : पर का रडला ?

**गण्या** : काय करनार रं म्हाईत करून ? वाच म्हन्लं नं मी ? वाच... ( विराम ) तू वाचितो तवा बरं वाटतं जिवाला.

**वाशा** : न्हाय वाचनार मी.

**गण्या** : न्हाय वाचनार ?

**वाशा** : न्हाय.

**गण्या** : पर का म्हन्तो मी ? आरं, आसं करू नगंस. आजचा दिस वाचून घे. उद्यापास्नं तुजं वाचान बंद व्हनार.

**वाशा** : म्हन्जी ?

**गण्या** : तुला उद्यापास्नं त्या मालकाकडं जायाचं हाय.

**वाशा** : कशापायी ?

**गण्या** : कामाला लेकरा.

**वाशा** : आन् माजी श्याळा ?

**गण्या** : मोट्टा आला श्याळंवाला. अंगावर कर्ज ठिवूनशान शाळा सिकनार हायस तू ?

**वाशा** : कर्ज ? माज्यावर कर्ज ?

**वाशा** : कशापायी ?

**गण्या** : व्हय; मालकाचं कर्ज हाय तुज्यावर. त्ये फेडायचं हाय. म्या घेतलं व्हतं. ...चार वरसाचा व्हतास तू तवा.

(**दृश्यबदल...**)

माजं घर, तुजं घर
सारा अंधार अंधार !
बुजविल कोन कैसं
आभाळीचं हये खिंडार ॥ १ ॥
कैसा काढू चुली जाळ
काटयाकुटया जंगलात !
आग पडली पोटात
दानं समदं शेतात ॥ २ ॥

[ गाणं गात माणसं कामात मग्न झालेली आहेत. कुणी माती खोदतात. कुणी घमेल्यात भरून देतात. बायका माती बंधाऱ्यावर नेऊन टाकतात. मुकादम फेऱ्या घालत असतो. ]

**सारजा** : आवं ऐकता का ?...मी जरा बसू का ?...चालवंना बगा.

**गण्या** : पर त्यो राक्सस हाय नव्हं ? ( तोवर ती खाली बसते. ) ऊठ, ऊठ सारजे, त्यो येतोय हिकडं.

**सारजा** : आवं, उभंच ऱ्हावंना बगा. आवं माय, कळ आलीय पोटात ... जावून येतो झाडयाला.

**मुकादम** : चालू द्या, चालू द्या टपरीच्यानो. उठत जा, बसत जा. झाडयाला धावत जा. जा; जा. पळ, लुगडं भरशील.

**गण्या** : तरी म्या म्हन्लं व्हतं मुकादम, सारजीला बरं न्हाय. ऱ्हावू द्या घरी आजच्या दिस.

**मुकादम** : टपरीच्या, घमेलं भर. मला शिकव नगंस. ( पुढं जातो. ) काय लक्षा, लगीन ठरलं म्हनं तुजं ?

**लक्षा** : कवा तरी कराया पायजे.

**मुकादम** : लगीन कर, पर मुकादमाला इसरू नगंस अक्षदा द्याया. कसी हाय रं तुजी बाईल ?

**लक्षा** : हाय माज्यावानीच. मुकादम, आवं, त्या सारजाकाकीला बरं न्हाय. सारखी धावतीय झाडयाला. चालवंना बी तिच्यानं. जावू द्या की घरला.

**मुकादम** : गप रं, टपरीच्या. तुजं काम कर. लई माजून ऱ्हायले लेकानो तुमी. म्हनं जावू द्या घरला ! बंधारा बांधून झाला पायजे. चल चालव जोरात हात. ( सारजा परत कामात. एक माणूस घमेलं तिच्या डोक्यावर देतो.

कशीबशी ती घेऊन जाते. "माजं घर तुजं घर" चे सूर येऊ लागतात. मुकादमाच्या फेऱ्या चालूच आहेत. सारजाला पुन्हा भरलेलं घमेलं दिलं जातं. ओच घमेल्यासकट ती खाली कोसळते. एकच गलंका. बायामाणसं धावून येतात. )

**गण्या** : सारजे, ए सारजे, काय व्हतं एकाएकी ?... कसं वाटतं ?

**मुकादम** : आरं, काय नखरं चाललंय ?

**गण्या** : ए सारजे, डोळं उघड की. अं ? आं ! एकदम लुळी का पडली ? ( तिची मान हलवून पाहतो, सारं संपलेलं असतं. )
सारजेऽऽ अशी का गेली, एकाएकी. आपल्या बाश्याचं कसं व्हनार ? सारजे !
( गण्याचा अक्रोश. )

**सित्या** : गन्या, गप आता. व्हायाचं त्ये झालं.

**देव्या** : पर आसं मरन !

**राम्या** : चार मान्सं खाल्ली या बंधाऱ्यानं. ही पाचवी.

**लक्ष्या** : आरं, आपली जात अशीच मरनार गांडूळागत.

**सित्या** : आसं नुसतं बसून काही व्हनार का हाय ? आता ह्येची काई व्येवस्था तं कराया हवी.

**देव्या** : काय व्येवस्था करायची ! खड्डा खणून द्या टाकून. घारी-गिधाडापरीस ह्ये बरं !

**सित्या** : भलतंच काय बोलनं देव्या ! मेल्या जिवाचं रमदं व्येस व्हाया हवं. नवं चोळी-लुगडं तरी पायजे का न्हाय ?

**देव्या** : मंग इचार की गन्याला.

**सित्या** : गन्या, आरं बाबा, आता उरकाया हवं. का न्हायाचं ह्ये आसंच ?

**गण्या** : म्या काय न्हाय म्हन्लं ? पर सित्या, माजी सारजी...

**सित्या** : गप रं आता. किती पानी झारनार ... पैसापानी हाय नं ?

**गण्या** : ...

**लक्ष्या** : सित्याकाका, बघ कुनाकडं आसंल तं.

**सित्या** : तुज्याकडं हायीत ?

**लक्ष्या** : न्हाय बा. ( सित्या सगळ्यांना विचारतो. पण सगळेच नकारार्थी माना हलवतात. मालक यतो. )

**मालक** : काम टाकून कसला नाच बघत बसलाय भडव्यानो. ? ( सर्वजण 'पाय-लागी' करतात. ) आणि ही का पडली उताणी ?

**सित्या** : ही मेली मालक.

**मालक** : मेली ? मग बाजूला करा. नाहीतर बंधाऱ्यात द्या टाकून.

**सित्या** : आसं नगा करू मालक. मेल्या जिवाचं समदं ब्येस व्हाया व्हवं, रितसर.

**मालक** : अं ? हं...आरं व्हय की लेका सित्या, समदं बरूबर व्हाया हवं. आरं, मंग लागा की तयारीला.

**सित्या** : तयारीचा वांदा हाय मालक.

**मालक** : आन् तरीबी समदं ब्येस झालं पायजे, रितसर ! समदं बरूबर करनार, नं पैका बी न्हाय म्हननार, त कसं रं व्हनार ?

**सित्या** : तुमच्याकडं आसलं तं...

**मालक** : म्या पैका दिवू ? का ? म्या म्हन्तो, म्या का म्हून दिवू पैका ?

**सित्या** : आवं, आता अशा येळंला आमी कोनाच्या तोंडाकडं पाहावं ? तुम्हीच करता नव्हं समदं आमचं !

**मालक** : आरं व्हय की लेका सित्या. म्या इसरूनच गेलो बग. किती पैका लागंल ?

**सित्या** : लागतील पन्नासेक.

**मालक** : हे घे. पन्नास हायेत. पर सित्या, गाहानात काय ठिवनार ?

**सित्या** : म्...मी वो कसं ठिवनार ? बायकू मेली गन्याची न् म्या गाहान ठिवू ?

**मालक** : तुज्या घरचं नव्हं ना ! मंग तू का हात पसरतोस भडव्या ! ज्येचं काम त्येला पाठव.

**गण्या** : पायलागी मालक.

**मालक** : मुडदा झाला. त्यो हितंच ऱ्हानार का पडून ? न्हाय ना ? सित्या म्हन्तो मुड्याला पन्नास रुपये लागतील. देतो.

**गण्या** : तुमीच आमचं मायबाप.

**मालक** : आमचं कामच हाय हये. अडीअडचनीला धावावंच लागतं. अशा येळंला आमी न्हायी मदत करावी त कोनी करावी ? आमी तुला पैका देनार. देनारच ! पर तू आमच्याकडं गाहान म्हून काय रं ठिवनार ?

**गण्या** : म्या हाय नव्हं मालक ?

**मालक** : आरं, तू काय तुजा सौवताचा हायेस ? म्हनं म्या हाय ! आरं, तू त अदुगरच आमच्याकडं गाहान हायेस. गन्या, एकदा गाहानात ठेवलेल्या वस्तूवर आमी गाहान ठेवीत न्हाय. त्येला कोरं गाहान ठेवावं लागतं.

**गण्या** : नशीब उरलं मालक. दया करा.

**मालक** : दया करीत न्हाय म्हन्लं का म्या ? दया हायेच. पर गाहानाचं काय !

**गण्या** : हाय काय जवळ ? ना घर, ना दार, ना जिमिन, न जुमला.

**मालक** : जिमिन-जुमला आमी गाहानात ठिवत न्हाय गन्या.

**सित्या** : गन्या, आरं, म्या म्हन्तो, तुज्या पोराला का ठिवत न्हायीस ? आज

न्हाय त उद्या पोरगा मालकाकडंच न्हानार ना ? अशा परसंगाला पोरगं न्हायी कामी येनार त कोन ? पोराशिवाय मायबापाचं रीण कोन फेडनार ?

**गण्या** : वाश्याला गाहान ठिवू ? न्हाय, आसं न्हाय व्हनार माज्यानं. माज्यावानी त्येचं वाटूळं न्हाय व्हवू देनार. म्या त्येला शिकवनार ... म्या त्येला शिकवनार...

**सित्या** : गप का गन्या ? समदं रितसर व्हाया पायजे. न्हाय तर, सारजीचा आत्मा भटकत न्हायील भूत व्हवून. मालक, द्या की हर्येच्या पोराच्या नावावर. काय रं गन्या ?

**गण्या** : न्हाय सित्याबा, न्हाय. वाश्याला गाहानात न्हाय ठिवायचं. [ मालक जाऊ लागतो ] मालक, दया करा मालक. सारजे ऽ [ गण्याला हुंदका ] मालक, द्या माज्या पोराच्या नावावर. हं, ठिवतो म्या त्येला गाहान. ठिवतो गाहान. [ विराम ]

**मालक** : गन्या, आपून कोनाच्या मर्जीबिगर काय बी करत न्हाय. हये घे पैकं. पर गाहान बघितल्याबिगर...

**सित्या** : आवं मालक, त्ये काय बगायचं ? एकच पोर हाय त्येला. आन् आमी बी हावोतच की.

**मालक** : ठीक. बरं का गन्या, आजपास्नं तुजं पोर आमच्याकडं गाहान.
[ रंगमंच अंधारत जातो. " माजं घर, तुजं घर "चा कोरस ऐकू येत राहतो. दृश्य पूर्ववत... ]

**वाशा** : धा वरसं होवून गेलं, बा-माय मरून. एवढ्या दिसांत गाहान सोडवलं कसं न्हाय तू ?

**गण्या** : न्हाय सोडवलं लेकरा. आरं, हये गाहान न्हाय सोडवता येत. त्येनं म्हन्लं उठ...उठायचं. त्येनं म्हन्लं बस...बसायचं. आपल्या मनचं काय बी न्हाय करता येत. माज्या मनचं तुला काय सांगू पोरा ! खूब वाटायचं, तुला माज्यावानी या चरकात न्हाय अडकू द्यायचं. मनचं मनातच न्हायलं.

**वाशा** : म्या न्हाय जानार त्येच्याकडं.

**गण्या** : आसंच म्हन्लं व्हतं मी बी माज्या बाला. पर काय बी उपेग न्हाय झाला. आरं, तू न्हाय गेला त त्येची मान्सं वढत घेवून जानार. त्येंचा मार लई वाईट पोरा.

**वाशा** : मालकाकडं एवढं काम करतो. काय देतो रं मालक ?

**गण्या** : देतो पोरा, देतो. आपल्या पोटापान्याचं त्योच बघतो. दोन येळचं पोटात पडंल याची काळजी त्योच घेतो. ह्ये बंडी, ह्ये धोतर त्येनंच दिली.

**वाशा** : एवढंच ?

**गण्या** : दर वर्साला लाडवाचं जेवन देतो. समद्याची इचारपूस करतो. बाप्याला वर्साकाठी दोन धोतरं, दोन बंडया आन् इडिकाडिला धा-वीस रुपय देतो. बाईमान्साला दोन लुगडी; चोळी. आरं, समदं बगतो. आपून निस्तं काम करायचं... हये भाकरी !

**वाशा** : बा, खरं सांगू, तुला गुलामीची जानेवच न्हाय.

**गण्या** : पोटाच्या आगीत जळूनशान गेली पोरा जानेव. आपल्या मनचं काय बी व्हत न्हाय पोरा. आन् हितं काय म्या एकलाच हाय. समदी हायेत. माजं ऐक, तुज्या मनातलं टाकून दे. उगाच नास करूनशान घेशील अंगाचा. इथून पळता बी याचं न्हाय.

**वाशा** : म्या पळून न्हाय जानार बा. म्या शिकनार. [ वाचू लागतो. ] " माण-साला त्याच्या गुलामीची जाणीव... "

**गण्या** : न्हाय...तू शिकनार न्हाय. तू मालकाकडं जानार. बंद कर तुजं वाचन. बंद कर.

**वाशा** : न्हाय. बा, म्या शिकनार. (तोच गण्या त्याच्या हातातील ते पुस्तक खेचून काढून घेऊन फाडतो. )

**गण्या** : शिक आता. मोठं आलं शिकनारं. म्हनं शिकनार ! मालकाचं कर्ज टिवून शिकनार !

( हळूहळू अंधार. प्रकाश येतो तेव्हा गण्या वाशाला घेऊन मालकाच्या घरी येतो. )

**गण्या** : मालक...आवं मालऽक ( मालक बाहेर येतो ) पायलागी मालक. पाय-लागी म्हन पोरा.

**मालक** : असू दे. कसं म्हनायचं त्ये आमी शिकवू. आमची शाळा त्येला नवी हाय. जा तू...

**गण्या** : माजा शबूद पुरा केला मालक. तुमचं गाहान तुमच्या ताब्यात दिलं. म्या जातुय. पोरा, मालक सांगत्याल तसं वाग.

( गण्या जातो. )

**मालक** : वाश्या, इटीदांडूचा खेळ तुला लई आवडतो नव्हं ! आमाला बी लई आवडतो. इटी हाय ?

**वाशा** : हां, इटी हाय. ( खिशातून काढतो )

**मालक** : व्वा ! थांब हं. म्या आलोच. ( जातो )

**मुकादम** : ( येतो ) काय वाश्या, आलास म्हनायचं. पर आता हितं इटीचं रं काय काम ? ( मालक येतो. हातात आसूड. )

**मालक** : मुकादम, आमी आता इटीदांडूचा खेळ खेळनार.

**मुकादम** : मालक !

**मालक** : जा जोंधळ्याच्या पोत्याचं बग. ( मुकादम जातो. आसूड मालकाच्या हातात; पण फक्त आसूडाच्या काठीचं टोक तेवढं दिसतं. त्याचा उपयोग दांडू म्हणून करतो. (त्यांचा खेळ सुरू होणार तोच, मुकादम जोंधळ्यांचं पोतं ओढत ओढत आणतो.) वाश्या, ह्ये इटी आपून मंग खेळू. मुकादम, आण ती इटी हिकडं. ( वाशा बावरलेला. मुकादम पोतं पुढं करतो ) वाश्या उचल, उचलून दाखीव. आमच्या पायालालची इटी काढून दावली तसं. बगू तरी तुज्या अंगातली ताकद !

**वाशा** : मला कसं उचलता यील यवढं भरल्यालं पोतं ?

**मालक** : इटीदांडूचा खेळ आवडतो नव्हं ? खेळायचं नव्हं आपल्याला ? मंग अदुगर ह्ये पोतं उचलून दाखीव. ( वाशा तसा प्रयत्न करतो. पण ते हलतसुद्धा नाही. त्याचा तोल जाऊन तो पडतो. ) हात लेका! ऊठ, ऊठ; ऊठ. शाब्बास, मुकादम त्येला मदत कर. हो ओणवा हो. हं, ठेव त्याच्या पाठीवर. शाब्बास, चालून दाखीव, दहा पावलं. मंग खेळूच इटीदांडू.

**वाशा** : ह्येचा काय संबंध ?

**मालक** : संबंध हाय पोरा. लई मोठा संबंध हाय. ( खाडकन् वाशाच्या पायावर आसूड ओढतो. पोतं खाली पडतं ) उचल. पोतं उचल. ( मालक आसूड ओढत राहतो. वाशा किंचाळत राहतो. ) मुकादम, आजचा धडा हितंच संपला. गन्याला म्हनावं, पोराला घेवून जा घरला. जा पळ. ( मुकादम जातो. ) लोक म्हननारच, आमी विनाकाळजाचं. पर न्हाय. आमी विनाकाळजाचं न्हाय. आमाला काळीज हाय. म्हनूनच आमी वळखलं, ह्ये जनावर आमाला असं बधणार न्हाय. वारा प्यालेलं वासरू पुढं कसं निपजनार त्ये आमी त्येच्या खुराच्या ठेवनीवरनं वळखतो. आमी बरूबर वळखलं. आरं, कोन म्हन्तंय आमाला मन न्हाय. एवढंच हाय. आमच्या मनाला ह्यो इटीदांडूचा खेळ सोसवत न्हाय. आमाला एकच खेळ ठावं हाय...ह्या दांडूचा. हीच आमची ताकद हाय. मोठमोठी जनावरं सरड व्हत्यात या खेळानं. आमाला ती करावीच लागत्यात. ( गण्या येतो ) ये गन्या. सांभाळ त्येला. आज आमी त्येला पह्यला धडा दिला. ( मालक आत निघून जातो. गण्या पोराजवळ जाऊन कुरवाळतो )

**गण्या** : लई मारलं का पोरा ?

**वाशा** : न्हाय बा; न्हाय मारलं. साबासकी दिली ! बघ. ( पाठीवरचे वळ दाखवतो ) झालं नव्हं तुज्या मनाचं ? हेच पायजे व्हतं नं ? घे, पाहूनशान घे, भरून घे डोयात !

**गण्या** : सांगितल्यालं आयकलं आस्तं त हयी दशा नस्ती केली मालकानं.

**वाशा** : म्या तुजं आसं काय वाईट क्येलं व्हतं म्हून तू मला गाहानात घातलं ?

**गण्या** : सुखासुखी केलं का पोरा ! काय सांगू पोरा...

**वाशा** : कशापायी रडतूयास ? मेलो न्हाय !

**गण्या** : आसं बोलू नगंस पोरा. माजं तरी कोन हाय आता ? तूच आधार.

**वाशा** : डोस्कं फिरलं का बा तुजं ? म्या आधार हाय...पर मालकाचा. तुजा न्हाय.

**गण्या** : आरं, का सारखं सारखं टोचून बोलतुयास ?

**वाशा** : साजरं बोलावं असं काय साजरं केलं तू माजं ?

**गण्या** : बोल...बोलून घे पोरा. वकून टाक समदं... [ विराम ] चल आता.

**वाशा** : कुटं ?

**गण्या** : घरला.

**वाशा** : घरला जावून काय करावं बा ? उद्या पुन्हा हितंच यावं लागंल, मार खाया. त्या परीस म्या हितच न्हातो.

**गण्या** : न्हाय पोरा...तू हितं न्हायला त मालक आन्खी मारंल.

**वाशा** : बरंच की. आसं न्हाय तं तसं...मरन तरी यील.

**गण्या** : आसं बोलू नगंस. चल बापा, चल. [ निघतात. काही अंतर गेल्यावर वाशा थांबतो. ]

**गण्या** : का रं ? चालवत न्हाय व्हय ? पाठगुळी घेवू ?

**वाशा** : न्हाय बा. मला आता चालायचं न्हाय. मला पळायचं हाय.

**गण्या** : पोरा !

**वाशा** : व्हय बा. मला बगायचं हाय, माज्यानं पळता येतं का !

**गण्या** : नगं पोरा, तनगळून पडशील. दगडधोंडं हायेत. आरं, पायावर बी लई मारलं पोरा.

**वाशा** : व्हय. म्हूनच माज्या पायात बळ आलं. म्या बगतो, मला पळता येतं का ! म्या पळतो बा. दूर...म्या पळतो.
( वाशा पळत सुटतो. )

**गण्या** : नगं पोरा, नगं, पळू नगंस. पोराऽऽ आरं कुटं बी गेला तरी त्यो मालक तुला हुडकून काढील. लई हाल करील तुजं. मला बी जिता न्हाय ठिवनार, ( विराम ) मालकाला सांगाया पायजे...नगं, जाव दे. त्यो तरी सुटंल या जिन्यातून, त्यो तरी सुटंल. पर पुन्हा हाती पडला त, जीवं मारनार. नगं, मालकाला सांगाया होवं. न्हाय त त्यो मालक मला बी मारील. सांगाया होवं ( मालकाच्या घराकडे धावत सुटतो. मालक आणि मुकादम दिसतात ) मालक, इपरीत घडलं मालक, इपरीत घडलं. वाश्या

पळूनशान गेला. ( मालक निर्विकार ) म्या त्येला लई समजावलं, पर त्येनं न्हाय ऐकलं.

**मालक** : ( अत्यंत शांतपणे ) मुकादम, गन्या काय म्हन्तो त्ये ऐकलं का ?

**मुकादम** : व्हय.

**मालक** : आसूड... ( मुकादम आसूड घेऊन येतो. ) जा हुडकून काढा वाघयाला. सम्दी मान्सं लावा कामाला. ( मुकादम जातो अणि मालक शांतपणे फेऱ्या मारत राहतो. ती शांतताच गण्याला भयावह वाटते ) गन्या... ( गण्या एकदम दचकतो ) आमचं गाहान पळून गेलं. कसं ?

**गण्या** : माजा काय बी गुन्हा नाय मालक.

**मालक** : गुन्हा आमचा झाला गन्या, आमी त्येला घरला घेवून जा म्हन्लं, हाच आमचा गुन्हा. ( आसूड हळुवार त्याच्या अंगावर फिरवतो. गण्या शहारतो. )

**गण्या** : मला मारू नगा मालक.

**मालक** : आमी तुला अजिवात मारनार न्हाय. आसूडानं तर न्हायच न्हाय. गन्या आमी सित्यावानी तुझ्या कमरंचं हाड तोडून टाकणार. तुला लुळालंगडा करनार.

**गण्या** : न्हाय मालक...न्हाय. ठार मारा पर आसं करू नगा. दया करा.

**मालक** : दया हायेच. दयेला आम्ही न्हाय म्हन्लं का ? इतकं दिस तू आमच्या-कडं राबला त्येची दया म्हून आसं करू; तुला बंधाऱ्यात जिता गाडू.

**गण्या** : न्हाय मालक.

**मालक** : तुला आजून दया पाहयजे ? देवू. दयेला तोटा न्हाय आमच्याकडं. तुला हितं गाडताना आसं करू. तुझं मुंडकं बाहीर ठिवू आन् मंग आमी तुज्यासार इटीदांडूचा खेळ खेळू. समदी मान्सं पाहनार आपला खेळ. तुझ्या डोस्क्याचा केस न् केस रगत येईस्तवर उपटून काढू. त्यावर गरम गरम तिखटमीठ चोळू. तू वरडणार. मग तापलेल्या लालबुंद सळयानं... ( माणसांचा गलका ऐकू येतो ) मान्सं आलीत बहुधा वाघ्याला घेऊन! गन्या, आता आपला खेळ रंगनार! तुला आमी असा धडा शिकवनार, की समदी मान्सं सरड व्हनार. कोन बी आमच्या इरूद जानार न्हाय. आमी तुला जीवं बी मारनार न्हाय आन् जिता बी ठिवनार न्हाय. ( माणसं वाघ्याला बांधून घेऊन येतात. मालकापुढं ढकलून देतात. ) गन्या, घे, पाहून घे शेवटचं.

**गण्या** : यवढा गुन्हा माफ करा मालक. परोपरीनं इनवलं पोरा, पर तू न्हाय ऐकलं. मालक एक डाव दया करा.

**मालक** : सित्या, देव्या, लक्ष्या, आरं, ऐकलं का गन्या काय म्हन्तो ते ? गन्या

म्हंतो दया करा. बस्स्, ठरलं. आमी गन्यावर दया करनार. जरूर करनार. चला, दयेच्या सोहळ्याची तयारी करा. सित्या, समदं कसं बरूबर रितसर व्हाया हवं. चला, फुलं उधळा, गुलाल उधळा, ढोल बडवा, नाचा, गा, जा, पळा. मुकादम तयारी करा. ( विराम ) गन्या, आमी तुला दया दावनार. पर तू आमच्यासाटी काय करनार ?

**गण्या :** सांगा मालक, म्या काय करू ?

**मालक :** तू करनार त्ये समद्यांच्या हिताचं करनार. गन्या, आजवर समदं सुतावानी सरळ व्हतं. पर आताशा सूत वाकडं व्हाया लागलं. आरं, आमचं गाहान आमच्यावरच... ( विराम ) आमचं गाहान तू आपल्या हातानं मोडीत काढनार. ह्याला बंधाऱ्यात तू जिता गाडनार. फकस्त ह्येचं मुंडकं बाहीर ठिवनार.

**गण्या :** माजं लेकरू...म्याच माझ्या हातानं...न्हाय मालक, ह्ये न्हाय व्हनार माझ्यानं. ( माणसं येतात तयारीसह. )

**मालक :** तूच करणार. सित्या, समदं कसं बरुबर, रितसर.... वाजवा. ( सित्या ढोल वाजवू लागतो ) गन्या आपल्या हातानं बाश्याला बंधाऱ्यात जिता गाडनार. फकस्त त्येचं मुंडकं बाहीर ठिवनार. वाजवा... फुलं उधळा. गुलाल उधळा. रगत येईस्तवर गन्या बाश्याच्या डोक्याचं केसन् केस उपटून काढणार. त्यावर गरमगरम तिखटमीठ चोळणार. बाश्या बरडनार...वाजवा...गा...नाचा. ( कुठलाच ठेका नीट पडत नाही. ) तापलेल्या लालबुंद सळयानं...आमचं गाहान गन्या आपल्या हातानं मोडीत काढनार. सित्या, आरं लेका, तू पट्टीचा वाजवनारा. ताल धर. आमी ह्या बापलेकांचा खेळ पाहनार. तुमी बी पाहनार. गन्या उचल, आमचं गाहान उचल. बंधारा वाट पहातोय ( मालक अकस्मात गण्याच्या पाठीवर आसूड ओढतो, गण्या हताशपणे पुढे होतो. ढसाढसा रडतो. ) उचल ( गण्या मुलाला उचलतो. ) फुलं उधळा, गुलाल उधळा, वाजवा. नाचा, गा... ( आणि भुकेकंगाल गाऊ लागतात. )

माजं घर, तुजं घर
सारा अंधार अंधार,
वुजवील कोन कैसा
आभाळीचं ह्ये खिंडार ॥

( आणि आर्त सुरारूढ पडदाही केविलवाणा होत जातो. )

■ ■ ■

# लेखक परिचय

## सुभाष सोनवणे

आजच्या 'परीक्षार्थी' शिक्षणपद्धतीवरचा विश्वासच उडाल्याने, तथाकथित 'कॉलेज शिक्षण' एस्. वाय्. बी. ए. ला अर्धवट सोडले.

'युगवाणी' (नागपूर) मध्ये तीन एकांकिका : वासनाचक्र, हृदयाची गाणी, अस्पर्श.

'मनोरा' (पुणे) मध्ये दोन एकांकिका : बाहुलीचा खून, चॅलेंज.

'राजस' (पुणे) मध्ये एक एकांकिका : ब्लॅक आऊट.

'नाट्यवलय' (नागपूर) आयोजित महाराष्ट्र पातळीवरील एकांकिका लेखन-स्पर्धेत दोन वेळा प्रथम पारितोषिके : वासना चक्र, अस्पर्श ह्या एकांकिकांना.

विदर्भ साहित्य संघ (नागपूर) आयोजित महाराष्ट्र पातळीवरील पुरुषपात्र-विरहित एकांकिका लेखनस्पर्धेत 'अस्पर्श' या एकांकिकेला प्रथम पारितोषिक.

'कलाशुक्लेंदु' (पणजी–गोवा) आयोजित महाराष्ट्र व गोवा पातळी-वरील एकांकिका लेखनस्पर्धेत 'ब्लॅक आऊट' या एकांकिकेला प्रथम पारितोषिक.

'लोकहितवादी मंडळ' (नासिक) आयोजित एकांकिका–लेखनस्पर्धेत 'बाहुलीचा खून' ला पारितोषिक.

सतराव्या महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात 'पुत्र' या नाटकास सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे १९७७ चे दिग्दर्शनाचे पारितोषिक.


प्रयोगासाठी संपर्क :
सुभाष सोनवणे
'मातृछाया' टिळकवाडी,
नासिक ४२२००२.

# विच्छिन्न

## सुभाष सोनवणे

( टाकळी-खंडेश्वर या खेडेगावाच्या 'गावकुसा' बाहेरील फकिरा केरू आरवाडे याची झोपडी. फकिरा हा येथील दलित नेता. पडदा उघडतो, तेव्हा रंगमंच रिकामा. म्हाद्या बाहेरून ओरडत प्रवेशतो. )

**म्हाद्या :** फकिरराव...ओ, फकिरराव...ओऽ —

**फकिरा :** ( येतो ) काय र म्हाद्या, गागतोयेस कशापाई रं ? आता आज आनि कोन म्येलं तुजं ?

**म्हाद्या :** माजं ल्येकरू फकिरराव, माजं ल्येकरू —

**फकिरा :** आरं, त्ये त कालच म्येलं. कालच पुरलं त्येला. त्येच्या नावानं कालच तुजं गळा काहाडून बी जालं —

**म्हाद्या :** काल पुरल्यालं माजं ल्येकरू उगडयावर आलं हाय —

**फकिरा :** आँ ?

**म्हाद्या :** व्हय —

**फकिरा :** चाल, आपुन पुन्ना गाडून येऊ जिमिनीत. आरं, कुत्र्या-लांडग्यानं उकरून काहाल्डं आसंल —

**म्हाद्या :** न्हाय, त्ये काम जनावराचं न्हाइये फकीरराव —

**फकिरा :** मंग ?

**म्हाद्या :** आपल्या मसनवटीत छपरी हुबारण्याचं काम चाल्लंये —

**फकिरा :** काय ?

**म्हाद्या :** व्हय !... त्या मान्सांनी जिमीन खनताना काहाल्डं माजं ल्येकरू, दिलं टाकून बाजूला !... मेल्यावर बी ह्या प्रिथमीवरच नरकवास ल्येकराला ! त्येला म्या घरला आनलं वापस. म्हाराच्या जातीत जलामलं हयेच्यात त्या अस्राप पोराचा काय गुन्ना फकीरराव !... जितंपनी डोकंभर छप्पर न्हाई गावलं, आन म्येल्यावर धरनीमायनं बी पोराला पोटाभाईर फयेकलं. कसं जगावं, आन् मरावं तरी कसं म्हारांनी ? तुम्मी आमचं पुडारी. येक दीस तुम्माला बी मरान येनार. आन हथे वरची जात-वालं तुमचा मुडदा बी उगडयावर सडू-कुजू देनार, कोल्हया-कावळ्यांच्या तोंडी देनार —

फकिरा : माज्या मरनाच्या गोस्टी काह्याडतोस, भाड्या, माजलास रं लई !

म्हाद्या : न्हाय द्येवा, मापी करा. म्यां तुमच्या पाया पडतू...फकीरराव, जल्दीनं चाला, आपली आख्खी मसनवटी त्ये बळकावून घितीन —

फकिरा : आरं, पन ह्यो डाव हाये तरी कुनाचा ?

म्हाद्या : आपल्या मसनवटीला ख्येटून कुनाची जिमीन हाये ? बागाईत ?

फकिरा : कुनाची ? (फकिराची बायको येते व हे बोलणं ऐकत उभी राहते.)

म्हाद्या : तुमास्नी ठावं हाय —

फकिरा : आरं पन तू थोबाड उचकटून सांगशीन त खरा —

म्हाद्या : हौसाबाईचं श्येत न्हवं का श्येजारी ?

फकिरा : हा, खरा —

म्हाद्या : त्या श्येताच्या बांदाला लागूनच छपरी हुवारनं चाल्लं हाये. हौसाबाईचं काम हये —

फकिरा : आसं ?

म्हाद्या : ती हुती तितं...द्येखरेख करत ! (स्तब्धता)

फकिरा : हा परस्न आदी पंचायतीत मांडाया लागल —

म्हाद्या : पन पंचायत भरनार कदी ?

फकिरा : आजच भरंल आशी म्या येवस्ता करतू —

म्हाद्या : आन् तवर माज्या ल्येकराचं काय करू ?

फकिरा : आरं, छपरीचं काम चाल्लं आहे, त्येच्यापासून जरा पलीकडं खड्डा कर आन द्ये त्ये पुरून — (स्तब्धता)

म्हाद्या : पन —

फकिरा : आता पन काय ?

म्हाद्या : फकीरराव, हये हितंच संपनार हाय का ?

फकिरा : म्हंजी ?

म्हाद्या : हौसाबाईनं आशेच हातपाय पसरत न्येल्ये, त येक दीस आपली सम्दी मसनवटी साफ हून जानार !... आपली सम्दी मानसा येकदम कावल्येली हायेत. सम्देच येनार होत्ये हितं. पन म्यां त्येंना आडीवलं —

फकिरा : का म्हून — ?

म्हाद्या : आवो, लई पिसाटल्ये हायेत सम्दे —

फकिरा : हौसाबाईवरच ना ?

म्हाद्या : व्हय !... आन्...

फकिरा : आन् काय ?

म्हाद्या : तुमच्यावर बी, फकीरराव !

**फकिरा** : माज्यावर ?

**म्हाद्या** : व्हय —

**फकिरा** : पन माजा काय संभंद ? ( म्हाद्या फकिराच्या बायकोकड बघत, अड-
खळत उत्तरतो. )

**म्हाद्या** : तुमचा आन् हौसाबाईचा संभंद सम्द्यास्नी ठावं हाये —

**फकिरा** : म्हाद्या — ( ओरडून, त्याच्या अंगावर हात उगारून धावत जातो —
( अंधार...संगीतखंड...
उजेड येतो, तेव्हा तीच रात्र...
फकिरा बाहेर निघण्याच्या तयारीत...
त्याची बायको येते. )

**बायको** : कुटं भाईर चाल्ले ? ( फकिरा रागाने तिच्याकडे बघतो. ) म्या नाट न्हाइये लावत. फकस्त इच्यारत्येय, तुम्ही चाल्ले त्ये कुटं ? ( तो संतापाने थरथरू लागतो. ) ग्येन्या त मगाच ग्येला की आज पंचायत भरनार न्हाई, सरपंच आन् दोन म्येंबरा तालुक्याला ग्येल्ये हायेत. मंग तुम्मी कुटं चाल्ले ? ... या रातच्या पारी ? ... रोजरोज कुटं जाता तुमी रातीला ?... हा, वटारा डोळं...आनिक वटारा ! म्यां न्हाय भ्येत !! सांगा माला, रोज रातीला कुटं जाता ? लग्नाची बाईल हाये म्यां तुमची ! कुटं पसारता तुमी रोज रातीची पथारी ?...म्हयना जाला... पुरा म्हयना !... माजा काई इच्चार ? त्या दोन चिमन्यांचा काई इच्यार ?... तुमचा त्वांड शिवलाये का ? कुटं चाल्ले तुमी ?... येकदा सोत्ताच्या तोंडानं सांगा ... हौसाकडं चाल्लो म्हून ! सांगा !! ( तो तिच्यावर हात उगारतो. ) हांऽ, हान आवरा ! तुम्मी म्हारांचे फुडारी, न्हवं का ? तुम्मी भासना द्येता— " ह्ये वरचे लोकं आमास्नी छळत्यात, आमास्नी पिळत्यात ! " आन् तुम्मी माला छळता, माला पिळता !! काय हाक्क हाये तुमास्नी भासना द्येन्याचा ? वरच्या जातवाल्यांचा छळ तुमास्नी जाचतो ! आन् तुमचा छळ माला न्हाई जाचत ?...म्हयनाबर माजा दादला रोज झोपाया त्या हौशीकडं ! फकस्त मांगल्या आठाव ड्यात चार राती झोपला घरी !... का ? जावा तुम्मी, खुशाल जावा. ( त्याला ढकलत बाहेर काढते, दार लावून घेते. तिच्या दोघी लहान मुली एकमेकींना बिलगून, मुसमुसत येतात. ) ये गं माज्या चिमने, तू बी ये गं बाय !... येक ध्येनात घ्या माज्या पोरींनो ... मान्सा म्हंजी मान्सा नसत्यात. मान्सा म्हंजी ल्हान मासा आन् मोटा मासा आसत्यात ! म्यां एक मासा. ल्हान मासा. आन् तुमचा बापूस ... जरा मोटा मासा, माला गिळनारा !... त्येला गिळनारा आनि येक मोटा मासा !...

सोत्ताच्या दादल्याकडं दाद लागत न्हाय, मंग आनि न्याव कुनाकडं मागायचा ?... ( रडते...भ्यालेल्या मुलींना कवटाळून रडत राहते...)

(अंधार... संगीतखंड... पुन्हा उजेड येतो, तेव्हा तीच रात्र... हौसाबाईच्या घरी फकीरा — )

**फकिरा :** ( अस्वस्थपणे चकरा मारताना, मधेच थबकून. ) कोन म्हन्तं बाया गरीब आसत्यात, दुबल्या आसत्यात म्हून ? बाया तुज्यासारक्या बी आसत्यात ! बाप्यालोकांना गांजीवनाऱ्या, लांडी-लबाडी करनाऱ्या, लुबाडनाऱ्या ! काई बायांना त्येंचा बाईपन नडतो, आन काई बाया त्येंचा बाईपनच वापरत्यात ! ( पुन्हा चकरा सुरू करतो, थबकतो. ) तू हये काय चालावलं हायेस ? हौशे, उत्तार घे —

**हौसा :** हा, वरडू नगा ! आसं माज्या आंगावर वरडाया म्यां काय तुमची लग्नाची बाईल न्हाय !

**फकिरा :** मंग तू बोलत का न्हाईयेस ? म्यां कवाधरनं बोलतोयें, आन् तू आपली गुमान ! ( स्तब्धता...नंतर थंडपणे - ) हौशे, ती छंपरी तू बांदल्ये हायेस ?

**हौसा :** व्हय, येश्यासाटी. येश्या जागल्या —

**फकिरा :** त्यो जागला राखन करनार तुज्या श्येताची, आन् त्येचं राहायचं खोपटं मातुर आमच्या मसनवटीत !

**हौसा :** आठ-धा हात त जागा घ्येतली खोपट्यासाटी. त्येत काय जगबुडी जाली का ?

**फकिरा :** पन तू येक सबूद बी बोल्ली न्हाय माज्याशी —

**हौसा :** म्यां समाजल्ये, तुम्मी न्हाय म्हन्नार न्हाय !

**फकिरा :** हौशे, हा मामला माजा येकल्याचा न्हाय, आमच्या समद्या जातवाल्यांचा हाय !

**हौसा :** त्येंना काय कल्तं ?

**फकिरा :** लई नसंल कलत ! पन त्येंना म्हाईतीये का ती जागा तुजी न्हाई —

**हौसा :** आन् मंग माला बी म्हाईतीये की ती जागा माजी हाए ! माजीच हाए —

**फकिरा :** खोटं बोलू नगंस. नरकात जाशीन —

**हौसा :** त्ये माजं म्यां बगून घीन —

**फकिरा :** इक्ता माज तुला ?

**हौसा :** हाये ! मंग ?

**फकिरा :** हौश्ये, तू हये लय वंगाळ करत्ये हायेस. आमची मसनवटी उकारलीस

तू! आमच्या लोकांचे मुडदे — त्येंची हाडा काहाडलीस तू वर! आमच्या बापजाद्यांच्या कबरीवरल्ये दगडगोठे हालावल्येस – ! क्येवडा मोटा पाप क्येलायेस तू हौशे, तुला समाजतये का? ( स्तब्धता. )

**हौसा** : माजी ही चूक सुदारनं तुमच्या हातात हाये ...

**फकिरा** : म्हंजी ... ?

**हौसा** : म्या छपरी तोडू शकत न्हाई ... पन तुम्मी त्या जिमिनीवरला हाक्क सोडू शकता —

**फकिरा** : हौशे!

**हौसा** : व्हय, माज्यासाटी!... त्यो त्यवडा तुकडा माला जोडून घिऊ द्या माज्या श्येताला ...

**फकिरा** : हौशे, दोनशे सालामागं ती जागा आमाला मसनवटीसाटी मिळाली हाये, बक्षिशी म्हून —

**हौसा** : त्येतला थोडा तुकडा तुम्मी मला बक्षिशी द्या ...

**फकिरा** : पन ती जिमीन माज्या मालकीची न्हाई ...

**हौसा** : जिमिनीचं कागुद त तुमच्या जवलच हाये. फकस्त तुमच्याच जवल ...! म्या सम्दी मसनवटी न्हाई, येक तुकडा घ्येतला फकस्त! ... त्यो दिऊन टाका माला. फकीरराव, माज्या श्येतात जागल्याच्या खोपट्यासाटी जागा न्हाई, मसनवटीत मोप जागा हाये! ... आन् फकीरराव, तुमचं-माजं आता येकच न्हाई का सम्दं?

**फकिरा** : अजाबात न्हाय हौशे ...

**हौसा** : तुम्मी आन म्यां आजून वायले-वायले हाओत? हयेच का तुमचं माज्यावरलं पिरेम?

**फकिरा** : हौसा, माजा म्हन्ना आईक जरा ...

**हौसा** : जा, येक सबूद बोलू नगा ...

**फकिरा** : आस्सं? ... माला बी कल्लं तुजं पिरेम? ... तुजा कावा हुता ह्यो सम्दा. तुजं बी पिरेम-बिरेम न्हवतं, तुला फकस्त माला कह्यात घ्येयाचं हुतं. माला कह्यात घिऊन आमच्या मसनवटीचा तुकडा लुबाडायचा हुता तुला ...

**हौसा** : न्हाय, तसं न्हाईये त्ये फकिरराव ...

**फकिरा** : उंद्या सकाळच्याला ती छपरी हाटायला होवी तितनं —

**हौसा** : आन न्हाई हाटली, त ... ?

**फकिरा** : म्यां पंचायतीत जाईल —

**हौसा** : तुज्यासकट सम्दे पंच माज्या शेजेचे भागीदार हायेत...! न्हाय म्हंजी, हुते!!

**फकिरा :** म्यां कोडतात जाईल. माज्याजवळ पुराना कागुद हाय, सनद लिवलेला...

**हौसा :** कोडताची भाषा करतूस! दमडया हायेत रं खिशात? तुज्या जातवाल्यांच्या, आन तुज्या खिशात बी? आरं, माज्याबरूवर राती काहाडतोस, त्या बी फुकटामंदी ...!

**फकिरा :** माला पह्यलं बलावनं तूच पाठावलं हुतंस. "उंद्या या...उंद्या बी याच" म्हून रोजच्या रोज औतान तूच ध्येतेस माला ...

**हौसा :** व्हय, फकीरराव... कारन म्या तुमच्याकडं कंदी पैशासाटी बगातलंच न्हाय! .. माजा जीव जल्डा हाये तुमच्यावर. माला तुम्मी पायजेल हायेत. पैसं नगंत. म्या कंदी बी पैसं न्हाय मागनार तुमच्याकडं! तुमच्याकडनं कंदी बी पैसं न्हाय घिनार!... त्यवडं फकस्त ...

**फकिरा :** हौशे, फुकाटची लाडीगोडी लावू नगंस. ती जिमीन तुला गिळता येनार न्हाई. म्या तुला त्ये करू ध्येनार न्हाई. जातू म्या ...

**हौसा :** माज्या उपकाराची फ्येड अशी करतूस रं?

**फकिरा :** म्या तुज्याकडं उपकार मागातलं न्हवतं ...

**हौसा :** हा, न्हवतं मागातलं! पन म्यां क्येलं उपकार तुज्यावर. आपसूक क्येलं. त्येचं ध्येन ठिव ...

**फकिरा :** तुजा जीव जल्डा माज्यावर, म्हून माला आवतान दिलंस तू! येच्यात माज्यावर कसलं उपकार?

**हौसा :** इसरू नगंस, तू म्हार हायेस ...

**फकिरा :** पन हितं जातीचा काय संमंद? म्या म्हार तरी हाये, पन तू त कंच्या बी जातीची न्हाईस ...

**हौसा :** काय?

**फकिरा :** आगं, ज्येच्याबरुबर झोपशीन, त्येंचीच जात तुजी बी! त्यवडया येळापुरती!

**हौसा :** त्ये सम्दं म्या सोडलं हाये आता. तुम्मी माज्याकडं पयल्यांदा आल्ये, तवापास्नं म्या बाकीच्यांशी संभंद न्हाय ठिवल्येला —

**फकिरा :** लबाड बोलू नगंस —

**हौसा :** इक्त्या दिसात तुम्मी दुसऱ्या कुणाला माज्यासंगं पायलं? माला त्या लोकांचं पैसं बी नगंत, आन त्ये लोकं बी नगंत! ह्यो माजा रिकाम्या खिशांचा म्हार माज्या मनात भरला हाये!

**फकिरा :** माला पुन्ना-पुन्ना म्हार-म्हार नगं म्हनूस... !

**हौसा :** म्हन्लं न्हाय, म्हून तुजी जात बदलंल रं?... माज्या गिराईकात सम्दे वरच्या जातीवाले हुते! कोन बी म्हार-मांग न्हवता! आरं, तुज्यासारक्याला शेजेला घ्येतलं, ह्ये उपकार मान माजं! भटीन-बामनीन

नसल्ये, तरी तुज्यापेक्षा वरच्या जातीची हाये म्या! वरच्या जातवालीसंगं कंदी सपनात तरी झोपला हुतास रं ?

**फकिरा** : म्या चाल्लू ...

**हौसा** : काओ, यवडयात ? आजून त...

**फकिरा** : तुजा–माजा संभंद खतम आता ...

**हौसा** : निदान आजची रात. शेवटली ...

**फकिरा** : न्हाय म्हंजी न्हाय ! उंद्या मातुर ती छपरी उटायला होवी तितून...

**हौसा** : तू कोडतातून हुकूम आन. मंग बगू...

**फकिरा** : हौशे ऽ —

**हौसा** : आपला संभंद संपला हाये ! हय तुमचंच सवूद —

**फकिरा** : हा ! ( तावातावाने जातो... )

( अंधार...संगीतखंड...
दरम्यान काही दिवस उलटतात...
पुन्हा उजेड येतो, तेव्हा– एका कट्टयावर पोलिस अंमलदार उभा. त्याच्या भोवती गोंगरलेला दलित समुदाय — )

**अंमलदार** : केव्हा येणार हे तुमचे नेते ? पंतप्रधानांच्या वरताण दिसतात ...

**एक वृद्ध** : आक्षी यीलच बगा फकिरा ...

**एक तरुण** : व्हय, सांगावा धाडलाय फकिररावांना की आसान तशे निगून या म्हून हितं ...

**एक स्त्री** : आवो, आल्येच वगा त्ये ...

**दुसरा वृद्ध** : आरं, जरा बिगीनं चाल रं फकिरा ऽ —( एकाबरोबर फकिरा येतो. )

**अंमलदार** : फकिरा केरू आरवाडे तुम्हीच का ?

**फकिरा** : व्हय... आपुन ?

**तिसरा वृद्ध** : आरं, श्येराहून आल्ये हैत. पोलिसाचे बडे सायेब ...

**फकिरा** : जोहार मायबाप ...

**अंमलदार** : मी दोन कामांसाठी आलो आहे. एक म्हणजे– तुमचं स्मशानभूमी प्रकरण, जे न्यायालयप्रविष्ट आहे, त्या संदर्भात.. ! कोर्टाकडून पुढील सूचना मिळेपर्यंत, स्मशानभूमीचा वापर करण्यावर कोर्टानं स्टे दिला आहे.

**एक जण** : म्हंजी.. ?

**अंमलदार** : कोर्टाकडून परवानगी मिळेपर्यंत तुम्हाला स्मशानभूमी वापरता येणार नाही.

**अनेक जण** : ( एकाच वेळी ) काय ? ह्ये काय भलतंच ? आरं बापाऽ ( वगैरे )

**फकिरा** : पन साहयेब, मदेच कुनी दगावला, त ...?

**अंमलदार** : तर काय ?

**फकिरा** : त काय करायचं ? त्या मुडद्याचं ?

**अंमलदार** : त्याबद्दलचा मला वरून काहीही आदेश नाही...

**फकिरा** : पन मंग आमी मुडदा पुरायचा कुटं ?

**अंमलदार** : या प्रश्नाचं उत्तर देणं माझ्या अधिकारकक्षेबाहेर आहे. तुम्हाला स्मशान वापरता येणार नाही, हे पक्कं. आणि मी त्यावरच लक्ष ठेवण्यासाठी आलो आहे. दुसरं म्हणजे... येथील संभाव्य तणावपूर्ण परिस्थितीवर नियंत्रण ठेवणं ही आणखी एक जबाबदारी सांभाळण्यासाठी मला इथे पाठवण्यात आलं आहे. एकच इशारा देऊन ठेवतो— दंगल वगैरे माजवण्याचा प्रयत्न केलात, तर माझ्याशी गाठ आहे ! याद राखा... (निघून जातो... सर्व समुदाय फकिराभोवती गोळा होऊन त्याच्याशी या विषयावर बोलू लागतो ... गलका ... रत्न्या धावत येतो – )

**रत्न्या** : फकीरराव... फकीररा ऽव—

**फकिरा** : काय रं रत्न्या ?

**रत्न्या** : कारभारीचा बा दगावला !... काय बी झालं नव्हतं बगा त्येला... पन अचानक रगात ओकला भडाभडा, आन आचक्यं घेत दोन मिन्टात म्येला ! चाला तुमी... ए, तुमी बी समदे चाला रं ... ( जमावात भेसूर स्तब्धता... बराच वेळ – )

**फकिरा** : कारभारीचा बा ... म्येला !... पन ... आता ... म्हंजी... ( जमावात कुजबूज ... बडबड ... गोंगाट ... प्रचंड कोलाहल ... अंधार ... संगीत...

पुन्हा उजेड येतो, तेव्हा दुसरा दिवस ... अंमलदार व सभोवती कोलाहल करणारा जमाव )

**अंमलदार** : ( हात उंचावून, सर्वांना गप्प करतो. ) एका वेळी एकानंच बोला कोणीतरी ... ( स्तब्धता ) बोला, फकिरा केरू आरवाडे ...

**फकिरा** : काल कारभारीचा बा म्येला —

**अंमलदार** : हं —

**फकिरा** : आता दुसऱ्या दिसाची रात व्हायाला आली —

**अंमलदार** : हं —

**फकिरा** : मुडदा तसाच पडून हाये —

**अंमलदार** : हं —

**फकिरा** : काय तरी कराया होवं —

**अंमलदार** : हं !

**फकिरा** : काय करावं आमी ?

**अंमलदार** : तो तुमचा प्रश्न आहे —

**फकिरा** : त्येला मूठमाती दिऊ द्या आमास्नी —

**अंमलदार** : कोर्टाचा मनाईहुकूम मी मोडू शकत नाही, कोणाला मोडू देऊ शकत नाही — ( स्तब्धता )

**एक म्हातारा** : आता मग आमी त्यो मुडदा काय नदीमंदी सोडून दिऊ ?

**अंमलदार** : प्रेताची अशी बेकायदेशीर विल्हेवाट लावू बघितलीत तर मला तुमच्यावर कारवाई करावी लागेल —

**दुसरा** : म्हंजी ?

**अंमलदार** : तुम्हाला ते प्रेत नदीत टाकता येणार नाही —

**कारभारी** : मंग काय घरातच ठिवू म्यां माजा म्येल्येला बा ? किती दीस ?... त्येच्यात किडं पडू दिऊ ? त्येला घान सुटू दिऊ आनिक ? का गिधाडं लांडग्यास्नी खान्यासाटी त्येला माळरानावर टाकून दिऊ ?

**अंमलदार** : तो तुमचा आणि कोर्टाचा प्रश्न आहे —

**फकिरा** : म्हंजी तुमच्याकडं काय वी उत्तार न्हाई ?

**अंमलदार** : उत्तर ?... वेगवेगळे दोन तीन पर्याय आहेत. एक तर तुम्ही ते प्रेत घेऊन जिल्हा न्यायालयात जा. तिथे असं शपथपत्र द्या की हे प्रेत बेवारशी आहे. त्याची योग्य ती विल्हेवाट कोर्टानं लावावी अशी कोर्टाला विनंती करा—

**कारभारी** : ब्येवारस !... माजा बा ब्यवारस ?

**अंमलदार** : हे पाहा कारभारी, असं भावनावश होऊन चालणार नाही. प्राप्त कठोर वस्तुस्थितीचा समतोल मनानं विचार केला पाहिजे. तुला हा उपाय मंजूर नाहीये का ?

**कारभारी** : न्हाय —

**अंमलदार** : मग आणखी एक उपाय आहे. जिल्हा रुग्णालयात जाऊन सांगायचं की, रुग्णालयाच्या मेडिकल कॉलेजसाठी डेड् बॉडी ... म्हणजे ... मराठीत ... प्रेत हवं असेल तर घ्या—

**कारभारी** : आन त्ये काय करतीन माज्या बाचं ?

**अंमलदार** : अरे, मेल्यावरसुद्धा तुझ्या वडिलांच्या देहाचा उपयोग होऊ शकेल... आहेस कुठे ? विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी जिल्हा रुग्णालयाला प्रेतं लागतातच —

**कारभारी** : कशासाठी लागत्यात प्रतं ?

**अंमलदार** : शवविच्छेदन ! म्हणजे — चिरफाड...

कारभारी : काय ?

अंमलदार : प्रेतं फाडून, मेडिकलच्या विद्यार्थ्यांना अंतर्गत शरीरशास्त्र शिकवतात तिथे ...

कारभारी : म्हंजे... त्ये माज्या बाचं तुकडं–तुकडं करनार, आसंच नव्हं ? योक हात हिकडं, योक पाय तिकडं... आन् फाडल्येलं प्वाट... आन् भळाभळा रगात... आन् डोलं... आन् चिरल्येले कान... आन् उगाडल्येली छाती... ! बा... माजा बाऽ...

(अंधार... संगीतखंड
दरम्यान एक आठवडा उलटतो...
रात्र... फकिराची झोपडी...
फकिराची बायको तावातावाने येते...
तिच्या मागोमाग फकिराही येतो — )

बायको : म्या दीड-दोन म्हयन्यांपूर्वी सांगातलंय तुमास्नी— का म्या तुमाला कंदी बी हात लावू द्येनार न्हाय —

फकिरा : तू माझी लग्नाची बाईल हायेस —

बायको : मसनात ग्येलं त्ये लगीन.

फकिरा : तू काय खूळ भरावून घ्येतलंयेस ह्ये डोसक्यात ?

बायको : आन् तुमच्या डोसक्यात खूळ हुतं त्ये ? हौशीचं खूळ ?

फकिरा : त्ये काहाडलंय म्या डोसक्यातून ! तिच्याकडं जानं बंद क्येलंये म्या, आन् ह्ये तुला बी ठावं हाये —

बायको : हा ! ठावं हाये —

फकिरा : मंग — ? आता तुजा हाट्ट सोड की —

बायको : न्हाय ! ... तुमास्नी वाटतं का म्या मानूस न्हाई ! मंग म्या काय हाये ? गादी, न्हाई तं गोधडी, का खाट ! तुमच्या मनात आलं का तुम्मी माजा उप्येग क्येला ! तुमच्या मनात नसंल तर माजा काय बी उप्येग न्हाई ! पुन्ना तुमच्या मनात आलं, का म्यां तुमच्या बिछान्यावर यिऊन पडाया होवं ! ... लग्नाची बाईल म्हन्ता, आन माजी ही फरपट करता ?

फकिरा : आलं तुजं बोलून ? आता चाल —

बायको : म्या तुमची बाईल न्हाई, आन ठिवलेली बाई बी न्हाई ! ( स्तब्धता. )

फकिरा : तुजा इच्चार पक्का हाये ?

बायको : व्हय ! ... ( स्तब्धता. )

फकिरा : येक डाव पुन्ना इच्चारतो —

बायको : म्या सांगत्ये — माजा इच्चार पक्काच हाये — ( स्तब्धता. )

फकिरा : तुज्याजवळ पैसं किती हायेत ?

बायको : दोन-चार रुपयं आसतीन. पन त्ये उंद्याच्याला लागतीन. जवारी संपलीये. साक्कर बी न्हाई चिमूटभर... ( स्तब्धता. ) तुम्हास्नी कसाला होवंत पैसं ?

फकिरा : रांडेकडं जायला — !

बायको : न्हाईत पैसं माज्याकडं ! ( स्तब्धता. )

फकिरा : ती काळी पोत काहाड गळ्यातून —

बायको : का ऽ य ?

फकिरा : ती काळी पोत काहाड ! एक सोन्याची वाटी हाये त्येत, त्यवडी पुरंल माला !...द्ये ती पोत. आता काहाड सांगतू, त —(ओरडून) काहाऽड !

बायको : हयी पोत ? ... आवो, म्या तुमची ...

फकिरा : आली आठवान लग्नाची ?

बायको : लगीन ? ... ग्येलं दोन म्हयनं म्यां लगीन व्हऊन बी कुंवार हुत्ये ! आन् आता...आता दादला आसून बी म्या इधवा हाये —! घ्ये मुड्द्या, घ्ये — ( गळ्यातून पोत काढून फकिराकडे फेकते... )

( अंधार... संगीतखंड...
पुन्हा उजेड येतो तेव्हा, तीच रात्र.
हौसाचं घर — )

फकिरा : ( तिच्याकडे काळी पोत फेकत. ) घ्ये —

हौसा : ह्ये काय ?

फकिरा : तुला दिसात न्हाय ?

हौसा : काळी पोत ?

फकिरा : व्हय —

हौसा : माला बाईल करनार तुमची ?

फकिरा : त्येत सोन्याची वाटी हाये. तुजा दाम म्हून. आत्ता माज्याकडं रोख पैसं न्हाईत —

हौसा : पैसं ? आन त्ये कसाला ?

फकिरा : माला न्हाई, तुला होवंत पैसं —

हौसा : कशापायी ?

फकिरा : तुज्याकडं गिराईक म्हून आलोये म्या हौशे —

हौसा : आत्ता गं बया —

फकिरा : आशी लाजू नगंस नव्या न्हवरीवानी —

हौसा : फकीरराव, दुसऱ्या कुनापुडं लाजल्ये न्हाई मी कंदी. माज्या धंद्यात लाजंचं कामच न्हवतं !...पन...तुमच्यासमोर.. इक्त्या दिसांनी...! इस्वास ठिवा माज्यावर फकीरराव, माजा तुमच्यावर लई जीव हाये ..! हा, आजून ! इक्तं जालं, तरी बी !... फकीरराव, त्ये सम्दं मिटाया होवं आसं न्हाई वाटत तुमास्नी !... कारभारीच्या वाला श्येजारल्या गावी न्येऊन पुरावं लागलं. तीन दिसांनी...ह्ये लई हुतंये. तुम्मी मनावर घ्येतलं, त हये सम्दं मिटून जाईल. त्यो फकस्त त्यवडा येक तुकडा माज्या श्येताला जोडून द्या. बाकी सम्दी मसनवटी न्हाईलच तुमच्यासाठी ! गोडीगुलाबीत हये संपू द्या —

फकिरा : तू आन्यावानं जिमीन घ्येत्ये हायेस. माला माज्या लोकांशी बेईमान व्हायाला सांगत्ये हायेस तू —

हौसा : फकीरराव, तुम्मी माज्यासाटी यवडी गोस्ट करा. म्या तुम्मास्नी त्येची किंमत दील. रोज घेत जाईल, पैसं न घ्येता. घ्या ही तुमच्या बायकूची पोत. आन आत चाला —

फकिरा : म्या तुज्याकडं फकस्त गिराईक म्हून आलोये हौशे. ती पोत घ्ये, मोड. त्येचं पैसं मिळतीन तुला —

हौसा : आन् माला तुमच्याकडून पैसं नगं आसतीन, त ?

फकिरा : त माला बी तुज्याकडून फुकटात काय बी नगं —

हौसा : आसं ?

फकिरा : व्हय !

हौसा : आरं, माजी, ह्यीच किंमात क्येलीस रं ? माजा मन कंदी न्हाई जानला तू ! म्यां तुज्यावर जीव जडीवला, आन् तू माला इकत घ्येतोस रं ? माजा यवडा आपमान करतूस ! माला फकस्त तू होवा म्हून म्यां त्यो धंदा सोल्डा, आन् तू माला दाम घेतोस शेजेचा ?... हा अन्याव, हा आपमान निमूट न्हाई गिळणार म्या !— ( बेफाम होऊन, दाराशी जाते— ) म्हमद्या... येऽ म्हमद्याऽऽ...

( म्हमद्या येतो... अंधार... संगीतखंड...
अंधुक प्रकाशात दाट रान दिसते —
हौसा येते, तिच्यापाठोपाठ दोन दांडगे पुरुष

फकिराला मुटकुळं करून घेऊन येतात — )

**हौसा :** हां, थांबा रं — टाका त्येला खाली — ( मुसक्या बांधलेल्या फकिराला ते दोघे खाली टाकतात— ) करा त्येचं तुकडं, आन् द्या फ्येकून खाली दरीमंदी ! ... जीव जान्याआदी भाडयाच्या प्याटाखाली द्या दनकं — त्येचं त्ये ठेचून टाका पार— चेचून टाका... म्हमद्या, उचाल रं पाहार ! येश्या, घ्यें तू बी कुराड ! — ( ते दोघे अवजारं घेतात, उगारतात— ) हां—हानाऽ— न्येम धरून... पन पन एकदम मरून जाऊ दिऊ नका त्येला— ! हाल हाल करून मारा ! ... द्या दनकं— ( फकिराची, प्रतिकारासाठी केविलवाणी — क्षीण धडपड !... त्याच्या तोंडात बोळेही कोंबले आहेत. त्याच्यावर घाव घातले जातात. त्याची तडफड. ) थांबू नगा रं मुडद्यांन्नू...हाना...मार म्हमद्या...हां, येश्या चालू द्ये... ( घाव चालू राहतात. फकिरा तडफडून मरून पडत असतानाच अचानक अंमलदार येऊन पुढ्यात उभा... स्तब्धता... )

**हौसा :** म्येला ? ... ( इन्स्पेक्टरकडे वळत— ) व्हय, सायेब, म्यां जीव घ्येतला त्येचा... म्यां... ! पन... माजा लई जीव हुता त्येच्यावर ... लई जीव हुता... ! आन म्यां त्येचा खून क्येला ! त्येनं माजा मन न्हाई वळाखला कंदी !.. माला त्यो हावा हुता, आन् त्येनं माज्यापुडं दाम फ्येकला... ! माजी किंमात क्येली...

( अंधार संगीत खंड...
उजेड येतो, तेव्हा दुसरा दिवस...
अंमलदाराभोवती दलितांचा समुदाय... )

**अंमलदार :** अजून स्टे उठला नाहीये. जिल्हाधिकारी, गृहमंत्री, मुख्यमंत्री यांच्याकडे तुम्ही आधीच पाठवलेली निवेदनं त्यांनी योग्य त्या खात्याकडे धाडलेली आहेत. पण निर्णय लागेपर्यंत तुम्हाला त्याला तिथे पुरता येणार नाही–

( समुदायात बडबड ... रंगमंचाच्या दुसऱ्या भागात प्रकाश...
मुलींना पोटाशी घेऊन फकिराची बायको रडते आहे....
रंगमंचाच्या तिसऱ्या भागात प्रकाश.... चौकीत गजाआड हौसा दिसते— )

**हौसा :** ( भ्रमिष्टासारखी....स्वतःशीच— ) माजा जीव जल्डा हुता त्येच्यावर.... खराच !... म्यां खून क्येला त्येचा !... म्यां त्येच्यावर

पिरम कयेलं ह्ये न्हाई कळालं त्येला !... त्येनं माजी किंमात करू वगातली....

( रंगमंचावरील एका भागातील अंमलदार व समुदाय. दुसऱ्या भागातील फकिराची बायको व मुली, तिसऱ्या भागातील हैसा — या सर्वांचा फ्रीज...या तिन्ही दृश्यांवर आलटून-पालटून प्रकाश येत राहतो— जात राहतो...पुनः पुन्हा... )

पडदा !

■ ■ ■

# लेखक-परिचय

## प्रकाश बुद्धिसागर

प्रकाश दत्तात्रय बुद्धिसागर.
नाटक हाच पूर्ण वेळेचा व्यवसाय.
काही नाटके आणि एकांकिकांचे दिग्दर्शन केले आहे.
प्रयोगासाठी संपर्क :

प्रकाश बुद्धिसागर
ए – ३ ‘ वसुंधरा ’
टिळक रोड, घाटकोपर,
मुंबई – ४०००७७

# सुनीला पारनामे शाळेत चालली होती

## प्रकाश बुद्धिसागर

मूळ कथा : 'शाळेचा रस्ता' : रत्नाकर मतकरी
रूपांतर : प्रकाश बुद्धिसागर

(रंगमंचावर सुनीला – झोपली आहे. कुठूनशी शाळेत रोज घेतली जाणारी हजेरी ऐकू येते आहे... 'सुनीला पारनामे' या नावाचा दोन वेळा पुकारा झाल्यावर अंथरुणावरची सुनीला किंचाळून उठते – 'हजऽऽर' या तिच्या ओरडण्याने आई दचकून बाहेर येते.)

**आई :** काय गं सुनीला? काय झालं?... ओरडलीस कशाला? स्वप्नबिप्न पडलं की काय?

**सुनीला :** स्वप्न? अं— हो स्वप्नच ते! पण किती भयंकर...! ए आई, तू माझ्याजवळ थांब! मला भीती वाटत्येय गं!

**आई :** आहे रे सोन्या, मी इथंच आहे! भ्यायचं काय! झालं तरी काय एवढं किंचाळायला... अं?

**सुनीला :** कुठे काय? ए आई, उद्या मी शाळेत जाऊ ना गं?

**आई :** कोणी नाही म्हटलं? जा की... पण आधी काय झालं ते सांग बरं...

**सुनीला :** कुणास ठाऊक? मला वाटलं... वाटलं की.... का गं आई, पण समजा, उद्या शाळेत जाताना, मी रस्ताच विसरले तर?

**आई :** रस्ता? तो कसा विसरशील? इतके दिवस नाहीस का जात तू? मग उद्याच कसा विसरशील?

**सुनीला :** ते ही खरचं म्हणा! पण आत्ता मला तसं वाटलं!

**आई :** बरं! वाटलं ते वाटलं! पण अशा वेळी काय करायचं माहीत्ये ना?

**सुनीला :** हो, पोलिसांना सांगायचं... ना?

**आई :** मग काय तर! चल झोप बघू! उद्या लवकर उठायचंय ना?... आणि औषध घेतलंस का?

**सुनीला :** ए आई, आपले बाबा का नाही सांगत ग पोलिसांना? त्यांना भीती वाटत असेल पोलिसांची! किंवा लाज वाटत असेल 'घर विसरलो' म्हणून सांगायला! पण रोजरोज कसं गं घर विसरतात? कुठेच्या कुठे जातात! लवकर येतच नाहीत! कोणाना-कोणाला रोज बाबांचा हात

धरून घरी आणावं लागतं !... बाबा काय आता लहान आहेत का गं ?...केवढे तरी मोठ्ठे आहेत !...

**आई** : सुनीला, फारच बोलायला लागलीस तू ! शहाणी आहेस ना ? आईनं सांगितलेलं ऐकायचं असतं !

**सुनीला** : माहीत्येय ! मी जास्त बोललेलं, आवडत नाही ना तुला ? ... तुला रडायला येतं ना ?... मं मी नाही बोलणार; अगदी तुझी शप्पथ !

**आई** : बरं आता झोप हं !

**सुनीला** : ए आई, मी शाळेचेच कपडे घालून झोपू ?

**आई** : का गं ?

**सुनीला** : म्हणजे १० वाजले की चा-ल-ले !

**आई** : हं ऽ न् मग डबा कोण घेणार ?

**सुनीला** : तेच गं ! म्हणजे १० वाजले, डबा घेतला की गुल् ! डबा हवाच.

**आई** : देईन रे सोन्या, विसरलास तरी शाळेत आणून देईन हं डबा ! झोप आता... ( सुनीला झोपते... अंधार )

( दुसरे दृश्य. घराबाहेरचा रस्ता. रात्रीचे १॥/२ वाजून गेलेत. सुनीलाचे वडील, कुण्या एका मित्राबरोबर निष्कारण बडबडत उभे आहेत... )

**बाबा** : ...आता, तू मुलगी पाह्यलीयेस, तुला पसंत आहे म्हणतोयस तर, ' लग्न करू नको ' असं कोण म्हणेल ?... पण...What I will suggest you, की उगीच जास्त expectations ठेवू नकोस !... कारण, तुला माहीतीय ... After all बायका त्या बायकाच !... आता माझंच बघ ना ... मलाही वाटायचं ... साला, ही बायको मिळाली... की बास् ! कारण ... you know ... आपलं म्हणजे ... out of the way जाऊन ... खूप काही करायचं असतं रे आपल्याला. पण या बायका साला, तेवढा विचार करत नाहीत ! निदान भारतात तरी नाहीच नाही ! झालं ! लग्न झालं ! पहिलं वहिलं प्रेम होतं तोपर्यंत सगळं ठीक होतं. पण मग नवलाई संपली. आणि... सुनीलाची आईसुद्धा middle class mentality ची निघाली ! तद्दन ' बायको ' रे ! परिणाम काय ? तर hormony संपली !... शेवटी मलाच तिची दया आली... पति-कर्तव्याच्या नावाखाली.... तिचं मन रमवण्यासाठी... साधं एक खेळणं म्हणून, सुनीलाचा जन्म झाला ! नाहीतर... ! any way... आता ती मजेत आहे, घरचं सगळं बघते, मुलीचं सगळं करते... पण माझं काय ? What about me ? ... नै; मुलगी हुशार आहे रे ! पण

सदान्कदा अंथरुणात !... या डॉक्टरांची बिलं भरता भरता वाट लागते! त्यामुळं extra काम, extra मेहनत हे सगळं ओघानं आलंच ! आता दोस्त-लोक म्हणतात, ‘ पूर्वीचा पारनामे संपला ! ’... हे सालं खटकतं रे !... न् मग ही वैचारिक नसबंदी करावी लागते ! दुसरं काय...?...any way तुझा निर्णय तूच घे. निदान अशा गोष्टीं-मध्ये मागे राहू नकोस. Go ahead आणि हे बघ...thanks हं कंपनी दिल्याबद्दल...( बावा ‘ good night ’ वगैरे बडबडत घरात येतात. )

**आई** : अहो, जरा हळू ! नीला झोपलीय् आत्ताच !

**बाबा** : हळू ? हळू का म्हणून ? कुणाची टाप लागलीय, मला...

**आई** : अहो, असं काय करताय ? नीलाला डॉक्टरकडे नेणार होतात ना ? ते सगळं सोडून पुन्हा गेलात ना... ?

**बाबा** : चूप ! मला शिकवू नकोस ! डॉक्टरला आणतो म्हटलं ना ? आणतो म्हणजे आणतो! आत्ता आणतो... “ डॉक्टर ! डॉक्टर ! ”...

**आई** : शीः ! किती वास येतोय...

**बाबा** : आता, ‘ वास येतो ’ ही काय माझी चूक आहे ? ती दारू बनवणाराची चूक आहे...

**आई** : पण मग आपण पिऊ नये !

**बाबा** : का ? का पिऊ नये ? पैसे काय तुझा बाप देतो ?...

**आई** : ... शूऽ ! पुरे ! ‘ सुनी ’ जागी होईल...

( सकाळ, सुनीला पलंगावर झोपलेली आहेच. शेजारी डॉक्टर, बाबा आणि आई उभे आहेत...त्याचवेळी ‘ सुनीला ’ गणवेष घालून शाळेत जाण्याच्या तयारीत... )

**डॉक्टर** : कुठेय आमचा पेशंट ? ... काय म्हणतोय ?

**आई** : झोपलीय आत्ताच ! सुनिला ऊठ, डॉक्टरकाका आलेत बघ !

**डॉक्टर** : असू दे- झोपू दे !... ताप आहे बराच !

**आई** : होना ! कालही होता !

**डॉक्टर** : कालही होता ? जरा चमचा बघू...किती होता काल ?

**बाबा** : काय ?

**डॉक्टर** : ताप ?

**बाबा** : खूप ! म्हणजे बराच होता...वाटतं... !

**डॉक्टर** : वाटतं ? म्हणजे ?

**बाबा** : नाही ... म्हणजे ... मी ... घरात नव्हतो !

डॉक्टर : हं ऽ ... म्हणजे कालही तुम्ही...
सुनीला : " ए आई ! माझी पुस्तकं कुठे आहेत ? "
बाबा : I am sorry doctor... पण...
डॉक्टर : हे पहा मि. पारनामे...घरात एकुलती एक मुलगी आजारी ! त्यात तुमचं हे असं वागणं ! मुलीवर परिणाम होणार नाही तर काय होणार ? स्वतःसाठी नाही, निदान पोरीसाठी तरी...You must control yourself Mr. Parname ! ( सुनीला " ए आई, माझा डबा कुठे आहे ? अजून नाही ना भरलास ? " )
डॉक्टर : बेटा, श्वास घे बघू नीट...
( सुनीला " तेवढा वेळ नाहीये मला ! आधीच उशीर झालाय ! " )
डॉक्टर : झालं, झालं ! एक मिनीट हं !
( सुनीला " आई माझा दुसरा बूट कुठेय ? " )
डॉक्टर : हं ऽ ! आता ' आ ' कर बघू जरा– आ ऽ ऽ
( सुनीला " तो काय करायचाय ! पी. टी. ला कॅनव्हासच लागतो ! नाहीतर बाई ओरडतात ना ! " )
आई : डॉक्टर, हिला शाळेत जाऊ द्यायचं ?
डॉक्टर : नाही नाही ! अजिबात नाही ! तिला जराही बाहेरची हवा लागता कामा नये ! ( सुनीला " अरे वारे वा ! मंमी खाऊ काय ? " )
आई : नाही; कालपास्नं शाळेत जायचं घोकत होती म्हणून विचारलं !
डॉक्टर : नाही ! तरीही नाही ! हे पहा... मि. पारनामे, मी एक चिठ्ठी देतो डॉ. साठ्यांसाठी. स्पेशालिस्ट आहेत ते ! आय् सस्पेक्ट ऑफ न्युमोनिया ? ( सुनीला " ए आई मी जाते गं ऽ ! )...

सुनीला : हे काय ! आई माझ्याकडे आज लक्षच देत नाही ...! डबा घेतला का म्हणून विचारलं नाही की, रस्ता क्रॉस करू नकोस, म्हणून बजावलं नाही ! आणि ... आज बाबा घरीच कसे ... ? आणि ... मध्येच ते डॉक्टरकाका !...म्हणे, हिला शाळेत पाठवू नका...! बरं झालं मी आधिच सटकले ऽ ! नाहीतर ... बसावं लागलं असतं घरातच ! चला... अरे देवा, मांजर आडवी गेली ! आता काय करायचं ? आठ पावलं मागे जायचं. एक, दोन, तीन, चार ... पण आज सगळं वेगवेगळं कसं ? हा रस्ता, ही झाडं ! तसं नेहेमीचंच ... सवयीचीच ! तरीही वेगळी, निराळी ... अगदी आमच्या कवितेसारखं !... या फुलपाखरासारखं ... ( एका बाजूनं कुत्र्याचं भयाण भुंकणं ऐकू येतंय. सुनीला एकंदर प्रकाराने थरारलेली ... )

**सुनिला :** बापरे! केवढा मोठ्ठा आहे!...दत्तद्त्तदत्त...दत्तदत्त...दत्तदत्त... असा का दिसतोय हा? टिपू आहे की काय? अय्या! हो, टिपूच! रोज कसा शेपटी हलवत माझ्याजवळ येतो! मंमी त्याला डब्यातलं काहीतरी खायला देते...मग आजच कसा, असा अंगावर आला? न् आज तर माझ्याकडे डबासुद्धा नाही! अरे हो, आज आपल्याकडे डबा नाही नै का?... मं मधल्या सुट्टीत काय करायचं? कबुतरांकडे बघत बसायचं? नाही तरी वर्गात कंटाळा आला की तेच करायचं असतं! कबुतरं! कबुतरं कशी मान फुगवून मस्त आवाज करतात... नै? (कसला तरी आवाज घुमत रहातो)... पण हा आवाज कबुतरांचा नाही! मं कशाचाय?...बापरे! कायाय ते? तारेवर लोंवकळणारं? चिकटलंय की काय — शॉक् लागून? उडालं, उडालं, उडालं!... हं ऽ! म्हणजे जिवंत होतं? मेलं नव्हतं?...तात्पुरतं मेलं असेल! गंमत म्हणून? असेलसुद्धा!...एकदा नै का, बाबांनी आईला जाम मारलं! म्हणाले, "मर! मर साली...मर!" तेव्हा आईबरोबर मी सुद्धा मेले! गंमत म्हणून...तर त्या दिवशी बाबांनी आईला... (इतक्यात एक मोठ्ठी सावली न् मागोमाग एक प्रचंड माणूस तिच्याकडे 'हेलकावे' खात येतो.)...ए, कोणेस तू? चल, बाजूला हो! चल! अरे, मला शाळेत जायचंय, आधीच उशीर झालाय!... (तो माणूस जणू 'तिने शाळेत जाऊ नये' अशी इच्छा धरून बसतो.)... अरे, उशीर झाला तर बाई वर्गात घेत नाहीत! हजेरी पण लावीत नाहीत! शी ऽ! तुझ्या तोंडाला किती वास येतोय? अगदी आमच्या बाबांसारखा! काय रे? तू तोंड नाही धूत? तुझं तोंड बघ, पान खाऊन कसं लाललाल झालंय —! रक्त आल्यासारखं! अरे, अरे! माझ्या अंगावर उडेल ना! आणि काय रे, तुझा ड्रेस कुठाय? ड्रेस! तसं — आमच्या वडनेरकरबाई तरी कुठे घालतात म्हणा ड्रेसबिस!.. तरी तुमची हजेरी कशी लागते?...काय रे? आत्ता झालेले टोल ऐकलेस? किती झाले? दहा? नऊ? की अकरा? मी मोजायलाच विसरले! नेहमी मोजते रे ऽ पण आज...? टोले कशासाठी होतात रे? वेळेवर जाण्यासाठीच ना? मं आमच्या वडनेरकरबाई मोजतात टोले? मं त्या कशा वेळेवर येतात? पुस्तकाशिवाय कसं शिकवतात? त्या हजेरी-पत्रकात काय लिहितात? माहित्ये तुला? मग सांग ना...सांग की... ए ऽ असं काय करतोस? सांग ना ऽ... ("चल सुनीला निघ! तुझी वेळ झाली." हे वाक्य पुनः पुन्हा ऐकू येत रहाते...त्या माणसाची आकृती हिंदकाळत नाहीशी होते. सुनीला शहारते.)... हो रे हो... निघायला हवं मला...नाहीतर...नाहीतर...अय्या! कुठेतरी नाच-गाण्यांच्या तालमी चालल्यात वाटतं! शाळेतच की काय? हो!

गॅदरिंग...गॅदरिंग जवळ आलेलं दिसतंय... ( कव्वाली म्हणत म्हणत बीभत्स हातवारे करत एक छक्का सुनीलाच्या दिशेने धावत येतो. ) ...अहो बाई ! अरे...तू कोण आहेस ? अन् आपल्या बाई कुठे आहेत ? अगं, सांग ना, अरे...अगं...तुला अरे म्हणू की अगं म्हणू ते सुद्धा कळत नाही !

( त्या छक्क्याच्या तिच्याभोवती फेर धरून नाचण्याने ती गांगरून वाट फुटेल तिकडे पळत सुटते...छक्का हसत रहातो...रानवट !... )

( एका पायरीवर एक गुरखा बसलाय. सुनीला धावत येते. गुरख्याला पाहून दचकते. ) ( सीन लांबवणे )

**सुनीला** : ए गुरखा, गुरखा ! इथं माझी शाळा होती ना ?

**गुरखा** : शाला ?

**सुनीला** : शाळा—शाळा !

**गुरखा** : शाला-वाला कुछ नही !

**सुनीला** : नाही कशी ? मी यायची नं रोज इथे ? हीच दुकानं, हेच मैदान ! अगदी बिल्डिंगसुद्धा हीच ! पण मग नाव कसं नाही आमच्या शाळेचं यावर ?

**गुरखा** : क्या नाम बोला ?

**सुनीला** : नाव...नाव नाही आठवत शाळेचं !

**गुरखा** : तुम्हारा ! तुम्हारा नाम पुछा मैंने...

**सुनीला** : माझं नाव ?...सुनीला !

**गुरखा** : सुनीला पारनामे ?...तुमकोही हमारा साब मांगता है ! चलो —

**सुनीला** : अरे, पण कुठे ? मला, मला शाळेत जायचंय...

**गुरखा** : डाक्तरसाब कभीसे तुम्हारा राह देखताय...

**सुनीला** : डॉक्टरकाका ? पण ते इकडे कसे आले ?

**गुरखा** : अरे पगली, ये हॉस्पीटल है...हॉस्पीटल ! Mental Hospital !

**सुनीला** : म्हणजे काय ?

**गुरखा** : वो सब तुम साबकोही पुछो ! चलो ! ( तो तिला बळजबरीने उचलून आत घेऊन जातो. टेबलावर दाणकन् आदळतो. टेबलाभोवती ४-५ डॉक्टरांची कोंडाळी. )

**डॉ. 'अ'** : हं ! बराच परिणाम झालेला दिसतोय हिच्या मनावर !

( सुनीलाच्या हालचालींचा, बोलण्याचा इतरांशी काहीही संबंध नाही. )

**सुनीला** : तुम्ही ? तुम्ही सगळेजण कोण आहात ? दिसता तर आमच्या डॉक्टर-काकांसारखे. पण...तुम्ही सगळे बगळे आहात बगळे ! पांढरे फटक ! हे बघा, मला चोची मारू नका हं ! आधीच मला बरं नाहीए !

डॉ. 'ब' : कसली तरी अनामिक भीती वाटत्येय हिला—!

सुनीला : ह्यः! भीती म्हणे – भीती! तुमच्यासारख्या बगळ्यांना कोण भितंय? मी काही आता लहान नाहीय! एकटी शाळेत जाते! अं हं! हे बघा, माझ्याजवळ येऊ नका हं! का काय? तुमच्या अंगाला, औषधांचाच एक रोगट वास येतोय! लांबून– हं! नाहीतर मी गुरख्याला बोलवीन! गुरखा ऽ! ए गुरखा ऽ!

डॉ. 'क' : हिला जर अशीच भीती वाटत राह्यली तर पुढे मागे वेडी झाल्याशिवाय राहणार नाही!

सुनीला : गुरखाऽ! ए गुरखा!... नको, गुरखा नकोच! तो पकडून न्यायचा मलाच, न् या बगळ्यांना नेऊन बसवेल शाळेत! म्हणजे पुन्हा माझी शाळा बुडणारच!

डॉ. 'अ' : शिक्षणाचा म्हणावा तर तसा ताण दिसत नाही! उलट मघापास्नं शाळेत जायचं म्हणत्येय ती!

डॉ. 'ब' : नाही; पण कसलातरी ताण आहे निश्चित!

डॉ. 'ड' : (उच्चार बोबडे)... कसला आलाय ताण नी कसलं काय! तिला 'लिनोलिया' झालाय 'लिनोलिया'!

डॉ. 'क' : अहो डॉक्टर, लिनोलिया काय! न्युमोनिया म्हणा न्युमोनिया!
(सगळे बगळे हसतात.)

सुनीला : "काय मस्त शब्द आहेत नाही?" न्युमोनिया...लिनोलिया...डेलिया
या बाई या– या बाळांनो सारे या, लवकर भरभर सारे या,
मजा करा रे मजा मजा! आज दिवस तुमचा समजा—

डॉ. 'अ' : तिला Complete bedrest द्यायला हवी!

सुनीला : स्वस्थ बसे— तोचि फसे!... नवभूमी—दाविन मी...!

डॉ. 'ब' : तिला जागची हलू देऊ नका!

सुनीला : अरे, वा रे वा! म्हणे जागची हलू देऊ नका! शहाणेच की नै! पांढरे कपडे घातले म्हणून काहीही बोलायचं का? ते काही नाही... मी शाळेत जाणार! जाणार म्हणजे जाणार! अशी किंवा तशी...

(सुनीला आता घरी आलेली...)

सुनीला : आई, मी शाळेत जाऊ ना गं!

आई : मी तरी काय सांगू? मला काहीच कळत नाहीये — साडेबारा वाजून गेले. अजून यांचा पत्ता नाही, मी एकटी तरी कायकाय करू? रोजचंच आहे हे — रात्ररात्र वाट पहायची — पुन्हा आपलं मन हे असं — काहीतरी वेडंवाकडं येत रहातं मनात! (बाबा येतात —

प्यायलेलेच – धडपडतात )... अगबाई, कुठे पडला विडलात की काय ? काय दशा करून घेतलीय स्वतःची ! चला जेवून घ्या बरं...

**बाबा** : नकोय मला काही ... च्यायला सिग्रेट कुठं गेली ?...

**आई** : अहो असं काय करता ? चला, जेवून घ्या तर आधी !

**बाबा** : नको म्हटलं ना ! कान फुटलेत का तुझे ? माझी सिग्रेट कुठेय ? ( सुनीलाला ) ... चल ए, सिग्रेट आण — लवकर ... Please !... ( सुनीला जाते. )

**सुनीला** : ( घराबाहेर ) बाबा सिग्रेट कशाला ओढतात ? काय असतं त्यात, कुणास ठाऊक ! पण धूर किती छान दिसतो नै ?... धुराचे निरनिराळे आकार...ढगासारखे दिसतात एखाद्या ! हत्ती, घोडे, सिंह ... आपणही पहावी का एखादी ओढून ?... ( जाते. )...

**आई** : ... तिला कशाला पाठवलीत ? मी नसते का गेले ?

**बाबा** : तुला काय वाटलं ?— तुला जास्त कळतं ?

**आई** : असं कुठं म्हटलं मी ... पण तिची तब्येत !

**बाबा** : म्हणाली नाहीस, पण दाखवतेस तर तसंच !

**सुनीला** : ( घराबाहेर ) ... काय मिळतं सिग्रेट ओढून ? मला वाटलं, पाणी प्यायल्यावर कसं पोट भरतं ना, तसं काहीतरी होत असेल...पण... ( पुन्हा सिग्रेटचा झुरका मारते. ठसका लागतो, ती सिग्रेट फेकते. तिला बाबांना लागणाऱ्या ठसक्याची, खोकल्याच्या उबळीची आठवण येते– ती थरारते ... वातावरणात प्रचंड बदल...)

**सुनीला** : ... अगबाई, एकाएकी अंधार कसा काय झाला ? वाजले किती ? शाळा सुटायची वेळ तर नाही झाली ? मग इतका वेळ चालूनही शाळा येत नाही म्हणजे काय ? रस्ता चुकला कि काय ? बापरे ऽ आता काय करायचं ? ... रस्ता चुकला की पोलिसांना सांगायचं ! पण या असल्या जंगलात पोलिस तरी कसे येतील ? तेही घर विसरले तरच येतील ! ( पावलांची सळसळ ) ... अगबाई, कुणीतरी इकडंच येतंय !...आता काय करावं ? कुणाला सांगावं ? ही शाळाही मेली येत नाही ! थंडी पण कशी भरून आलीय एकाएकी ? ( चवक एक मिलिटरीची पलटण खाड् खाड् करीत सुनीलाभोवती येऊन उभी राहाते. ) ... अय्या ! पोलीसच की काय ? काहो, तुम्ही पोलीसच आहात ना ? की दुसरेच कोणी आहात ? तुमची पण शाळा हरवलीय का हो ? की तुम्हीच हरवले आहात ? काही का असेना, तुमचा हा ड्रेस किती छान आहे हो ! हे बूट, हा पट्टा — ही बंदूक ! अय्या, तुरा किती टॉप आहे हो ! मी घेऊ का हो — मी घेऊ ? सांगा ना — कसल्या पिसांचाय

हा ? कबुतरांच्या ? मग ही पिसं लाल कशी, रक्त आल्यासारखी ? मेलेलं होतं कबुतर ?... ( शहारते. ) ... पण तुम्ही थांबलात का; चाला ना ! चाला की ! तुम्ही चालायला लागलात ना, की मला माझी आई आठवते, — शिकेकाई कुटणारी आई !... हे काय तुम्ही बंदुका कशाला काढल्यात ? काय, विचार काय आहे तुमचा ? मी ... मला ... ( ती पुढे काही बोलण्याआधीच सगळेजण तिच्या शरीराच्या चिंधड्या उडवतात !... ती 'आऽई- !' असं किंचाळून पुन्हा सैरावैरा पळू लागते ... )

( रस्त्यावर एक डोंबारी – कसलासा खेळ करतोय – डोंबारी कसला, रस्त्यावरचा जादूगार. भोवती चिक्कार गर्दी. सुनीला गर्दीत येऊन मिसळते — )

**डोंबारी :** हां, तो बच्चेलोग, फिर एक बार दिलचस्पीसे ताली बजाव !... और खेळ देखनेके पहले, इस ताविजकी कम्माल देखो ! ये वो ताविज है: जो बडेबडे राजा-महाराजाओंसे लेकर, तुम्हारे – हमारे जैसे गरीबों के भी काम आता है ! जो भी दर्द है — 'दिलमें, दिमागमें, शरीरमें — मस्तिष्कमें ये निकाल डालेगा ! रात को चैनसे नींद आयेगी ! लेकीन साहब, जरा सम्हलके ! जो भी साहब इस ताविजको लेकरके ऽ कपाट में बंद कर दिया,— समझो के इसका हगना-मुतना ही बंद हो गया !... क्या करना चाहिए ? 'आव ' बताता हूँ ! कोईभी एक लडका या लडकी सामने आ जाय ! (सुनीला पुढे होते) क्या नाम है तुम्हारा ?

**सुनीला :** सुनीला !

**डोंबारी :** आज खाना नही खाया ? जरा जोरसे बोलो !

**सुनीला :** सुनीला पारनामे —

**डोंबारी :** हां तो बेबी, तू डरेगी नही ? चिल्लाएगी तो नही ? शाब्बास ! हां तो भाईजान, लो, हमने ये ताविज बेबीको दे दिया !... मुठ्ठी बंद करो बेबी, कहीं ताविज उडने न पायें !...ताविज उड गया, तो एक रुपिया देना पडेगा ! हां भाईसाब...इसकी किंमत सिर्फ एक रुपिया ! अरे, रुपिया क्या चीज है ? एक वक्तका खाना खाया, थूक दिया ! लेकिन जीवनभरके दुखदर्द मिटानेके लिए 'वो' काम नहीं आया ! ( कसला तरी मंत्र म्हणतो — फुंकर — बासरी — सर्व सोपस्कार ) ... लो हमने मंतर डाल दिया ! बेबीका हाथ अकड गया ! बेबी हिल नहीं सकती — चिल्ला नहीं सकती —

**सुनीला :** अग आई ग ! माझा हात असा जड कसा झाला एकदम ? काय झालंय

माझ्या हाताला ? सगळ्या शरीराला मुंग्या आल्यायेत — आणि हा हात मात्र वरवंट्यासारखा — आई, आई, मी काय करू ?

**डोंबारी** : बेबी हिल नहीं सकती, चिल्ला नहीं सकती, हाँ ऽ ऽ मगर हम कोई ऐसा–वैसा काम नहीं करेगा ! रजपूत है हम ! रजपूत की जवान कभी नहीं बदलती ! एक दफा जवाँ दी ऽ — तो समझो दी ही ! ... लो बेबी...मैं...

(एकही शब्द सुनीलाला ऐकू येत नाही. तिच्यासमोर एकच दृश्य 'आपला हात जड झालाय, अन् 'तो' खरोखरची जीभ — रक्तानं बरबटलेली तिच्या हातावर ठेवतोय. आवाजांचा कल्लोळ चालूच आहे. 'आई, आई, वाचवा कुणी तरी' म्हणत जीव घेऊन सुनीला पळत सुटते — तिच्यामागे तो रजपूत डोंबारी... )

**सुनीला** : (रस्त्यावरील एका बाईला) ...अहो बाई, मला सोडवा हो — मला कुणी तरी मागं ओढतंय ! मला शाळेत जायचंय, न् हे लोक मला जाऊ देत नाहीयत, कुठे तरी नेतायत ! आधीच उशीर झालाय मला ! -- वेळेवर गेले नाही तर वडनेरकरबाई वर्गातसुद्धा घेणार नाहीत हो — अहो बाई, आधी माझ्या हातातला हा ताईत काढून टाका हो — (ती बाई सुनिलाच्या शरीरावरून हात फिरवते, ताईत वगैरे काही नाही)... अहो बाई, तुमचे हात किती मऊ आहेत हो ! नाही तर आमच्या वडनेरकरबाई ! हात कसले त्यांचे — काटे आहेत काटे ! पण बाई, तुम्ही रडता कशाला ? — (एक पुरुष) ... तुम्ही याला भिता ? हा माणूस कोण आहे तुमचा ? बाई, रडू नका...मी आहे नं...

**पुरुष** : (बाईला) — चऽले, उठ ! इथे पळून आलीय काय ? तुला सोडणार नाही असा — ! चल पैसे काढ — रडून दाखवू नको मला — पैसे काढ !

(पुरुष त्या बाईला गुरासारखा मारतो — )

**सुनीला** : का हो, या बाईंना कशाला मारता ? मारू नका हो — नका ना मारू !

(सुनीला बाईच्या अंगावर पडते...पुरुषाच्या अंगातलं जनावर खवळलेलं...तो सुनीलाच्या अंगावर घाव घालतो...पुनः पुन्हा सुनीलाच्या अंगावर काठी...एकदम — )

**सुनीला** : मिळाली ! मला माझी शाळा मिळाली — ! हीच, हीच माझी शाळा ..इथंच यायचं होतं मला...शाळा, माझी शाळा — पडकी मोडकी, पण माझी !...इतके दिवस कुठेच्या कुठे भटकत होते मी ! आता कसलीच काळजी नाही ! अगदी रक्ताच्या चिळकांड्या जरी उडाल्या ना, तरी मी भिणार नाही ! कुणी माझी मान कापली — तरी मी

रडणार नाही !...अरे वा...! शाळेत आल्यावर कसं अगदी हलकं हलकं वाटतं नाही ?...मोकळं मोकळं ! ...घरी ?— घरी कधी काय होईल याचा नेम नाही ! सदान्कदा जखडल्यासारखं वाटतं, कोंडल्यासारखं ! ते घरच इतकं उजाड न् भकास होतं, की बापरे बाप !... कधी कधी रडायचं, ओरडायचं, शिव्यासुद्धा द्यायचं !...पण शाळा, शाळा हसते— बोलते — गातेसुद्धा...शिवाय शाळेत कसलीच भीती नाही ! कारण शाळा नेहमी दुपारची ! त्यामुळे अंधार नाही, सावल्या नाहीत, — आईच्या दबलेल्या किंकाळ्या नाहीत — वेडंवाकडं चालणं नाही — सगळं कसं नीटनेटकं, न् वेळच्या वेळी होणारं...आधी घंटा—मग प्रार्थना — मग हजेरी — मग ... अरे, हे काय ? शाळा भरली वाटतं ! प्रार्थना पण झाली की काय ? न् शाळा आज गप्प कशी ? कुणी पाव्हणेबिवणे येणारेत ? कोण जाणे बाई ? बाई...बाई...मी आत येऊ ?...

( सुनीलाचा आवाज कुणालाच ऐकू येत नाही — वर्गातल्यांचा मात्र तिला येतो — बाई हजेरी घेतायेत — ' हजर ', ' नमस्ते ' मध्येच " सुनिला पारनामे " या नावाचा पुकारा — )

**विद्यार्थिनी** : बाई, तुम्हाला कळलं नाही ? सुनिला पारनामे कालच न्युमोनियानं वारली !

पडदा

■ ■ ■

## लेखक-परिचय

### शफाअत खान

बी. एस्सी.
राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझरमध्ये नोकरी.
लेखन – बारा लघु आणि तीन दीर्घ एकांकिका–लेखन आणि निर्मिती.
दूरदर्शनच्या आणि आकाशवाणीच्या अनेक कार्यक्रमांसाठी लेखन–दिग्दर्शन.
अनेक एकांकिकांचे अन्य भाषांतून भाषांतर. उदा. गुजराती, हिंदी, कोकणी.
विविध स्पर्धांतून लेखन–दिग्दर्शनाची पारितोषिके,

प्रयोगासाठी संपर्क :
शफाअत खान
२८ फेमस कॉलनी 'ए'
मुंब्रा – ठाणा – ४००६१२

# क

## शफाअत खान

( निवेदन पडद्यामागून )

पात्रपरिचय
तो : वय वर्षे ४५.
ती : वय वर्षे ४२.
पोलीस : अंदाजे वय ३७.
दरोडेखोर : वय वर्षे ५८
इतर पात्रांचं वय उपलब्ध नाही.

**ती** : किती वाजले हो ?
**तो** : हे तिसऱ्यांदा विचारतेयस.
**ती** : मला कंटाळा येतो.
**तो** : मग तू घड्याळाजवळ बस.
**ती** : बोल ना —
**तो** : सहा सत्तावन झाले.
**ती** : ते नाही.
**तो** : मग ?
**ती** : काही तरी बोला.
**तो** : मला कंटाळा येतो.
( शांतता )
**ती** : हे घर आपण घ्यायला नको होतं.
**तो** : का ?
**ती** : ह्या घरात कंटाळा येतो.
**तो** : एवढं स्वस्त कुठे मिळालं असतं ?
( ऱ्हस्व शांतता )
**ती** : ह्या घराचा मालक खरंच का हो वेडा झाला ?
**तो** : असावा–
**ती** : कशावरून ?
**तो** : नाही तर एवढ्या स्वस्तात घर कशाला विकलं असतं ?
**ती** : कंटाळ्यानंच तो वेडा झाला असेल.

तो : कुणास ठाऊक.
( शांतता )
ती : किती वाजले ?
तो : सहा अठ्ठावन्न —
ती : आता —
तो : काय ?
ती : पुढे काय करायचं ?
तो : रोज सहा अठ्ठावनला काय करतेस तू ?
ती : काहीही नाही.
तो : काय करणार होतीस ?
ती : ठरवलं नव्हतं.
तो : मग आता ठरव.
ती : तोपर्यंत सहा एकोणसाठ होतील. झाले का हो ?
तो : हो.
ती : मग, आता काय ?
तो : आता तू सात वाजता काय करायचं ते ठरव.
ती : इतक्या लवकर कसं ठरवणार ?
तो : तुला ठरवायला किती वेळ लागेल ?
ती : कमीत कमी अर्धा तास.
तो : मग साडेसात वाजता काय करायचं ते ठरव.
ती : मला एकटीला नाही ठरवता येत.
तो : मग...
ती : तुम्ही ठरवा ना.
तो : तू काय करायचं हे मी कसं ठरवणार ?
ती : आपण दोघांनी काहीतरी करू या.
तो : नको.
ती : का ?
तो : सांगितलं ना...कंटाळा येतो.
ती : काही केलं तर नाही येणार.
तो : तू कर काहीही, म्हणजे मग तुझा कंटाळा जाईल.
ती : मी काही केलं तर तुम्ही बघाल ?
तो : कंटाळा आला नाही तर.
ती : मी काय करू ?
तो : कंटाळा...

ती : असं काय ?
( घड्याळाचे टोले )
तो : सात वाजले.
ती : न ठरवताच साडे सात वाजतील.
तो : वाजू देत.
ती : ठरवलं नाही तर काय करणार ?
तो : काहीही.
ती : असं कसं ?
तो : मग ठरव.
ती : तुम्ही सांगा ना... ?
तो : काल साडेसात वाजता...काल काय केलंस ?
ती : बसून होते.
तो : आजही बसून रहा.
ती : रोज रोज काय बसायचं.
तो : मग उभी रहा... तेवढाच बदल.
ती : उभं राहून पाय नाही का दुखणार ?
तो : मग...अं...अं...परवा काय केलंस ?
ती : तुमची वाट पहात बसले.
तो : आज लवकर आलो हे चुकलंच...
ती : थोडं उशीरा आला असतात, तर वाट तरी पाहाता आली असती.
तो : रोज कुणी मरत नाही, त्याला मी काय करू ?
ती : मग त्याच्याच मृत्युबद्दल सांगा.
तो : ते सतरा वेळा सांगून झालं.
ती : परत सांगा...
तो : परत परत सांगण्याइतका काही खळबळजनक मृत्यू त्याला आला नाही.
ती : तेवढाच जर मरता मरता खळबळजनक मेला असता, तर आपले दोन दिवस मजेत तरी गेले असते.
तो : तसा आयुष्यभर तो साळसूद वागला.
ती : मरताना तरी जरा भीषण मेला असता — पण काय... तर म्हणे रात्री झोपला...सकाळी बघतात तर संपलेला.
तो : नसतं एकेकाच्या नशिबात काही सनसनाटी.
ती : अहो, साडेसात वाजतील की एवढ्यात.
तो : हं...
ती : त्यापेक्षा तुम्ही असं करा...

तो : कसं ?
ती : तुमच्या ऑफिसात काय झालं ते सांगा.
तो : काहीच झालं नाही.
ती : काहीतरी झालं असेलच.
तो : काहीही नाही.
ती : असं कसं ?
तो : सरकारी ऑफिसात काही होत नाही.
ती : जोशी आले होते का ऑफिसात ?
तो : नाही.
ती : का ?
तो : त्याची बायको आजारी आहे.
ती : अरेरे...जाऊया का बघायला ?
तो : नको.
ती : का ?
तो : बायको आजारी आहे असं खोटं सांगून, तो सुट्टी घेतो.
ती : दुष्ट ! तुम्ही अशीच सुट्टी घेता का ?
तो : नाही.
ती : यापुढे घ्याल का ?
तो : ऑफिसच्या धोरणावर अवलंबून राहील.
ती : बायको आजारी असल्याशिवाय तुम्हाला सुट्टी देत नाहीत का ?
तो : आई आजारी आहे असं सांगावं लागतं.
ती : जोशी तसं का सांगत नाही ?
तो : आई वारली म्हणून त्यानं मधे एक महिन्याची सुट्टी घेतली होती.
ती : खरंच का हो आई वारली होती ?
तो : वारली असावी...
ती : नक्की काय ? हो की नाही ?
तो : म्युनिसिपालटीत चौकशी करावी लागेल.
ती : तुमचा काय अंदाज ?
तो : वारली नसावी...
ती : कशावरून ?
तो : परवा त्यानं भरलेली वांगी आणली. मी म्हणालो फार सुरेख झाली आहेत. तर तो म्हणाला, 'माझ्या आईच्या हातची वांगी आहेत.'
ती : आता त्याला पंधरा दिवसांची सुट्टी घ्यायची झाली तर ?
तो : सासू वारली असं सांगता येईल.

ती : त्यानंतर ?
तो : बाप, सासरा, काका, काकी, मामा असं कुणीही.
ती : माणसांना नातेवाईक असले की किती मदत होते नाही ?
तो : हो ना...
( शांतता )
ती : भरलेली वांगी खरंच चांगली होती का ?
तो : हं... नुसता चिखल होता.
ती : मग तुम्ही सुरेख का म्हणालात ?
तो : दुसऱ्याचा डबा खाताना असं म्हणावं लागतं. हे राजकरण आहे.
ती : ह्यात कसलं आलंय राजकारण ?
तो : तुला राजकारणातलं कळायचं नाही.
ती : वांग्यात कसलं आलंय राजकारण ?
तो : या देशात वांग्या-कांद्यात राजकारण खेळलं जातं. या देशात माणसं मेली तरी चालतील, कांदे मिळाले नाहीत तर मात्र क्रांती होईल.
ती : हे पहा सव्वासात झाले.
तो : आता पंधरा मिनटांवर साडेसात आले. तरी काय करायचं हे ठरत नाही.
ती : खरंच... काय करायचं ते ठरवा.
तो : तुला काय वाटतं ?
ती : कुणी तरी बोलायला हवं.
तो : कोण ?
ती : कुणीतरी अनोळखी.
तो : अनोळखी माणसं कुठून आणायची ?
ती : तुम्ही असं का नाही करत ?
तो : कसं ?
ती : तुम्ही बाहेर जा.
तो : एवढ्या थंडीत ?
ती : आणि बाहेरून या, अनोळखी माणसासारखे...
तो : बरं, पण ओळख असताना अनोळखी वागायचं म्हणजे...
ती : जमेल हो —
तो : पण तसं वागून करायचं काय ?
ती : काय वाट्टेल ते बोलायचं. फक्त ओळख दाखवायची नाही.
तो : बरं, तर मी बाहेर जायला निघतो.
( खुंटीवरचा शर्ट घेतो. )
( बाहेर जातो— ती दरवाजा बंद करते— तो दरवाजा वाजवतो. )

**ती :** अहो, हळू. एवढयानं काय वाजवताय ?
( तो दरवाजा हळू वाजवतो. )
कोण आहे ?

**तो :** मी.

**ती :** कोण आहे ?

**तो :** मी.

**ती :** कोण ?

**तो :** मी...मी.

**ती :** अहो, पण कोण ?

**तो :** मी. दरवाजा उघड आधी.
( ती दरवाजा उघडते. )

**ती :** असं काय ?

**तो :** नुसतं कोण कोण काय ?

**ती :** 'मी....मी...' केल्यावर कुणी दरवाजा कसा उघडायचा ?

**तो :** दरवाजाबाहेरून दुसरं काय बोलणार ?

**ती :** अहो, नाव सांगायचं.

**तो :** नावाचं कुठे ठरलं होतं ?

**ती :** ठरवायचं.

**तो :** कुणी ?

**ती :** तुमचं नाव दुसरं कोण ठरवणार ?

**तो :** हे नावाचं जमायचं नाही.

**ती :** असं काय करताय ?

**तो :** छे बुवा ! असं तडकाफडकी सुचायचं नाही.

**ती :** प्रयत्न तरी करा —

**तो :** स्वतःचं नाव सांगितलं तर ?

**ती :** मग कंटाळा येईल.

**तो :** माझ्या नावाचा !

**ती :** नावाचा नाही हो —

**तो :** मग ?

**ती :** तुम्ही अनोळखी नसलात तर काय बोलणार ?

**तो :** बरोबर, मी एम्. टी. झाडबुके हे नाव सांगतो.

**ती :** नको, हे नाव कठीण आहे.

**तो :** या नावाचा माणूस आमच्या ऑफिसात आहे.

**ती :** यापेक्षा एखाद्या सोप्या नावाचा माणूस तुमच्या ऑफिसात नाही का ?

तो : मी नुसतंच एम्. टी. म्हटलं तर?

ती : अं...

तो : आता विचार नको, हेच चालवून घे. वेळ वाया जातोय.

ती : बरं बाई...

( तो बाहेर — ती दरवाजा बंद करते — तो दरवाजा वाजवतो )

ती : कोण ?

तो : मी एम्. टी. ...

ती : हं...

( ती दरवाजा उघडते. )

( तो – अभिनय. आवाज संपूर्ण बदललेला. प्रवेश करतो. )

तो : मी आत येऊ का ?

ती : या —

तो : बाहेर थंडी पडलीय —

ती : थंडीचे दिवसच आहेत —

तो : सिमल्याला बर्फ पडला असावा —

ती : तुम्ही —

तो : हो...मी एम. टी.

ती : कळलं — तुमचं काय काम होतं ?

तो : काही नाही.

ती : इथं का आलात ?

तो : सहज — बाहेरून जात होतो...

ती : बरं...

तो : म्हटलं चक्कर टाकावी.

ती : कामाशिवाय अनोळखी माणसांकडे का ?

तो : मला सवय आहे.

ती : काय करता तुम्ही ?

तो : म्हणजे ?

ती : नोकरी की धंदा ?

तो : नोकरी.

ती : कुठे ?

तो : मिलिटरीत.

ती : तुम्ही सैनिक आहात काय ?

तो : नाही, मी मेजर आहे.

ती : युद्धातल्या गंमतीजंमती सांगा ना.
तो : शक्य नाही.
ती : का ?
तो : माझ्या कारकीर्दीत युद्धच झालं नाही. म्हणजे तसं एकदा होणार होतं, वरच्या आदेशावरून आम्ही बंदुका, तोफा वगैरे साफ करूनही ठेवल्या होत्या. पण काही कारणांनी पुढं युद्ध करणं जमलं नाही...
ती : अरेरे...
तो : अर्ध्यावर येऊन युद्ध मोडलं की वाईट वाटतंच हो !
ती : हो ना ! मी केलेली पाच समरगीतं वाया गेली.
तो : आता पुढच्या युद्धाची वाट पहायची; दुसरं काय ?
ती : दुसरं एखादं युद्ध होईल का हो एवढ्यात ?
तो : कुणास ठाऊक !
ती : तुम्ही मेजर आहात ना ?
तो : अहो, नुसतीच आपली साफसफाई, युद्धाचा पत्ता नाही. शेवटी मी कंटाळून नोकरी सोडली ती.
ती : मग आता काय करता ?
तो : नोकरी करायची नाही असं ठरवलंय.
ती : मग पोटापाण्याचं कसं ?
तो : धंद्यावर भागतं.
ती : कसला धंदा ?
तो : हाच आपला...
ती : म्हणजे ?
तो : कपड्याचा...
ती : म्हणजे दुकान आहे ?
तो : हो.
ती : एवढ्या लवकर दुकान बंद केलंत ?
तो : थंडी आहे ना !
ती : तुम्ही स्वेटर विकत नाही वाटतं ?
तो : कधी कधी विकतो.
ती : म्हणजे थंडीत —
तो : उन्हाळ्यातही विकतो.
ती : कोण घेतो ?
तो : स्वस्त असतात म्हणून बरेच घेतात.
ती : कुठून आणता ?

तो : नपाळ.
ती : स्वतः जाता ?
तो : हो...
ती : नेपाळ कुठेसे आहे हो !
तो : दूर...
ती : म्हणजे ?
तो : बरेच दूर, खूपच दूर. बर्फसुद्धा पडतो म्हणे.
ती : खरंच की काय !
तो : तर...
ती : इथे चार आण्याला एवढासा तुकडा मिळतो.
तो : तिथे फुक्कट !
ती : मज्जाच असेल ! तुमच्या बायकोला घरात आईस्क्रीम जमतं का हो !
तो : लग्न झालेलं नाही.
ती : का ?
तो : सहज.
ती : करणारच नाही का ?
तो : बघू...
ती : मग आता घरात कोण आहे ?
तो : सगळेच.
ती : म्हणजे ?
तो : सगळेच...तू कठीण प्रश्न...
ती : शु ऽऽ ओळख दाखवू नका.
तो : म्हणजे सर्वच आहेत...आई, वडील, भाऊ, बहीण, बायको.
ती : बायको ?
तो : भावाची.
ती : लग्न झालंय् वाटतं त्याचं ?
तो : हो. लव्ह मॅरेज.
ती : तुमचं नाही वाटतं तसलं काही...?
तो : छ्या...छ्या...
ती : का ?
तो : म्हणजे...तसं...केलंय लहानपणी.
ती : लहानपणी ?
तो : म्हणजे पंधराव्या वर्षी.
ती : मग ?

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र.... 29380 नों. दि ..6.5.66..

तो : तिचा बाप म्हणाला तंगडं तोडीन...

ती : अरेरे...मग ?

तो : मग काय! सोडून दिली.

ती : का ?

तो : तंगडी महत्त्वाची वाटली.

( काहीच न सुचल्याने शांतता. )

ती : तुम्हाला अक्कलच नाही.

तो : एका अनोळखी माणसाला !

ती : तुम्हाला...तुम्हाला म्हणतेय मी —

तो : का ?

ती : पुन्हा कंटाळा यायला लागलाय.

तो : कंटाळा आलाय म्हणून आज अक्कल काढायची ?

ती : एवढे प्रश्न विचारले, एक विषय रंगवता येत नाही तुम्हाला.

तो : रंगवण्यासारखे प्रश्न तरी हवेत.

ती : घरात कोण आहे विचारलं.

तो : सांगितलं ना आई, बाप...

ती : लोकांना एवढी घरची दुःखं असतात, रंगवून सांगायचं काही तरी. आईला अस्थमा, बापाला पॅरिलिसीस, बहिणीला नवऱ्यानं सोडलेलं.

तो : छे...छे...असं कसं सांगणार !

ती : अहो, वेळ घालवायला कल्पना करायची.

तो : छेः छेः

ती : चांगले मिलिटरीत होतात तर युद्ध व्हायच्या अगोदर नोकरी सोडलीत.

तो : ती मुद्दामच घाईघाईत सोडलीं.

ती : का ?

तो : युद्धाला तोंड फुटलं असतं, तर तू समरगीतं सुरू केली असतीस.

ती : मी म्हणते, समरगीतानं एक राहू दे. एवढं प्रेमाचं विचारलं, ते तरी रंगवता आलं असतं की !

तो : काय रंगवणार ?

ती : एवढे हिंदी सिनेमे पहाता. एखादी सुंदर मुलगी बागेतून हिंडणं, लग्नापूर्वी गर्भ, झालंच तर शेवटी आत्महत्या.

तो : प्रेम कधी केलंच नाही तर...

ती : अहो, फक्त कल्पना करायची.

तो : केली नाही का !

ती : केलीत तीही तंगडी मोडायची.

**तो** : प्रेमात असंच होतं.

**ती** : तुम्हाला काय ठाऊक ?

**तो** : आमच्या एका मित्राचा प्रेमात जीव जाणार होता, पण तंगडीवर निभावला. ती आठवण झाली की अजून लंगडतो तो.
( शांतता )

**ती** : किती वाजले हो ?

**तो** : सात चाळीस...

**ती** : म्हणजे साडेसातनंतर फक्त दहाच मिनिटं झाली. तुम्ही चांगलं रंगवलं असतं तर, आठ तरी वाजले असते. नुसत्या जांभया काय देताय ? कल्पना काढा काही तरी.

**तो** : कल्पनेचं मला परत परत जमायचं नाही.

**ती** : अहो, परत कंटाळा येतोय त्याचं काय ? मार्ग काढा काही तरी.

**तो** : शक्य नाही.

**ती** : तुम्हाला नाही का येत कंटाळा ?

**तो** : उगाच जांभया देतोय का मी ?

**ती** : असं करू या ?

**तो** : कसंही कर —

**ती** : असं काय ?

**तो** : मी आता काही करणार नाही.

**ती** : नुसत्या जांभया देणार का ?

**तो** : जांभयासुद्धा देणार नाही.

**ती** : तुम्ही फक्त बघाल की नाही ?

**तो** : बसल्या बसल्या दिसेल तेवढं बघेन.

**ती** : मी आता बाहेरून अनोळखी बाई म्हणून येते. तुम्ही प्रश्न विचारा.

**तो** : चालेल.

**ती** : प्रश्न नीट विचारा. आणि ओळख दाखवू नका.
( ती बाहेर जाते. तो दरवाजा बंद करतो. बराच वेळ दार वाजत नाही. शेवटी तो दरवाजा उघडतो. )

**तो** : आता एवढ्या काळोखात गेली कुठं ही ?

**ती** : अहो, दरवाजा वाजवायच्या अगोदरच का उघडला ?

**तो** : इतका वेळ कुठे ?

**ती** : अहो मी, जरा नीटनेटकं करत होते. आता बाहेरून येणारी बाई टापटीप नको काय ?

**तो** : अं, हो. हे मी विसरलोच.

( ती पुन्हा बाहेर, दरवाजा बंद, दार वाजतं, तो उत्साहाने दरवाजा उघडतो. )

**तो** : तुम्हाला कोण हवंय ?

**ती** : मला कुणी नको —

**तो** : कुणी नको ?—

( तो धाडकन दरवाजा बंद करतो. )

**ती** : ( बाहेरून ) हे काय, दरवाजा उघडा. अहो, दार का लावलंत ?

**तो** : दरवाजा आता उघडणार नाही.

**ती** : असं काय ?

**तो** : मला कंटाळा आलाय.

**ती** : जांभई द्या... कंटाळा जाईल.

( तो जांभई देतो. कंटाळा जातो, दार उघडतो. )

**ती** : अहो, हे काय! दरवाजा बंद करून घेतलात ?

**तो** : तू म्हणालीस कुणी नको.

**ती** : 'कोण हवंय' तुम्ही मूर्खासारखा प्रश्न विचारलात.

**तो** : प्रश्न बरोबर होता. दारावर आलेल्या बाईला असंच विचारतात. तू मूर्खासारखं उत्तर दिलंस.

**ती** : मी उत्तर द्यायच्या मनःस्थितीत होते का ?

( अतिशय दुःखी )

**तो** : का ? काय झालं ?

**ती** : अहो, मघाशी माझ्यावर बलात्कार झाला होता.

**तो** : सांगतेस काय !

**ती** : तर हो. बाहेर अंधार, चांगला काळोख. तीन गुंड झुडपातून आले. खुनशी हल्ला केला. कपडे फाडलेन नि सरळ बलात्कार केला. केवढं सनसनाटी होतं. तुम्ही प्रश्न विचारून सत्यानाश केला.

**तो** : अगं, एवढा तिघांनी बलात्कार केला, तर किंकाळ्या नकोत का फोडायला ?

**ती** : अहो, बलात्कार तासापूर्वी झाला होता.

**तो** : मग तासभर तू काय तिघांशी गप्पा मारत होतीस ?

**ती** : मी बेशुद्ध पडले होते — चांगली तासभर.

**तो** : बेशुद्ध ?

**ती** : अहो, आता बलात्कार झाल्यावर बेशुद्ध नको का व्हायला ?

**तो** : तेही खरच. पण तू शुद्धीवर कशी आलीस ?

**ती** : बेशुद्ध पडून कंटाळा आला. म्हटलं चला, येऊ शुद्धीवर.

तो : तू मूर्खच आहेस !
ती : अहो, बलात्कारानंतर बेशुद्ध पडण्याची पद्धतच आहे.
तो : ते म्हणत नाही मी. अगं, एवढा तुझ्यावर बलात्कार झाला होता, तर दाराबाहेर तू नीटनेटकं काय करत होतीस ?
ती : अहो, बाई टापटीप असल्याशिवाय का तिच्यावर बलात्कार होईल ?
तो : पण तू एवढ्या काळोखात बाहेर काय करत होतीस ?
ती : वरच्या देवीला निघाले होते.
तो : काळोखात ?
ती : तसं व्रत केलं होतं —
तो : छे, छे !
ती : डोक्याचे केस तासण्यापासून ते जिवंत मूल कापण्यापर्यंत कसलंही व्रत करता येतं आपल्याकडे.
तो : पण कशाला व्रत ?
ती : मुलगा व्हावा म्हणून.
तो : हे...हेच चुकतं, मुलींना आपण कमी लेखतो. पाच-पाच मुली झाल्या तरी मुलासाठी व्रत करतो.
ती : अहो, पण मला मूलच झालेलं नव्हतं.
तो : असं होय ! मग हरकत नाही.
ती : केवढं सनसनाटी करायचं मनात होतं, पण तुम्ही एका प्रश्नात अख्या बलात्काराची वाट लावलीत. तुम्हाला सनसनाटी वाटली की नाही ?
तो : छे ! एक तर मी हे सगळं कुठं तरी वाचलेलं होतं. आणि दुसरं म्हणजे, बलात्कार झालेली बाई दारावर आली तर काय सनसनाटी आहे त्यात ? त्या तिघांत मी एक असतो तर जास्त सनसनाटी वाटलं असतं. (शांतता)
ती : किती वाजले हो ?
तो : परत परत तेच विचारलंस तर मला जांभई येईल.
ती : मी परत बाहेर जाऊ का ?
तो : जा —
ती : नीट प्रश्न विचारा. नाही तर पुन्हा वाट लावाल.
तो : आता तू किंकाळ्या फोडणार आहेस ना ?
ती : छे, छे ! आता माझ्यावर बलात्कार झालेला नाही.
तो : मग ?
ती : ते कळेलच.
तो : आता जरा भारतीय स्त्रीचं वेगळं रूप दाखवा. नाहीतर आपलं भारतीय

स्त्री म्हटली, की नुसता आपला अन्याय, अत्याचार असं व्हायला नको. त्याचा कंटाळा येतो...

**ती :** वास्तवाचं दर्शन घडवते.

**तो :** वास्तव काय ? कुणी परकीयांनी असं पाहिलं तर त्यांना वाटेल, भारतीय पुरुष फक्त बलात्कारच करीत हिंडतात.

**ती :** तुमची भाषणं नकोत. प्रश्न जरा नीट विचारा म्हणजे झालं.

(ती बाहेर जाते. दरवाजा बंद, दार वाजतं — तो उघडतो.)

(ती डोक्यावरून पदर)

**तो :** हं...आपण...

**ती :** मी आत येऊ का ?

**तो :** वा:, या ना. बसा —

**ती :** मी...

**तो :** हो. हो, आपण इथं...

**ती :** मी निवडणूक प्रचाराला जात होते.

**तो :** म्हणजे देशात पुन्हा निवडणुका सुरू झाल्या की काय ?

**ती :** या लोकसभेच्या नाहीत.

**तो :** विधानसभेच्या असतील.

**ती :** छे हो!

**तो :** मग ?

**ती :** या नगरपालिकेच्या आहेत.

**तो :** आपण निवडणुकीला उभ्या आहात वाटतं ?

**ती :** हो ना —

**तो :** बोलूच नका, आपलं मत तुम्हाला.

**ती :** मी मत मागायला नाही आलेले.

**तो :** मग ?

**ती :** मी प्रचाराला निघाले होते.

**तो :** म्हणजे तुम्ही आता इथे प्रचार-सभा घेणार की काय ?

**ती :** नाही. मी प्रचार संपवून निघाले होते.

**तो :** मग ? —

**ती :** रस्त्यात गाडी बंद पडली.

**तो :** वा ! वा !

**ती :** आजूबाजूला काहीच नाही वाटतं ?

**तो :** छे, छे, ही जागा गावापासून दूर आहे.

**ती :** म्हटलं, कुणी बघायला जाणकार मिळतो का !

तो : गाडी कुठे ठेवलीत ?

ती : इथून मैलभर दूर.

तो : तिथून इथपर्यंत चालत आलात ?

ती : गाडी बिघडली नाही का ?

तो : विसरलोच. काय बिघाड झाला ?

ती : टायर फाटला असावा.

तो : अरेरे ! आमच्या घरातही एखादा टायर नाही. सायकलचा एक टायर असेल.

ती : तो काय कामाचा !

तो : तेही खरंच. सहज होता पडून...म्हणून म्हटलं.

ती : प्रश्न विचारा ना !

तो : नगरपालिका काय म्हणते ?

ती : ठीक आहे.

तो : निवडून आल्यावर काय करायचं ठरवलंय ?

ती : शहरात एखादा ब्लॉक घेईन म्हणते.

तो : ते नाही हो, लोकांचं काय करायचं ठरवलंय ?

ती : हेच.

तो : काय ?

ती : अहो हेच आपलं...

तो : काय ?

ती : काय, काय–काय ? हा काय प्रश्न आहे ?

तो : नागरिकशास्त्र येत नाही, तर तुला निवडणुकीला उभं रहायला कुणी सांगितलं होतं ? म्हणे नगरपालिकेची निवडणूक –

ती : तुम्हीच सांगितलंत भारतीय स्त्रीची वेगळी प्रतिमा...

तो : भारतीय स्त्रीने अत्याचार करवून घ्यावेत किंवा निवडून येऊन इतरांवर अत्याचार करावेत असा काय नियम आहे ?

ती : तुम्ही माझं नागरिकशास्त्र काढू नका.

तो : नाही तर काय, नागरिकशास्त्र पक्कं हवं माणसाचं.

ती : नेपाळ कुठे आहे ते मघाशी सांगता येत नव्हतं तुम्हाला.

तो : नेपाळ कुठे आहे हे नागरिकशास्त्रात येत नाही.

ती : माहीत आहे.

तो : ते भूगोलात येतं.

ती : तुम्हाला भूगोल येतो का ?

तो : नागरिकशास्त्र महत्त्वाचं...
ती : भूगोल महत्त्वाचा-
तो : नागरिकशास्त्र...
ती : तुम्ही भांडू नका.
तो : भांडण तू काढलंस...
ती : नागरिकशास्त्र कुणी काढलं ? मी की तुम्ही ?
तो : पण म्हणून काय तू माझा भूगोल काढावास ?
ती : भांडण थांबवा नाहीतर कंटाळा येईल.
तो : मला येतोच आहे.
ती : नुसते आठ वाजले.
तो : हेच नागरिकशास्त्र पक्कं असतं, तर नवाला मरण नव्हतं. अख्ख्या नगरपालिकेच्या कारभाराची चर्चा झाली असती. किती समस्या आहेत ! दिवाबत्ती, संडास, हॉस्पिटल, सार्वजनिक आरोग्य, पाणी... मी उभा असतो तर निव्वळ पाण्याचीच चर्चा नवापर्यंत चालली असती.
ती : पाण्याची करली चर्चा –
तो : पाण्याच्या जिवावर कितीतरी बायका दिल्लीपर्यंत निवडून जातात. बाय द वे, तुझी निशाणी तरी काय होती ?
ती : पाय –
तो : पाय ?
ती : होय, उज्ज्वल भविष्याकडे नेणारा पाय.
तो : आणि स्लोगन काय होतं ?
ती : पायाला तरणोपाय नाही.
तो : त्यापेक्षा ‘एक पाय, करील काय’ हे बरं दिसलं असतं.
ती : तुम्ही टिंगल करा, कवितेतलं तुम्हाला काय कळतंय ?
तो : पाच समरगीतं रचून तू स्वतःला...
ती : युद्ध सुरू होऊ द्या, मग तुम्हाला माझी किंमत कळेल.
तो : हं —
ती : तुम्ही उभे राहिलात तर काय निशाणी द्याल ?
तो : मी उभा राहणार नाही —
ती : का ?
तो : कारण निशाणी द्यायला शरीराचा कुठलाच अवयव आता माझ्यासाठी उरलेला नाही.
ती : निशाणीचं सुचत नाही, तर पुढचं काय जमणार... ?
तो : पण मी उभा रहात नाहीये.

ती : कंटाळा येतोय, तुम्ही उभे रहा.
तो : उभा राहिल्यावर मला नाही का कंटाळा येणार ?
ती : उभं राहिल्यावर कंटाळा आला असता तर, एवढे उमेदवार उभे राहिले असते का ?
तो : तेही खरंच —
ती : तर मग राहाताय ना उभे ?
तो : छे छे ! उभं रहाणं मला खरंच जमणार नाही.
ती : उभं रहात नाही, तर निदान दुसरं तरी काही करा.
तो : काय ?
ती : काही तरी सनसनाटी ! खूप थरकाप उडवणारं काही तरी.
तो : कथा-विथा चालेल का एखादी ?
ती : कथा नको, प्रत्यक्ष रक्त सळसळलं पाहिजे.
तो : हं—
ती : सुचतं का काही ?
तो : हं...सुचल्यासारखं वाटतंय. ( यापुढचं सर्व दृश्य उत्साहात )
ती : अगदी सनसनाटी आहे का ?
तो : तर —
ती : सांगा तरी ?
तो : काय ते एकदा सांगितलं की, नंतर तुला ते सनसनाटी वाटणार नाही.
ती : पण कल्पना तरी द्या.
तो : छेः छेः
ती : असं काय ? नुसती गाईड लाईन तर द्या.
तो : छे, छे. सांगितलं की, हवाच निघून जाईल.
ती : बरं, तुम्ही खून करणार का ?
तो : छे, छे, खून काय करायचा.
ती : पण भयंकर भीती वाटेल ना ?
तो : शंकाच नाही. कल्पनेनं मला आत्ताच घाबरायला होतय.
ती : तुम्ही घाबरू नका हो. तुम्हीच घाबरलात तर मग, पुढे सनसनाटी काय करणार ?
तो : तुझा अगदी थरकाप उडेल बघ.
ती : खरंच की काय ?
तो : तर ..एखाद वेळेस बेशुद्धही पडशील.
ती : अगोबाई...सांगताय काय !
तो : बघशीलच तू ...

ती : बेशुद्ध पडल्यावर कसं बघणार ?
तो : आता उगाच शंका कुशंका नको.
ती : दरवाजा वाजवाल ना ? वाजल्यावर लगेच उघडू ना ?
तो : काय करायचं ते तूच ठरव.
( तो बाहेर जातो, ती दरवाजा बंद करते. बराच वेळ काही नाही. गूढ संगीत—तेवढीच गूढ आणि भयसूचक प्रकाश–योजना. मग किंकाळ्या, ती खूपच आनंदात. दार उघडते. तो लंगडत आत येतो. )
तो : आँ...
ती : ( बेशुद्ध पडते. )
तो : बेशुद्ध पडलीस की काय ? अगं, शुद्धीवर ये, आं...
ती : (—)
तो : अगं, शुद्धीवर ये. आयोडेक्सची बाटली कुठं ठेवलीयस ?
ती : तुम्हाला अक्कल आहे का ?
तो : तू शुद्धीवर आलीस का ? आयोडेक्स...
ती : बेशुद्ध पडल्यावर आयोडेक्स लावतात का ?
तो : आयोडेक्स मला हवंय...
ती : आता आयोडेक्स कशाला ?
तो : अगं, पडलो काळोखात. पाय मुरगळला.
ती : कसे पडलात ?
तो : मी सनसनाटी करायला खिडकीवर चढत होतो.
ती : मग ?
तो : मग काय ! हात सटकला आणि सरळ खड्ड्यात पडलो.
ती : अरेरे... !
तो : अरेरे काय ? एवढ्या जिवाच्या आकांताने किंकाळ्या फोडल्या, ऐकल्या नाहीस का तू ?
ती : ऐकल्या. मला वाटलं सनसनाटी सुरू झालं.
तो : सनसनाटी गेलं खड्ड्यात. आयोडेक्स शोध आधी.
ती : खूपच लागलं का हो ?
तो : कळ मस्तकात गेली. एवढ्यात पाय सुजेल सुद्धा...
ती : मला वाटलंच होतं. तुम्हाला हे काही जमायचं नाही.
तो : आं...पाय तुटलासुद्धा असेल कदाचित, कापायला लागला नाही म्हणजे मिळवली.
ती : एवढ्या वर कशाला चढायचं ?
तो : खिडकी वर आहे त्याला मी तरी काय करू ?

ती : दारातनं आला असतात तरी चाललं असतं.

तो : आँ...इथलं हाड मोडलं वाटतं ?

( शांतता. तो फक्त कण्हतोय )

ती : हे पहा, आठ वाजून गेले.

तो : आँ —

ती : एवढयात नऊसुद्धा वाजतील. तुम्हाला जांभया येत नाहीत का ?

तो : आँ...

ती : जांभई दिलीत की काय ?

तो : जांभई काय देणार ?

ती : का ? कंटाळा येत नाही ?

तो : कळा येतायत...

ती : तुमचं बरं आहे —

तो : काय बरं आहे ?

ती : तुमचा पाय तरी मोडला. तुम्ही बसाल पायाचं कौतुक करत. तुम्हाला कळा येतायत. मला कंटाळा येतोय त्याचं काय ?

तो : तुझाही कंटाळा जाईल.

ती : कसा जाणार ?

तो : अगं, रात्रभर पायाला आयोडेक्स, झालं तर अधून-मधून गरम पाण्याचा शेक, सकाळी डॉक्टर, मग एक्सरे, गोळया, इंजेक्शन्स्...

ती : खरंच की हो. हे माझ्या लक्षातच आलं नाही ! ( अतिशय उत्साहात )

तो : शिवाय पायाचं ऐकून लोक गर्दी करतील ते वेगळंच.

ती : तुमच्या ऑफिसातले येतील का हो सगळे ?

तो : तर...यायलाच हवं. हातपाय काय वारंवार मोडतात ?

ती : ते आले की तुम्ही बोलू नका. मीच सांगेन सगळं. झालंच तर, ती खिडकी आणि तो खड्डाही दाखवता येईल. कार्यक्रम ठरवायचा का ?

तो : कशाला ?

ती : गोंधळ नको व्हायला ऐनवेळी. मी लिहून घेते.

( डायरी, पेन घेऊन येते. )

ती : हं...सकाळी आठ...

तो : हाडांच्या डॉक्टरची भेट.

ती : सकाळी नऊ...

तो : एक्सरे...औषध खरेदी.

ती : सकाळी दहा...

तो : चहा व नंतर औषध...

**ती :** सकाळी अकरा...
**तो :** हितचिंतकांच्या भेटी.
**ती :** दुपारी बारा...
**तो :** अपघाताची सविस्तर माहिती व संबंधित स्थळांना प्रत्यक्ष भेटी.
**ती :** दुपारी एक...
**तो :** भोजन व विश्रांती.
**ती :** दुपारी दोन...
**तो :** पायाच्या पट्ट्या बदलणे.
**ती :** दुपारी तीन...
**तो :** चहा – हितचिंतकांशी चर्चा.
( दृश्य आहे त्या स्थितीत गोठते )

## पडद्यामागून निवेदन

अती कंटाळा आल्यामुळे पोलिस, दरोडेखोर व इतर पात्रं आजच्या प्रयोगात प्रवेश करू शकली नाहीत... क्षमस्व.

( निवेदनानंतर वेगवान संगीत वाजतं. तो व ती तेवढ्याच उत्साहानं वेगात हालचाली करतात. हे चालू असताना...पडदा. )

**सूचना :** संहितेत पुनर्लेखन अथवा फेरफार करता यणार नाही. न कंटाळता मानधन देऊन, प्रयोगपूर्व परवानगी घेणे आवश्यक.

■ ■ ■

# लेखक-परिचय

**राजीव कुलकर्णी**

एम्. ए.
मॉडर्न महाविद्यालय ( पुणे ) या ठिकाणी इंग्रजीचा व्याख्याता. नुकतेच एकांकिका लेखन सुरू केले आहे. काही एकांकिका – नाटकांमधून अभिनय आणि दिग्दर्शन


प्रयोगासाठी संपर्क :
राजीव कुलकर्णी
'इंजा' १९ रवींद्र सोसायटी,
सहकारनगर १,
पुणे – ४११००९.

# 'सन दोन हजार एक'

## राजीव कुलकर्णी

**निवेदक :**

सन दोन हजार एक.
हजार वर्षांच्या निद्रेतून ब्रह्मा जागा झाला.
( काळ्या पड्यावर प्रकाशाचा लहान व प्रखर बिंदू )
दूर, खाली पृथ्वीकडे त्यानं एक कटाक्ष टाकला.
आणि म्हणाला स्वतःशीच —
" हं. मला वाटतं, महेशला जागविण्याचा काळ समीप आला. "
( दुसरा प्रकाशबिंदू )
शिवशंकराला कथिली त्यानं सर्व परिस्थिती.
" महेशा, मानवाचा अंत नजिक आला.
आता दाखव किमया तू
तुझ्या तिसऱ्या नेत्राची
किती कीव करावी
मी अजून ही मानवाची.
संपू दे हे जीवन
काय प्रगती ही त्याची,
अशक्य आहे बदलणे
जात आदिमानवाची.
शिवशंकरा, पण जरा
असू दे ध्यानात
पृथ्वीला मात्र अशीच
फिरू दे अंतराळात.
नाही तर ग्रहांची
सगळ्या बदलेल गती
स्वर्गीचे म्हणतील संत
ब्रह्माची फिरली मती.
विनाशानं मानवाच्या

ते रागावणारच आहेत,
माझ्या महालाकडे धाव
घेणारच आहेत,
पण, असो, मी तर सुरू करतोय
निद्रा तिसऱ्या युगाची
जाग आल्यावर पाहू मग
स्थिती विश्वाची.
( एक प्रकाशबिंदू दिसेनासा होतो )
शंकरानं हसून झुकवली मान
तिसऱ्या नेत्राच्या भ्रुकुटीची
चढली कमान
लय कोठूनशी झाली तांडवाची सुरू
धरणी मानवाची लागे थरथरू.
( विनाशकाळातील प्रकाश आणि संगीत )

**निवेदक :**

तर दोन हजार साली असं घडलं. सर्व जीवन असं हळुवारपणे संपुष्टात आलं. साऱ्या जगतावर मग येऊन बसला एक प्रचंड बर्फाचा थर. त्याच्यावर पांघरला गेला धुक्याचा, धुराचा एक प्रचंड ढग. बाकी शिल्लक काही नाही. नीरव स्तब्ध शांतता.

( स्टेजवर अत्यंत अंधुक प्रकाश )

कैलासावरच्या शिवशंकराच्या काही उद्योगांमुळे म्हणा... किंवा ब्रह्माच्या विनाश घडवून आणण्याच्या या घाईमुळं म्हणा...

पण पृथ्वीवरचं जीवन काही सगळंच समूळ नष्ट झालेलं नव्हतं, खोल खोल दरीत वसलेल्या एका छोट्याशा औद्योगिक वसाहतीमध्ये दोन इवलेसे जीव शिल्लक राहिले होते. दोन लहानसे उंदीर.

( प्रकाश थोडासा वाढतो. एका कोपऱ्यातून हातात हात घालून दोन उंदीर दबकत दबकत प्रवेश करतात. एक नर. एक मादी. सर्वत्र अत्यंत आश्चर्याने बघतात. खाली, वर, आजूबाजूला शोध घतायत, सावध पावले टाकत. )

**नर :** ( वर पाहून ) ए, ते बघ.

**मादी :** ( जवळ येऊन वर बघते ) काय ! अं ऽऽ एखाद्या प्रचंड झाडाची मुळं असावीत तसं काहीतरी दिसतंय.

**नर :** आणि काही गवताची पाती, काही मोठे खडक आणि ..

**मादी :** ( आता तिला लांबच आणखी काही तरी दिसलंय ) ... इकडे य... तेऽबघ.

**नर :** कसला तरी टॉवर आहे, आणि पलीकडे कुठला तरी कारखाना असावा.

**मादी :** पण तुला टॉवर .. कारखाना हे सगळं कसं ठाऊक झालं ? पूर्वी तर आपल्याला फक्त आपलं बीळ आणि धान्याच्या...

**नर :** थांब ! ( विचारात ) खरंच मला हे कसं ठाऊक झालं ? ( विचारात ) तुला...तुला आपल्यात काहीतरी बदल झाल्यासारखा नाही वाटत ? काही तरी वेगळंच नाही वाटत ?

**मादी :** हो - हो ना ! हो – ( लांबवर बोट दाखवून ) ते – ते लांब दिसतंय ना ते रेडियो-स्टेशन आहे. अन् ... त्या तिकडे दूरवरची ती इमारत म्हणजे...

**नर :** थांब. आपल्यात काही तरी बदल झालाय हे नक्कीच. अन् माझ्या थोडं थोडं लक्षात येतंय. आपल्याला विचारशक्ती मिळालीय. आपले मेंदू काम करायला लागलेयत. आपल्या पूर्वजांना कधीही अवगत नव्हती अशी विचार करायची आणि ते व्यक्त करायची अजब शक्ती आज आपल्याजवळ आहे.

**मादी :** विश्वाच्या या प्रचंड पसाऱ्यात कुठे तरी काही तरी उलथांपालथ झालेली दिसतेय. त्याशिवाय आपण असे...

**नर :** बाय द वे, तुझं नाव काय ?

**मादी :** अरे हो, मला एखादं नाव असायला हवं नाही का ! ( विचारात ) अं...काय बरं माझं नाव ? आधी तू तुझं नाव सांग बरं ?

**नर :** माझं नाव — मनू.

**मादी :** ( तत्परतेनं ) आणि माझं नाव इळा. मनू आणि इळा. एऽऽ पण इथं आपण दोघंच आहोत ? त्या दूरवर पसरलेल्या वसाहतींमधे इतरही कुणी असेल.

**मनू :** चल. आपण पाहून येऊ या. त्या उंचच उंच टी. व्ही. च्या मनोऱ्यावर चढून पाहू या.

**इळा :** त्या वेधशाळेच्या दुर्बिणीतून पाहू या.

**मनू :** त्या मल्टीस्टोरीड बिल्डिंगच्या टोकावर जाऊन पाहू या.

**इळा :** चल.

( दोघे शोधत शोधत जातात. थोडे उडते – ट्रिपिंग म्युझिक – दोघं दुसऱ्या विंगेतून परत येतात. )

**मनू :** कोणी सुद्धा नाही.

**इळा :** एकही माणूस नाही.

**मनू** : एकही प्राणी नाही.

**इळा** : आपल्या दोघांशिवाय कोणी उंदीरसुद्धा नाही.

**मनू** : पण माणसानं दिलीय आपल्याला एवढी मोठी वसाहत.

**इळा** : इतक्या इमारती, इतके रस्ते.

**मनू** : कारखाने, ग्रंथालय.

**इळा** : त्या बागा, ती शेती.

**मनू** : मानवानं दिली आपल्याला त्याची सगळी प्रगती.

**इळा** : आम्ही कोण म्हणोनि काय पुसता, आम्ही आदिमूषके
मानवाने दिधले असे जग आम्हास खेळावया.
मनू, आपण त्या मोठ्या रस्त्यावर असलेल्या पांढऱ्या बंगल्यात रहायला जाऊ.

**मनू** : माझ्या मनात आणखी एक विचार आलाय.

**इळा** : काय ?

**मनू** : ही वसाहत, ही व्यवस्था, हे अन्नधान्य, या सुखसोयी ... आपल्यासारख्या लाखो उंदरांना पुरून उरतील अशा आहेत.

**इळा** : मग ?

**मनू** : मग काय ?
हम और तुम,
तुम और हम
( मागे आनंदी संगीत. दोघे हातात हात घालून तालात चालतात. स्टेजच्या एका बाजूस असलेल्या पांढऱ्या स्वच्छ बंगल्यात पदार्पण करतात... पांढऱ्या स्वच्छ लेव्हलवर चढतात. )
( ' हम और तुम
तुम और हम
खुष हैं यूं आज मिल के ' हे संगीत सुरूच )
( हे सर्व होत असतानाच इतरही अनेक उंदीर स्टेजवर येतात. काही येऊन जातात. काही थांबतात. काही उभे, काही बसलेले. एकूण उंदरांची संख्या वाढलेली आहे हे कळावे. संगीत संपल्यावर मनू एका उच्चासनावर बसून आपल्या भाषणाला सुरुवात करतो. सर्वजण कान देऊन ऐकतायत. इळा कौतुकानं बघतेय. )

**मनू** : माझ्या प्रिय मूषक नागरिकांनो, मानवाचा अंत घडून येऊन आज जवळजवळ सहा महिने पूर्ण झालेले आहेत. आणि त्याचबरोबर आपली वसाहतसुद्धा तेवढीच मोठी झालेली आहे. आपल्यात घडून आलेली सांख्यिक वाढ अतिशय लक्षणीय म्हणावी लागेल. आज या वसाहतीतील

उंदरांची संख्या दोन हजाराच्या पुढे गेलेली आहे असं आढळून येईल. आपल्या बुद्धिहीन पूर्वजांपेक्षा आपण हे लक्ष्य लवकर गाठू शकलो याचं कारण खचितच आपल्याला विचारशक्तीची मिळालेली देणगी हे आहे. आपली संख्या याच वेगानं वाढावी अशी माझी इच्छा आहे. मानवानं आपल्याला दिलेल्या या वसाहतीमध्ये आपले इतरही हजारो बांधव जीवन कंठू शकतील हे लक्षात घेऊन आपण सर्वांनी कार्यरत राहावे अशी मी विनंती करतो.

मूषक सहकाऱ्यांनो, मी या वसाहतीतला पहिला मूषक आहे. आदि-मूषक आहे.

( एक उंदीर उभा राहातो. नम्रपणे बोलू लागतो. )

**१ उंदीर :** आदिमूषक महाराज, आम्ही कोण आहोत, आम्ही इथं कसे आलो, मानव नामक प्राणी कसा नाहीसा झाला असे अनेक प्रश्न माझ्या आणि आम्हा सर्वांच्या मनात बरेच दिवस घोळत आहेत. आपण आदि मूषक असल्यानं त्याचा खुलासा करू शकाल अशी आशा वाटते.

**मनू :** ( क्षणभर गडबडलेला. पण लगेच स्वत:ला सावरतो आणि काही तरी अत्यंत महत्त्वाचे तात्त्विक बोलावं तसा बोलू लागतो. )

तुमचा प्रश्न अत्यंत चांगला आहे. निर्मितीनंतर माझ्या मनातही हेच घोळत होतं. तुम्हाला ठाऊकच आहे की, आपल्या वसाहतीत एक भलं मोठं ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात मानवनिर्मित अनेक ग्रंथ आहेत. बर्ट्रांड रसेल, शेक्सपिअर, फ्रॉईड, मार्क्स, कालिदास, प्रेमचंद अशा एक ना दोन, हजारो महान लेखकांच्या कलाकृती तिथं आपल्याला वाचायला मिळतात. रामायण, महाभारत, भगवद्गीता, बायबल यांसारखे धर्मग्रंथही सुदैवानं आपल्यापुढं आहेत. थोडक्यात, मानवाचं सर्व क्षेत्रातलं ज्ञान त्यानं आपल्याला दिलेलं आहे.

मला बढाई मारायची नाहीये, पण नम्रपणानं मी एवढं सांगू इच्छितो की, मी या पुस्तकांच्या वाचनामध्ये कायम गढून गेलेला असतो. त्यामधूनच मला आपल्या निर्मितीबद्दलची मौलिक माहिती मिळाली.

आपलं हे विश्व हे एका अशा प्राण्याची निर्मिती आहे...ज्याला मानव 'देव' म्हणून संबोधत असे. तर या देवानं, मूषक जातीच्या निर्मितीच्या पूर्वी मानवप्राणी इथं पाठवून दिला. या मानवानंच आपल्यासाठी हे सर्व निर्माण केलं. या मानवाला आपण आपला व्हॅनगार्ड म्हणू शकू आणि अत्याधुनिक सुखसोयींनी परिपूर्ण अशी ही वसाहत आपल्यासाठी तयार केल्यावर त्याचे जीवितकार्य संपुष्टात आले. त्याचा अंत झाला — आणि आपला उदय.

मित्रहो, या वसाहतीचं रूपांतर आपल्याला स्वर्गामध्ये करायचं आहे. आपल्याला मार्गदर्शन करायला आपल्या सोबतीला आहे 'शब्द मानवाचा'.

( टाळ्या, आश्चर्योद्गार )

हा शब्द मानवाचा सांगतो की, हे सर्व ज्या मुख्य तत्त्वावर आधारित आहे ते तत्त्व म्हणजेच प्रेम .... प्रेम म्हणजेच परमेश्वर. आपण याच तत्त्वाला धरून पुढे प्रगतीच्या दिशेनं पावलं टाकणार आहोत, म्हणजेच आपल्या संख्येत वाढ घडवून आणणार आहोत. तेव्हा मूषकमित्रांनो चला,

नंदनवन घडवू चला
'शब्द मानवाचा' अपुला साथी
त्यासी मानू चला
नवजीवन जगूया चला.
( अंधार )

**रेडिओवरचा आवाज :**

नमस्कार. मूषकवाणी. आजच्या ठळक बातम्या अशा. मूषक नगरीची मूषकसंख्या आज दहा हजारापर्यंत पोचल्याचे समजते.

आदिमूषक मनू यांनी सर्व मूषक जनतेला असे आवाहन केलेलं आहे की, रस्त्याने चालताना आणि इतर दैनंदिन कामे करताना आपल्या शेपट्या मधे येऊ नयेत म्हणून मूषकांनी त्या व्यवस्थित कपड्यामधे खोचून, झाकून ठेवाव्यात.

वसाहतीचा कारभार सुरळीत चालावा म्हणून आदिमूषक मनू यांनी एक नियंत्रक-समिती नेमलेली आहे. या समितीमध्ये निरनिराळ्या खालील मूषकांची नेमणूक झालेली आहे.

( ही यादी वाचली जात असतानाच प्रकाश. मूषक-अधिकाऱ्यांची सभा भरणार आहे. एकेका खात्याचे उंदीर नावे वाचताच आसनांवर येऊन बसतात. सर्वांच्या कंबरेला शेले — फडकी बांधलेली. आत शेपट्या गुंडाळून ठेवलेल्या आहेत अशी कल्पना. आवश्यक वाटल्यास, जास्त स्पष्ट होण्यासाठी त्यांच्या छातीवर त्यांच्या नावाचे — खात्याचे पहिले अक्षर रंगविलेले. ) .

**बातमी वाचक :**

| | | |
|---|---|---|
| संरक्षण-खाते | : | युद्धोंदिर |
| अन्न पुरवठा-खाते | : | अन्नोंदिर |
| शास्त्र आणि अणुविज्ञान-खाते | : | शास्त्रोंदिर |

गृहखाते : गृहोंदिर
रेडिओ आणि टी. व्ही. : माध्यमोंदिर
शिक्षण-खाते : शिक्षणोंदिर

स्वतः आदिमूषक मनू या नियंत्रण-समितीचे अध्यक्ष — मूषकाध्यक्ष म्हणून पद भूषवितील.

मूषक-नगरीच्या उत्कर्षासाठी मूषकाध्यक्षांनी यापूर्वीच एक रीसर्च सेंटर स्थापन केलेले आहे. या सेंटरच्या प्रमुख पदावर ज्ञानोंदिर यांची नियुक्ती केली गेलेली आहे. रीसर्च सेंटर प्रमुख ज्ञानोंदिर हे नियंत्रण-समितीच्या सर्व सभांना तज्ज्ञ सल्लागार म्हणून हजर राहतील आणि आपल्या बहुमूल्य मतांचा, व्यासंगाचा फायदा ते मूषक-वसाहतीला देतील.

मूषकवाणीवरच्या बातम्या संपल्या. नमस्कार.

( आतापर्यंत सर्व सदस्य येऊन स्थानापन्न झालेले आहेत. मूषकाध्यक्ष मनू बोलू लागतो. )

**मनू :** मूषकमित्रहो, आजपर्यन्त आपल्या अशा बऱ्याच सभा झाल्या. सभांमधे आपण आपल्या वसाहतीचं नियंत्रण कसं करायचं या विषयावर अनेक निर्णय घेतले. आतापर्यन्त तशा अडचणी आपल्याला आल्याच नाहीत गृहोंदिरा ?

**गृहोंदिर :** होय मूषकाध्यक्षमहाराज.
तशी कुठलीच अडचण भासली नाही. मानवानं आपल्यासाठी निर्माण केलेली ही वसाहत इतकी परिपूर्ण आहे की, मूषकमित्रांना काहीच प्रॉब्लेम्स आले नाहीत. आपलं नवं जीवन कसं सुरळीत सुरू झालंय.

**अन्नोंदिर :** खरंय अगदी. वसाहतीतील अन्न-पाण्याचा साठाही इतका भरपूर आहे की, आपल्या पूर्वजांच्या तुलनेत आपण फारच सुखी आहोत हे मान्य केलंच पाहिजे. खाण्यापिण्याची इतकी चंगळ आपल्या सात पिढ्यांत कधी नव्हती.

**शास्त्रोंदिर :** आणि माणसानं केलेली शास्त्रांची प्रचंड प्रगती, आपल्याला अतिशय उपकारक ठरलेली आहे.

**माध्यमोंदिर :** रेडिओ, टी. व्ही. यासारख्या शोधांनी जीवन कसं सुकर झालंय. टेलिफोनमुळे आपले मूषकाध्यक्ष केव्हाही आपल्याला नियंत्रण-समितीच्या सभेसाठी घरबसल्या बोलावून घेऊ शकतात.

**मनू :** पण हे सर्व कशामुळे झालं याचा आपल्याला विसर पडून चालणार नाही. मानवावर, त्याच्या शब्दावर आणि त्याच्या जीवनाच्या मूलभूत तत्त्वांवर — म्हणजे देव हाच प्रेम आणि प्रेम हेच देव — यावर

विश्वास ठेवून आपण जीवन घेतल्यामुळेच हे सगळं ...

**ज्ञानोंदिर** : एक्सक्यूज मी ! ( सर्वजण आश्चर्यानं त्याच्याकडे पाहतात. )
मूषकाध्यक्ष आणि इतर सदस्यमित्रांनो, आजपर्यंतच्या कुठल्याही सभेमध्ये मी काहीच बोलो नव्हतो. पण आज मात्र मला बोलणं भाग आहे. आजपर्यंत आपल्याला काहीही अडचणी आल्या नाहीत हे खरंच आहे. पण यापुढे मात्र एका फार मोठ्या संकटाला आपल्याला तोंड द्यावे लागणार आहे.

( आश्चर्योद्गार )

**अध्यक्ष** : संकट ? ज्ञानोंदिरा, पटकन सांगून टाक !

**ज्ञानोंदिर** : हो. पण त्या आधीची थोडी पार्श्वभूमी आधी ऐका —
मानवानं 'गणित' नावाच्या शास्त्रामधे खूप प्रगती केलेली होती. गणिताच्या सहाय्यानं दूरदूरच्या ग्रह-तार्‍यांची गती, त्यांची स्थिती, त्यांतले बदल वगैरेची अचूक माहिती मानवप्राणी पृथ्वीवर बसूनसुद्धा मिळवू शकत होता.
सुदैवानं मला गणितशास्त्राचा बराच अभ्यास करायची संधी मिळाली आणि तो करताना अतीव आनंद झाला.
मी ज्या संकटाबद्दल बोलणार आहे त्याची जाणीवसुद्धा मला या अभ्यासामुळेच झाली.

**मनू** : ज्ञानोंदिरा, लवकर !

**ज्ञानोंदिर** : हो - हो; थोडासा धीर धरा !
आपल्या वसाहतीची मूषकसंख्या आज अकरा हजार आहे.

**गृहोंदिर** : ही एक अत्यंत गर्व करण्यासारखी गोष्ट आहे.

**ज्ञानोंदिर** : कृपया...मधे बोलून मला डिस्टर्ब करू नका. माझं बोलणं संपल्यानंतर तुम्हा सर्वांच्या झोपा उडणार आहेत.

( सर्व अवाक्. सावरून बसतात. )

तर आज आपली संख्या आहे अकरा हजार. लक्षात घ्या, आपल्या उदयाला फक्त बारा महिने पूर्ण झालेले आहेत आणि आपली संख्या अकरा हजार !
आपण सर्व मूषक म्हणजे, अर्थातच आदिमूषक मनू आणि इळा यांचे वंशज आहोत.
( सर्वजण मनूकडे पाहून आदरार्थी माना झुकवतात. तो एक कृपापूर्ण स्मित करतो. )
म्हणजे उदयाच्या वेळी फक्त दोन मूषक...आणि आज एका वर्षात अकरा हजार.

**(अध्यक्ष) मनू :** मग, आपण काही सत्कार-समारंभ साजरा करावा काय ?

( मनूच्या बोलण्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून ज्ञानोंदिर पुढे म्हणतो )

**ज्ञानोंदिर :** साठ चौरस किलोमीटर्स एवढी या वसाहतीची एरिया आहे. त्याच्या पलीकडे सर्व परिसर बर्फानं व्यापलेला असल्यानं, तिथं कोणीही मूषक राहू शकणार नाही. साठ चौरस किलोमीटर्स अकरा हजार मूषकांना भरपूर जागा देऊ शकतात. एका वर्षात दोनाचे अकरा हजार. पुढच्या वर्षी आपली संख्या किती असेल याची कुणाला कल्पना आहे ?

**माध्यमोंदिर :** एक लाख !

**ज्ञानोंदिर :** अध्यक्षमहाशय ?

**मनू :** अं ... आपली संख्या बरीच वाढेल ... म्हणजे असं पहा — कदाचित दोन लाख ... ! किंवा ...

**ज्ञानोंदिर :** गणितशास्त्र आणि त्यातील एक्सपोनेन्शिल लॉ ऑफ ग्रोथ अँड डीके जर विचारात घेतला, तर आजपासून वर्षानं आपली संख्या साठ लाख एवढी असेल.

**मनू :** साठ ?

**शास्त्रोंदिर :** लाख ?

**गहोंदिर :** साठ लाख ?

**ज्ञानोंदिर :** होय. साठ लाख ... कदाचित जास्तच !

( जरा वेळ शांतता. )

**मनू :** तुझ्या शास्त्रात काही चूक वगैरे तर ...

**ज्ञानोंदिर :** अशक्य !

**मनू :** म्हणजे हे एक संकटच आहे असं तू ...

**ज्ञानोंदिर :** अध्यक्षमहाराज, साठ चौरस किलोमीटर्स परिसर...म्हणज साठ लाख चौरस मीटर्स.

**गृहोंदिर :** मग ? भरपूर आहेत की !

**ज्ञानोंदिर :** गृहोंदिरा, एका वर्षात आपल्या प्रत्येकाच्या वाट्याला फक्त एक स्क्वेअरमीटर जमीन येईल. एक चौरस मीटर म्हणजे आपल्यासारख्या लहानशा प्राण्याला कमी नाही हे खरंय —

**मनू :** मग ? यात संकट कुठंय ?

**ज्ञानोंदिर :** मित्रहो, हे फक्त पुढच्या वर्षाचं झालं. त्याच्या पुढच्या वर्षाचं काय ? आणखी दोन वर्षांनी प्रत्येक चौरस मीटरमध्ये साठ लाख उंदीर असतील. पण ते तसे जिवंत राहू शकणार नाहीत.

( भयोद्गार—" शकणार नाहीत ? ओ ! माय मॅन ! " )

कारण तोपर्यंत रोगराई नियंत्रणाच्या पलीकडे जाईल, अन्न-पाणी दिसणारही नाही. आपली जात गर्दीत चिरडून नष्ट होईल.
( भयाण शांतता. )

**गृहोंदिर** : आपण हे थांबवू शकत नाही ?

**शास्त्रोंदिर** : मला वाटतं, आपण एक कमिटी नेमावी.
( मनू आणि ज्ञानोंदिर सोडून इतरजण जोरजोरात चर्चा करतात. सूचना करतात. मग मनू आवाज चढवून रुवांना शांत करतो. )

**मनू** : सायलेन्स. शांत रहा. मला वाटतं मला उपाय सापडलाय.
( इतरजण —"काय ? कोणता उपाय ?" )

**मनू** : आपण मानवाचं जीवन आदर्श मानलंय. मानवाचा शब्द आदर्श मानलाय. 'गॉड इज लव्ह; ॲण्ड लव इज गॉड' हे तत्त्व आदर्श मानलंय आणि त्याच तत्त्वाला अनुसरून ...

**ज्ञानोंदिर** : मला असं वाटतं की, मानवाच्या या तत्त्वाचा अर्थ आपण अगदी चुकीचा लावला. आणि म्हणूनच आज हा प्रश्न उभा राहिलेला आहे. देव प्रेमात दडलेला आहे आणि प्रेमच देव आहे, याचा अर्थ मूषकसंख्या वाढवायची असा होत नाही.

**शास्त्रोंदिर** : पण हा अर्थ स्वतः मूषकाध्यक्षांनी निरनिराळे ग्रंथ वाचून ...

**मनू** : असो, त्यावर वाद नकोत. मी जो उपाय सुचविणार आहे तो प्रथम ऐका. मानवालासुद्धा लोकसंख्येचा प्रश्न भेडसावत होता आणि तो सोडविण्यासाठी त्यानं एक प्रभावी उपायसुद्धा शोधून काढला होता. तो उपाय म्हणजे ... युद्ध.

**सर्वजण** : युद्ध ?

**मनू** : होय; युद्ध. युद्धामुळे शरीरं सुदृढ राहतात, बेकारी नष्ट होऊन व्यवसाय वाढतात, आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा घडून येते आणि कुशलतेनं हाताळली तर, युद्धे लोकसंख्येवर समर्थ नियंत्रण ठेवू शकतात.

**ज्ञानोंदिर** : पण अनेक मूषक यात मारले जातील.

**मनू** : तेच तर आपल्याला हवंय.

**ज्ञानोंदिर** : पण हे मानवाच्या, लव इज गॉड या तत्त्वाच्या विरुद्ध नाही होणार ?

**मनू** : नाही. जर योग्य, नैतिक आणि समर्थनीय कारण असेल तर, हिंसा योग्य आहे असा मानवाचा विचार होता.

**ज्ञानोंदिर** : ( विचारात मानवानं युद्धे लोकसंख्या नियंत्रणासाठी वापरली ?

**मनू** : अर्थात् ! त्याशिवाय युद्धाचा दुसरा कुठलाच उपयोग आढळत नाही.

**युद्धोंदिर** : होय, होय, युद्ध झालंच पाहिजे. नाहीतरी आमच्या खात्याला आतापर्यंत काही कामच नव्हतं.

गृहोंदिर : मला एक शंका आहे. युद्धात आपल्यालाही भाग घ्यावा लागेल ?

मनू : छे: छे: ! आपण फक्त युद्ध आयोजित करायचं, घडवून आणायचं. ( सगळे सुस्कारा सोडतात. अर्थात् ज्ञानोंदिराशिवाय सगळे )

गृहोंदिर : हा...मग ठीक आहे.

मनू : तर आपल्या वसाहतीत युद्ध होणार. युद्धोंदिरा...

युद्धोंदिर : यस सर ?

मनू : एक दर्जेदार युद्ध घडवून आण.

युद्धोंदिर : यस सर !

ज्ञानोंदिर : पण अध्यक्षमहाशय, कोण कोणाशी युद्ध लढणार ? आपल्याला कोणी शत्रूही नाही !

मनू : ज्ञानोंदिरा, व्यर्थ तुझं ज्ञान. अरे, मानवाचा इतका इतिहास वाचलास आणि इतका साधा प्रश्न तू विचारावास ? इतिहासातच असं लिहून ठेवलेलं आहे की, मानवाच्या काळामधे डावे आणि उजवे यांच्यात सतत झगडा चालू होता.

ज्ञानोंदिर : पण ...

मनू : तेव्हा आपल्या वसाहतीतलं युद्ध सुद्धा डावखोरे उंदीर आणि उजवा हात वापरणारे उंदीर यांच्यात होईल.

ज्ञानोंदिर : पण डावे आणि उजवे या शब्दांचे अर्थ असे नव्हते. ते शब्द असं...

मनू : फार कुशंका काढू नकोस. हे युद्ध होणार.

ज्ञानोंदिर : हे पहा, आपण चुकीच्या मार्गानं प्रश्न हाताळत आहोत. मूषक-संख्या कमी करण्याचा हा मार्ग योग्य नव्हे. युद्धात मूषक मारण्याच्या ऐवजी आपण नवीन जन्माला येणाऱ्या मूषकांच्या संख्येवरच नियंत्रण घातलं पाहिजे. आपल्याला पॉप्युलेशन कंट्रोल नकोय, आपल्याला कॉप्युलेशन कंट्रोलची गरज आहे.

गृहोंदिर : कॉप्युलेशन कंट्रोल ?

मनू : अनैतिक, अधर्म, अब्रह्मण्यम ! ज्ञानोंदिरा, तू जे म्हणतोयस ते मानवाच्या जीवनविषयक तत्त्वाच्या विरुद्ध आहे. हे मी खपवून घेणार नाही.

ज्ञानोंदिर : हे पहा अध्यक्षमहाशय, मानवाचा इतिहास, त्याचं वाङ्मय मीसुद्धा वाचलंय आणि माझा अभ्यास मला असं सांगतोय ...

मनू : ज्ञानोंदिरा, तू तुझ्या मर्यादेच्या बाहेर चाललास. लक्षात ठेव की, तू नियंत्रण-समितीचा सदस्य नाहीस. तू फक्त एक निरीक्षक सल्लागार आहेस. तुझे सल्ले आमच्यावर बंधनकारक नाहीत. ( इतर सदस्यांचा दुजोरा )

**मनू :** सभा बरखास्त.
युद्धोंदिरा, ताबडतोब माझ्या व्हाइट हाऊसवर हजर हो. आपल्याला युद्धाचं संयोजन करायचं आहे.

**युद्धोंदिर :** येस सर.

( अंधार. युद्धाची तुतारी किंवा रणशिंग. पांढऱ्या लेव्हलवर, म्हणजे व्हाईट हाऊसवर प्रकाश. एका आसनावर मनू बसलेला. शेजारी युद्धोंदिर अॅटन्शनमधे उभा. )

**मनू :** पहिल्या युद्धाची तयारी कुठपर्यंत आलीय ?

**युद्धोंदिर :** येस सर. ( टाळी वाजवतो. दोन उंदीर येतात. क्रूरोंदिर आणि शूरोंदिर. )
सर, हे क्रूरोंदिर. ( क्रूरोंदिर डाव्या हातानं सॅल्यूट मारतो. ‘ सर ’ म्हणतो ) आणि हे शूरोंदिर ( उजव्या हाताचा सॅल्यूट आणि ‘ सर ’ ) हे डाव्या सैन्याचे सेनापती, अन् हे उजव्यांचे. यांनी वसाहतीतील मूषकांमधून आपापल्या सेना निवडलेल्या आहेत. दोघांच्या सेना मिळून जवळजवळ एक लाख मूषक युद्धात गुंतलेले आहेत.

( दोघांना )

वसाहतीतलं पहिलं युद्ध आपण सुरू करतोय. ( क्रूरोंदिरला ) तुझी सेना घेऊन तू वसाहतीच्या पूर्व टोकावर राहशील. ( शूरोंदिरला ) आणि तू पश्चिम टोकावर. मूषकाध्यक्ष महाराजांनी ‘ अॅटॅक ’ चा आदेश वायरलेसवरून दिला की, तुम्ही हल्ला सुरू कराल. तुमच्याकडे आपापले वॉकी-टॉकी सज्ज आहेत.

**दोघेही :** स्सर !

**युद्धोंदिर :** ओ. के. देन यू कॅन स्टार्ट. अॅन्ड रिमेंबर, वुई फाइट फॉर द माइस कॉलनी. वुई फाइट फॉर द गुड ऑफ माइस.

**दोघे :** ( अॅटेन्शन ) स्सर !
( जातात. )

**मनू :** युद्धोंदिरा, रेडिओ, टी व्ही, वर्तमानपत्रांचे रिपोर्टर्स रणांगणावर पाठवायची व्यवस्था करा.

**युद्धोंदिर :** येस् सर
( अंधार. परत व्हाइटहाऊसवर उजेड. आता तिथं ज्ञानोंदिर युद्धोंदिर, मनू आणि काही इतर ... )

**युद्धोंदिर :** ( मनूला )

सर, हा वॉकी. हे बटन दाबून दोन्ही सेनापतींना हल्ल्याचा आदेश द्या.

**मनू :** सेनापती आणि मूषक योध्यांनो, आपण आपल्या वसाहतीच्या भल्यासाठी लढत आहोत. एका उदात्त ध्येयासाठी लढत आहोत. चला. युद्ध यशस्वी करू या. तयार ?
...ॲटॅक !
( घोषणा, बडबड. चीं ची चे आवाज. )

**मनू :** जरा तो रेडिओ सुरू करा. आपण युद्धाचं धावतं वर्णन ऐकूया.

**आवाज :** मूषकवाणी. डावे मूषक आणि उजवे मूषक यांच्यात सुरू असलेल्या पहिल्या युद्धाचं धावतं वर्णन आम्ही आपल्याला ऐकवत आहोत. वृत्तांत देणारे कॉमेंटेटर्स आहेत; डिकी मूषक आणि बाळ मूषक ...ओव्हर टू द वॉर फील्ड,

**कॉमेंटेटर :** गुड मॉर्निंग लिसनर्स,
दोन्ही सेना आपल्या आपल्या तळावरून हललेल्या आहेत. लवकरच त्या युद्धभूमीवर पोचतील. मूषकवाणीचा वार्ताहर कळवितो की, सर्व सैनिक युद्धवेषात सजलेले आहेत. त्यांच्या हातातली शस्त्रे चकाकत आहेत. त्यांच्या चालण्यात उत्साह आहे. समरगीतं ऐकू येतायत. त्यांच्या ढालींवर, झेंड्यांवर त्यांच्या सेनांची अक्षरं कोरलेली आहेत.

( ही कॉमेंटरी चालू असतानाच क्रूरोंदिर आणि शूरोंदिर एका विंगेतून येतात दुसऱ्या विंगेतून जातात. पुन्हा येतात. परत जातात. त्यांच्या हातात छोट्या तलवारी. प्रत्येकाच्या मागे त्यांच्या त्यांच्या सेना आहेत अशी कल्पना. प्रथम त्यांच्या चालण्यात उत्साह, नंतर नंतर ते दमलेले. कॉमेंटरी चालूच...शेवटी दोघं स्टेजच्या दोन टोकांना येऊन थांबतात. खूप दमलेले. )

**क्रूरोंदिर :** ( वॉकीटॉकीवरून संपर्क साधतो. व्हाईट हाऊसशी ) हॅलो, हॅलो, हॅलो, ॲलेक्झांडर कॉलिंग कमांडंट ( परत तेच ) ओव्हर.

**युद्धोंदिर :** येस, युवर कमांडन्ट हिअर. रिपोर्ट. ओव्हर.

**क्रूरोंदिर :** अलेक्झांडर कॉलिंग. आम्ही आता रणांगणाच्या दोन टोकांना येऊन पोचलेलो आहोत. पुढे आदेश द्या. ओव्हर.

**युद्धोंदिर :** कमांडंट कॉलिंग. आता युद्ध सुरू करा. ओव्हर.

**क्रूरोंदिर :** पण कमांडन्ट. आता संध्याकाळ होत आलीये. अंधार पडत चाललाय. आणि आम्ही वसाहतीच्या दोन टोकांवरून निघालो. युद्धभूमी

मध्यावर. तेव्हा एवढं अंतर चालत येण्यातच आमची पुरती दमछाक झालेली आहे. आमच्या सेना दमलेल्या आहेत. तेव्हा आजची विश्रांती घेऊन युद्ध उद्या सुरू करावं अशी आमची इच्छा आहे.
ओव्हर.

**युद्धोंदिर** : [ मनूशी कुजबुजत, मनू मान हलवून होकार देतो ] कमांडन्ट कॉलिंग. ओ. के. यू कॅन टेक रेस्ट फॉर अ नाइट. वुइ ॲटॅक टुमॉरो ॲट डॉन, ओव्हर.

**कॉमेंटेटर** : सेनापतींनी लाइट अपील केल्यामुळे युद्ध उद्या होईल.
दोन्ही सेनांमधील मूषक योद्धे आपापल्या छावणीत विश्रांती घेत आहेत. त्यांच्या खाण्यापिण्याची तयारी चालू आहे. आणि आम्ही आपल्याला स्टुडिओकडे परत नेत आहोत. ओव्हर टू द स्टुडिओ.

( अंधार, युद्ध चालू होऊन संपल्याचं म्यूझिक. प्रकाश लेव्हलवर मनू, गृहोंदिर, आणि युद्धोंदिर. ) ( मनू विचारात. )

**गृहोंदिर** : युद्धोंदिरा; आत्तापर्यंत तीन युद्धं झाली. त्यात एकूण किती मूषक मारले गेले ?

**युद्धोंदिर** : पंधरा हजार.

**गृहोंदिर** : फक्त पंधरा हजार ? म्हणजे एका युद्धात फक्त पाच हजार ?

**युद्धोंदिर** : होय.

**गृहोंदिर** : आणि युद्धांमध्ये भाग किती जणांनी घेतला ?

**युद्धोंदिर** : सुमारे साडेतीन लाख.

**गृहोंदिर** : म्हणजे भाग घेणारे सर्व मूषक मरत नाहीत ?

**युद्धोंदिर** : नाहीत.

**गृहोंदिर** : पण का ?... त्यामुळे आपला युद्ध आयोजित करण्याचा उद्देशच असफल होतो.

**युद्धोंदिर** : होय, पण मूषकयोद्धे आवेशानं लढत नाहीत. प्रतिस्पर्धी हा त्यांचा शेजारी, मित्र, नातेवाईक असल्यानं ते हात राखून वार करतात. तसंच, नेहमी युद्धात भाग घेणारे मूषक आता युद्धकलेत चांगलेच पारंगत झालेले आहेत. त्यामुळे ते उत्तम लढतात . पण वेटं मरत मात्र नाहीत.

**गृहोंदिर** : असं केलं तर ?... डावी सेना आणि उजवी सेना यांच्याबरोबरच आपण एक तिसरी सेना उभारूया. तटस्थ सेना.

**युद्धोंदिर** : कशासाठी ?

**गृहोंदिर** : या तटस्थ सेनेनंही युद्धात भाग घ्यायचा, आणि डाव्या, उजव्या दोन्ही

सेनांची कत्तल करायची.

**युद्धोंदिर :** ( हसतो ) सुरेख कल्पना.
पण श्रीमती गृहोंदिर, अजून एक अडचण आहे...
जिवाची भीती असल्यानं युद्धात भाग घ्यायला मूषक पुढे येत नाहीत. टाळाटाळ करतात.

**गृहोंदिर :** ( विचारात ) हं ! एकूण परिस्थिती गंभीर आहे म्हणायची.

( शांतता )

अध्यक्षमहाराज, ( मनू लक्ष देतो. ) आपण असं केलं तर ?

**युद्धोंदिर :** कसं ?

**गृहोंदिर :** आपण तरुण मूषकांना युद्धात भाग घ्यायची सक्ती करूया.

**युद्धोंदिर :** आणि त्यांनी नकार दिला तर ?

**गृहोंदिर :** आपण त्यांना फासावर लटकवूया.

**युद्धोंदिर :** गुड आयडिया ! म्हणजे काहीही झालं तरी आपला मूषकसंख्या नियंत्रणाचा हेतू साध्य होईलच.

**गृहोंदिर :** मानवाच्या इतिहासातही असं लिहिलेलं आहे म्हणे... म्हणजे मूषकाध्यक्षांनाही ते पसंत पडेल.

**मनू :** हं ... कल्पना चांगलीच आहे. आपण अमलात आणून पाहू. पण एवढंच पुरेसं होणार नाही. आज आपली संख्या बारा लाखाच्या घरात आहे. रस्त्यावर ही गर्दी चांगलीच जाणवायला लागलेली आहे. अजून अन्नाचा साठा बराच असला तरी अन्न-वाटप केंद्रांपुढे मोठे-मोठे क्यू दिसतात. बेकारीसुद्धा वाढायला लागलेली आहे. दोन्ही सेनांचा खर्चही वाढत चाललाय. आता आपल्याला एका नव्या उपायाचा अवलंब करायला हवा.

**दोघे :** कुठला ?

**मनू :** मी परवाच 'टाइम्स'च्या एका जुन्या अंकात वाचलं की, मानवाच्या काळात, मोटार अपघातात दर वर्षी लाखो माणसे मरत असत. तेव्हा आपणही मोटारी वापरायला सुरुवात करूया.

**गृहोंदिर :** सुंदर कल्पना. नियंत्रण-समितीच्या सर्व सदस्यांना एक एक मोटार द्यावी.

**युद्धोंदिर :** आणि युद्धातही मोटारींचा वापर केला जावा.

**मनू :** ठीक आहे. शास्त्रोंदिराला आमच्यासाठी खास छोटी मोटार बनवायला सांगा. आम्ही आणि श्रीमती इळा मोटारींचं उद्घाटन करू आणि मला खात्री आहे की, उद्घाटनाच्या फेरीतच मी शंभर-सव्वाशे मूषकांना यमसदनात पाठवू शकेन.

गृहोंदिर : पण मूषकाध्यक्ष, आपल्याला मोटार चालवता येत नाही.

मनू : असा अननुभवी, बेदरकार चालकच जास्तीत जास्त उंदरांना मारू शकेल, नाही का ?

गृहोंदिर : बरं, मूषकाध्यक्ष, मूषक मोटारखाली सापडून मेले, तर उत्तमच आहे. पण जर का काहीजण नुसतेच जखमी झाले तर त्यांच्या हॉस्पिटलचा खर्च निष्कारण वाढणार.

मनू : श्रीमती गृहोंदिर, तुमच्या लक्षात आलेलं दिसत नाही.

गृहोंदिर : काय ?

मनू : जे मूषक जायबंदी होऊन इस्पितळात पडून रहातील, ते अर्थातच पुनरुत्पादन करू शकणार नाहीत. म्हणजे परत लोकसंख्या नियंत्रण.

गृहोंदिर : इंटेलिजन्ट, रिअली इंटेलिजन्ट !!

मनू : आमची बद्धी नाही ही ! शब्द मानवांचा.

गृहोंदिर :<br>यद्धोंदिर : } वर पाहून नमस्कार ) शब्द मानवाचा ! (आदराने. )

मनू : चला तर मग, ऑपरेशन मोटरकार !

( प्रकाश, संगीत किंवा वाटेल ते वापरून मोटार—तिचा आवाज—हॉर्न—त्याखाली मरणाऱ्या मूषकांच्या ची—ची किंकाळ्या—प्रेक्षकांचा हर्ष वगैरे सर्व कळावे. )

( प्रकाश पडतो तेव्हा 'व्हाइट हाऊस', ज्ञानोंदिर एकटाच आतून इळा चहाचा कप घेऊन येते. समोर बसते. ज्ञानोंदिर न बोलता शांतपणे चहा घेऊ लागतो. )

इळा : बाकी ज्ञानोंदिरा, या मोटारींमुळे संख्या खूपच नियंत्रणाखाली आलीय, नाही !

( ज्ञानोंदिर नुसता तिच्याकडे पहातो. दीर्घ सुस्कारा सोडतो. )

इळा : पहा ना, रस्त्यावर कितीतरी कमी मूषक दिसतायत आजकाल.

ज्ञानोंदिर : ते सर्व आपापल्या घरांत लपून बसलेत श्रीमती इळा. एकमेकांच्या डोक्यावर उभे असतील. पण रस्त्यावर पाऊलसुद्धा टाकणार नाहीत, इतका मोटारींचा धसका सर्वसामान्य मूषकांनी घेतलाय.

इळा : अस्सं ! मला वाटलं मूषकसंख्या खरंच कमी...

ज्ञानोंदिर : ( उपहासानं ) कमी ? आता हे सगळे असे घरात लपून बसल्यानं उलट संख्या वाढणारच आहे.

इळा : ( जरा वेळानं ) हं, बघू काय होतं ते ! अध्यक्ष मनू गेल्ेत वार्षिक

मूषकगणना मोहिमेच्या उद्‌घाटनाला.

**ज्ञानेंदिर** : मी सांगतो, की संख्या साठ लाखाला फक्त काही शेच कमी असेल.

**इळा** : बघू ( कप घेऊन आत जाते. )

( ज्ञानेंदिर पुस्तक, पेपर वाचत बसलेला. )

(मनू येतो. बरोबर शास्त्रेंदिर आणि माध्यमेंदिर. मनू खूप निराश.)

**ज्ञानेंदिर** : ( ते आल्यावर उभा राहतो. ) ( मनूला ) काय झालं मूषकाध्यक्ष ?

( मनू चुपचाप जाऊन आसनावर बसतो. निराश. विचारात. कदाचित, सिगरेट, चिरुट ओढतो. )

**ज्ञानेंदिर** : ( शास्त्रेंदिराला ) काय झालं ?

**शास्त्रेंदिर** : ( चिडून ) कसलं काय झालं ?

**ज्ञानेंदिर** : नाही, मूषकगणना होती ना. किती झाली संख्या ?

**शास्त्रेंदिर** : ( मनूकडे एक चोरटा दृष्टिक्षेप टाकून )

पंचावन्न लाखाच्या वर पोचल्यावर मोजायचं काम सोडून दिलं गेलं.

**ज्ञानेंदिर** : का ?

**शास्त्रेंदिर** : मूषकांची संख्या डोळ्यादेखत वाढतेय. एखाद्या घरातल्या मूषकांचा आकडा फॉर्मवर लिहून होतोय तोच, आतून नव्या उंदराचं ट्यहा ऐकू येतं.

**ज्ञानेंदिर** : म्हणजे वसाहत सॅच्युरेशन पॉइंटला पोचली.

( सगळे त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहतात. )

जर मृत्यू आणि जन्माचं प्रमाण सारखं राहिलं नाही तर....

**मनू** : तर काय ?

**ज्ञानेंदिर** : ( सुस्कारा )

**मनू** : मला तर काही सुचत नाही.

**ज्ञानेंदिर** : ( हळूच ) मी पूर्वी सुचवलेला उपायच...

**मनू** : ( थंडपणे ) शट अप !

**ज्ञानेंदिर** : ( खांदे उडवून ) जशी आपली इच्छा.

**मनू** : ( विचार करून ) आता तरी आणखी एकच उपाय डोळ्यापुढे दिसतोय.

**माध्यमेंदिर** : कुठला ?

**मनू** : मद्यपान आणि धुम्रपान !

मानवाच्या काळात या दोन सवयींमुळे हजारो लाखो माणसे प्राणाला मुकत होती असं वर्ल्ड बुक ऑफ नॉलेजमधे लिहूनच ठेवलं आहे.

**माध्यमेंदिर** : मग आपण मूषकांना मद्यपान आणि धुम्रपान सक्तीचं करून टाकूया.

**शास्त्रोंदिर** : होय अध्यक्षमहाशय, असंच करू या.

**मनू** : अर्थात यांचा परिणाम फारच सावकाश होतो. थोड्या प्रमाणात मद्य-पान अधिक मोटरकार यांच्यामुळे चांगले रिझल्टस् मिळतील.

**ज्ञानोंदिर** : मानवानं मद्यपान, धुम्रपान सक्तीचं केलेलं नव्हतं.

**मनू** : मानव जाहिरातींचाच वापर मानसशास्त्रीय सक्तीसारखाच करीत होता.

( ज्ञानोंदिर खांदे उडवून गप्प बसतो. )

मग सर्व मूषकांना मनसोक्त मद्य आणि सिगारेट्स देण्याची सोय करा.

**माध्यमोंदिर** : मूषकाध्यक्ष, मला आणखी एक उपाय सुचायचाय.

**मनू** : बोल माध्यमोंदिरा ! तुला काय सुचलंय ?

**माध्यमोंदिर** : टी. व्ही. च्या काही मानवनिर्मित फिल्मस् माझ्या पाहण्यात आल्या. त्यात एक फिल्म गर्भपातावर होती.

**मनू** : गर्भपात ?

**माध्यमोंदिर** : हो... अॅबॉर्शन.

**ज्ञानोंदिर** : पण मित्रहो, गर्भपाताचा अवलंब करण्यापेक्षा, मी सुचविलेल्या उपायाचा विचार करा. कॉप्युलेशन कंट्रोल.

**मनू** : नाही. त्याला माझा सक्त विरोध आहे. ' गॉड इज लव, अॅण्ड लव ईज गॉड 'च्या ते विरुद्ध आहे.

**ज्ञानोंदिर** : गर्भपातसुद्धा त्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे.

**माध्यमोंदिर** : पण मानवाच्या काळात त्याला कायद्यानं मान्यता होती.

**मनू** : त्या ज्ञानोंदिराचं ऐकू नका. आपण हा उपाय अमलात आणणार आहोत.

**ज्ञानोंदिर** : जन्म आणि मृत्यूचं प्रमाण समान करायला जर आपल्याला एका महिन्यापेक्षा जास्त वेळ लागला, तर लक्षात ठेवा, आपली वसाहत एक महिन्यानंतर स्टार्व्हेशन झोनमधे जात आहे.

**शास्त्रोंदिर** : स्टार्व्हेशन झोन ?

**ज्ञानोंदिर** : हो, अन्नसाठा संपेल.

**मनू** : नाही. एका महिन्याच्या आतच आम्ही जन्मसंख्या शून्यावर आणू. ताबडतोब एक कायदा पास करा. ज्या मूषक स्त्रियांना दिवस गेलेले आहेत, त्यांना त्वरित गर्भपात केन्द्रात दाखल करा. गर्भपाताबरोबरच मोटरकार, युद्धे, मद्यपान, धुम्रपान, प्रदूषण हे सगळे उपाय चालू ठेवा. चला, झटपट कामाला लागा.

**ज्ञानेंद्रिर :** पण त्यासाठी आपल्याला लाखो गर्भपातकेंद्रे उघडावी लागतील.

**मनू :** त्यात काय अवघड आहे ? उघडून टाकू !
चला, ऑपरेशन ॲबॉर्शन !

( अंधार )

( सिगरेटच्या जाहिराती रेडिओवर ऐकू येतात. )
" ए फिल्टर सो ट्रू.
ऑल द् टेस्ट कम्स थ्रू.
व्हाईट हाऊस सिगारेटस्.
टिंग टॉंग.
इट् टेक्स अ पाचमिनार टू सॅटिसफाय अ रॅट लाईक यू.
लांब शेपटीवाल्या आपल्यासारख्या मर्द मूषकाला पाचमिनारने संतोष मिळतो.
नेहमी ओढा – पाचमिनार.
आता ऐका काही गीते :
" पीनेवालोंको पीनेका बहाना चाहिये "
" मुझे दुनियावालों शराबी न समझो
" मैं पीता नहीं हूँ पिलायी गयी है "
" मिले जितनी शराब तो पीता हूँ
रखे कौन ये हिसाब मैं तो पीता हूँ. "
इत्यादी, इत्यादी.

[ या ॲड्स व गाणी चालू असताना काही मूषक धूम्रपान, मद्यपान करून स्टेजच्या एका कोपऱ्यात बेहोष होऊन पडतात. हे सर्व चालू असतानाच एक काळे कपडे, पांढरी कॅप घातलेला वॉर्डबॉय येतो. हातात एक बोर्ड – सक्तीचे गर्भपात केंद्र क्रमांक ५००५ – मधे उभा राहतो. धावपळीत असलेल्या डॉक्टर, नर्सला मधेमधे दारू, सिगारेट्स पुरवितो. एक मूषक डॉक्टर आणि नर्स एकाच बाजूच्या पहिल्या विंगेतून येतात, तिसऱ्या विंगेतून आत जातात. घाईघाईने. कधी त्यांच्या हातात ट्रेज तर कधी पांढऱ्या स्वच्छ गाऊनवर रक्त सांडलेले. असे चार-पाच वेळा होते. काही गर्भपात झालेल्या मूषक स्त्रियासुद्धा रडत-कण्हत बेहोष होऊन स्टेजच्या त्याच कोपऱ्यावर पडतात. ( अंधार होतो. ) ]

( व्हाइट हाऊसवर उजेड. मनू खिन्नपणे बसलेला. शेजारी ज्ञानेंदिर उभा. तो चिडलेला आहे. )

**ज्ञानोंद्रि :** ( मनूला ) तरी मी तुम्हाला सांगत होतो मूषकाध्यक्ष, की आपण चुकीच्या'मार्गानं चाललेलो आहोत. मूषकसंख्या रोखण्याचे आपले सर्व उपाय फसलेले आहेत. मानवाच्या'तत्त्वांचे तुम्ही लावलेले अर्थ चुकीचे होते. 'लव्ह इज गॉड, अँड गॉड इज लव्ह' याचं तुम्ही केलेलं इंटरप्रिटेशन संपूर्ण चूक होतं.

मानवाच्या जीवनाचा, त्याच्या वाङ्मयाचा 'सखोल अभ्यास' करून तुम्ही पॉप्युलेशन कंट्रोलचे काही आधुनिक उपाय शोधलेत. पण त्यांचे भयानक परिणाम आज आपल्या डोळयांपुढे आहेत.

आता फार उशीर झालाय मूषकाध्यक्ष ! मी तुम्हाला योग्यवेळी सावध करण्याचा प्रयत्न केला होता, पण माझे सल्ले तुमच्यावर बंधनकारक नव्हते ना ! आता काय करायचं ते तुम्हीच बघा. तुम्ही आणि तुमची नियंत्रण–समिती.

मी फक्त तुम्हाला एवढंच सांगायला आलोय की, उद्या आपली वसाहत स्टार्व्हेशन झोनमधे जात आहे. अन्नपाणी केव्हाच संपलंय, उत्पादनही पूर्णपणे थंडावलंय. अंत आता दूर नाही.

( ज्ञानोंद्रि जातो. मनू सुन्न बसलेला. )

( इळा प्रवेश करते )

**मनू :** ( निःश्वास टाकतो ) हं !

**इळा :** मूषकाध्यक्ष, काय झालं ?

**मनू :** ( निराशेने ) आता काय व्हायचं राहयलंय !

**इळा :** असं का म्हणता ?

**मनू :** उद्या आपली वसाहत स्टार्व्हेशन झोनमधे शिरणार. मग नुसतं वाट पहात रहाणं...अंताची.

**इळा :** मनू !

**मनू :** हो इळा...अंत.

**इळा :** पण मनू, गेले काही दिवस मूषकसंख्या दहा लाखांवर स्थिरावलीये असं तूच म्हणाला होतास ना ?

**मनू :** हं. पण पुढे काय...

**इळा :** मनू, तुझ्या परीनं तू खूप केलंय्स. वसाहतीसाठी खूप झटलाय्स.

**मनू :** तरीही काहीतरी करायचं राहून गेलंय असं वाटतं.

**इळा :** निराश होऊ नकोस. अजूनही काहीतरी सुचेल.

**मनू :** ( वर पाहून ) तो मानवच जाणे.

( शांतता )

तुला आठवतं इळा, इथं प्रथम आपण दोघंच होतो तेव्हाची वसाहत ?

हिरवीगार, स्वच्छ, निर्मळ, शांत... आपण दोघं. फक्त दोघं... तू आणि मी.

**इळा** : (इमोशनली) मनू!

**मनू** : आज नुसती खिडकीतून बाहेर नजर टाकली तरी...जिकडे तिकडे गर्दी ... मूषकच मूषक ... जिवंत ... रस्त्यात मोटरखाली मेलेले ... दारू पिऊन झिंगून पडलेले ... गर्भपात होऊन पडलेले. त्यातच चाललेली युद्धं ... मोटारी, त्यांचा वेग ... अंत्यसंस्कारकेंद्रांच्या धूर ओकणाऱ्या चिमण्या ... काळाकुट्ट धूर ... सगळं अस्वच्छ, गलिच्छ ... असह्य ... अंताकडे चाललेलं.

**इळा** : आजकाल एक नवीनच दिसतंय मनू! नव्यानं जन्माला येणारी पिलं विचित्रच आहेत. ती फारशी जगतही नाहीत. वसाहतीत निरनिराळे नवे नवे किळसवाणे रोग पसरलेयत. हे—हे कशामुळे मनू?

**मनू** : हा त्या ऑपरेशन युरेनिअमचा परिणाम. शास्त्रोंदिरानं सुचविलेला उपाय. न्यूक्लिअर वेस्टमुळे निर्माण झालेली ही भयंकर परिस्थिती आहे इळा!

**इळा** : आता?

**मनू** : (निराशेनं) हं!...आता!

(खुर्चीत बसतो. पाच क्षण शांतता. अचानक मनू वर पहातो. उत्साहानं उठतो.)

**मनू** : इळा—इळा, आय हॅव गॉट इट. आय थिंक आय हॅव गॉट इट!

**इळा** : काय? काय मनू?

**मनू** : ज्ञानोंदिर! मला त्याच्याशी बोललंच पाहिजे.

इळा मला अखेरचा उपाय सापडलाय.

(टेलिफोनजवळ जातो. डायल फिरवतो.)

हॅलो, हा- येस. हां, मी मूषकाध्यक्ष— हां, हॅलो ज्ञानोंदिरा. ग्रेट न्यूज. मला अखेरचा उपाय सापडलाय. द फायनल सोल्यूशन! हो, हां—येस! आता तू असं करायचं, संध्याकाळी नियंत्रण-समितीच्या सगळ्या सदस्यांना घेऊन इथं यायचं. हो, माझ्या व्हाइट हाऊसवर. हो, निरोप तूच कळव. आणि हे पहा, यू आर कमिंग फॉर डिनर. तुम्हाला मेजवानी द्यायचं ठरवलंय मी. वुई आर सेलिब्रेटिंग. हां. या ... या; वाट पहातोय.

**इळा** : मनू, काय गडबड तरी काय आहे?

**मनू** : आधी किचनमध्ये चल. डिनरची तयारी करायचीय.

(अंधार. जातात.)

(उजेड. व्हाइट हाउसवर डिनर टेबल लागलेले. सर्व सदस्य आसनस्थ. मनू उभा राहून बोलणार आहे.)

**मनू** : (उभा राहून बोलू लागतो) मित्रहो, स्टार्व्हेशन झोनच्या काठावर उभे राहूनही आपल्याला आज मेजवानी कशी मिळतेय याचं तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटत असेल. पण हे सेलेब्रेशन आहे. आपल्या संख्या विस्फोटाच्या प्रश्नाचं उत्तर अखेर मला सापडलय. त्याचाच आनंद आज आपण साजरा करीत आहोत.

**माध्यमोंदिर** : कोणतं उत्तर मूषकाध्यक्ष ?

**मनू** : आपण आपलं सर्व जीवन मानवाच्या जीवनतत्वांनुसार घेतलं. आपलं आयुष्य जरी काही अंशी खडतर झालेलं आहे, तरी बव्हंशी मानवाच्या तत्त्वानं आपल्याला फायदाच झालेला आहे.

मूषकसंख्या नियंत्रणासाठी आपण मानवानं वापरलेलेच मार्ग वापरले. ते पूर्णपणे यशस्वी ठरले नाहीत हे मान्य करायलाच हवं.

पण सदस्यमूषकहो, आपण एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली नाही. लक्षात घ्या, मानवाचा जेव्हा अंत झाला, तेव्हा त्याचेही सर्व प्रश्न सुटलेले नव्हते. संख्याविस्फोटावर तोही उपाय शोधतच होता. आपण जे उपाय वापरले ते सर्व मानवानं वापरलेले होते. परंतु— मानव जर संपुष्टात आला नसता, तर त्यानं पुढे कुठला उपाय वापरला असता याचा आपण कधी विचारच केलेला नाही.

**ज्ञानोंदिर** : मूषकाध्यक्ष !

**मनू** : होय ज्ञानोंदिरा, मानवानं जे जे केलं ते सर्व आपण करून पाहिलं. पण आता, मानवानं जे केलं असतं ते आपण करणार आहोत. आणि तोच माझा अखेरचा उपाय आहे. द फायनल सोल्यूशन !

मित्र हो, आपापल्या डिशेसवरची झाकणं काढा आणि पाहा— अखेरचा उपाय तुमच्या समोर !

(सर्व झाकणे काढतात. सर्व सदस्य शॉक्ड.)

**ज्ञानोंदिर** : (डिशकडे पहाताच भीषण किंचाळी फोडतो—)

नाही ! नाही !! नो !!

(याच क्षणी स्टेजच्या दुसऱ्या कोपऱ्यात बेहोश होऊन पडलेल्या मूषकसमूहावर प्रकाश झोत. ते मूषक हिंस्र हालचाली करीत आहेत आणि एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यासाठी, आपल्या सहकारी मूषकाचे रक्त पिण्यासाठी ते सिद्ध झालेले आहेत.

याच वेळी पडदा पडत असताना निवेदक

" चिंता नाही उद्याची
ना चाहूल संकटाची
आनंदे नांदते वसाहत
इवल्याशा भक्ष्यांची "

( आधारित )

■ ■ ■

# लेखक-परिचय

## राजीव जोशी

एम्. ए., एलएल्. बी.
चार्टर्ड बँक येथे नोकरी.

लेखन : १. 'मोरूचे पोल्यूशन' या नाटकास आळतेकर, कोल्हटकर स्पर्धांत पारितोषिके.

२. 'ब्लॅक अँड व्हाईट', 'एक सुन्न म्हातारा' ह्या एकांकिकांना लेखन-पुरस्कार. उदा., म्हैसाळकर–नागपूर, इस्कस–मुंबई, दर्शन–गोरेगाव आदी स्पर्धांमध्ये.

३. 'बंदी', 'तत्थै तत् तिरकिट धा', 'ब्लॅक अँड व्हाईट' ह्यांना आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत पारितोषिके.

४. 'मोरूचे पोल्यूशन आणि इतर एकांकिका' हा संग्रह प्रकाशित.

५. महाराष्ट्र टाइम्स, माणूस, चित्रानंद यांमध्ये नाट्य–चित्रपट-विषयक लेखन.

प्रयोगासठी संपर्क :
राजीव जोशी
१ दहीसर–भूषण
म्हात्रेवाडी
दहीसर (४)
मुंबई – ४०००६८

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
क्र. 29380 नों दि. 6/5/88
वि. नाटक क्र. ....

# एक सुन्न म्हातारा

## राजीव जोशी

**सुरू होण्याआधीचे पार्श्व निवेदन—**

( या नाटिकेतील वातावरण जगातील कोणत्याहीं देशातील होऊ शकेल, पण सध्या तरी ते ' डेमॉक्रसी ' या काल्पनिक देशातील आहे असे समजू या )

( पडदा उघडल्यावर एक म्हातारा कबुतरांना दाणे घालतोय. )

**म्हातारा :** या कबूतरांनो, या. दाणा घ्या माझ्या हातून. हा माझा दाणा, हा तुझा असा स्वार्थी गोंगाट करू नका. प्रत्येक दाण्यावर खाणाऱ्याचा हक्क आहे. तेव्हा सगळ्यांनीच घ्या दाणे.

पळू नका. घाबरू नका. या म्हाताऱ्याला घाबरता ? तुम्ही खुळे आहात, कबुतरांनो तुम्हाला पंख आहेत तरी घाबरता ! माझे पंख कापले गेले आहेत ... त्यातून ही म्हातारपणाची कात टाकतोय, संध्याकाळचे बुडणारे सूर्य मोजत ... हा म्हातारा....बुडणारा सूर्य... आयुष्यभर ससाणा बनून फिरत राहिल्याने, जेत्याचे जगणे जगत. आता तुम्ही म्हणाल, हा ससाणा एकदम ससा कसा झाला?...पण राजांनो, हा बदल एकदम नाही... हातून सत्ता गेल्यावर नाही, पण सत्तेतून फेकला गेल्यावर...असे पंख कापणे म्हणजेच क्रांती होय, असं ते म्हणतात. एका अध्यक्षाला उडवून दुसऱ्याला पुन्हा उडवे-पर्यंत टिकवणे, हीच त्यांची क्रांती.

( इतक्यात एकजण येऊन विचारतो. )

**एक :** अहो, इथे क्रांतीचौक कुठे आहे हो ?

**म्हातारा :** क्रांतीचौक ? इथला प्रत्येक चौक क्रांतीचौक आहे. खरंच, इथल्या नाक्यानाक्यावर, चोकाचौकात क्रांती घडून गेलेली आहे किंवा सध्या घडत असावी...विच्चारा, विच्चारा हवं तर ह्या कबुतरांना.

**एक :** ईडियट ! ( जातो ).

**म्हातारा :** काय पदवी दिली त्याने ऐकली का तुम्ही ? खरं म्हणजे सत्तेवर असणाऱ्यांना ही पदवी का दिली जात नाही ? ती त्यांनाच शोभून दिसते. पण महाराजा, तुला काय कळणार ह्या गोष्टी ! तुझ्या लेखी सत्ता असणारे-नसणारे दोघेही सारखेच ईडियट. ( हसतो ) तू फक्त शांतीदूत...शांततेचा प्रतीक...हं, तशी शांतता मलाही प्रिय होतीच.

राजपदावर असताना कधीकधी वाटाघाटी करायचो. साध्या-सुध्या शांततेवर नाही, तर जागतिक शांतता. जणू तिचं जागतिक वितरण आमच्याच ताब्यात होतं ! 'शांतता-उद्याची गरज' ह्या माझ्या विचारांना खूप जागतिक प्रसिद्धी मिळाली होती. त्या वेळी 'प्रेसिडेंट शांतताप्रिय आहेत' असे मथळेच्या मथळे सर्व सरकारी वृत्तपत्रांच्या छातीवर छापून घेतले होते. इतकंच काय, त्या नेहरूंच्या हातून कोटावर गुलाब लावून घेतानाचे छायाचित्र 'पोलादी पडदा–गुलाब संगम' या शीर्षकाखाली प्रचारासाठी काढली होती. काही व्यंगचित्रकारांनी त्याची व्यंगचित्रे काढली होती. त्या व्यंगचित्र-कारांना प्री–सेन्सॉरशिपच्या नावानं अंधारकोठडी दाखवणं कठीण नव्हतं. पण केवळ शांततेसाठी तो उपहास, ती टीका आम्ही खेळकर मानली... तुम्ही का थांबलात ? खा...दाणे खा. तुम्ही म्हणाल, जन्मभर लोकांना गोळ्या दिल्या आणि आता तुम्हाला हे दाणे देतोय म्हणून ! पण आयुष्याच्या शेवटी झालेलं हे फ्रस्ट्रेशन नाही. विचारांपेक्षा म्हातारपण आलंय मनाला. विचारात अजून कडवेपणा आहेच. पण विचारांपेक्षा म्हातारपण आलं मनाला, म्हणून हा छंद लावून घेतला आहे झालं. छंद सर्वच जोपासले – पोसले सत्तेच्या बुरुजावरून, पक्षाच्या तत्त्वज्ञानावर. पण आता हा साधा छंदही मुलाला आवडत नाही.

( तितक्यात म्हाताऱ्याचा मुलगा लगबगीने येतो. )

**मुलगा** : अहो डॅडी, तुम्हाला किती वेळा सांगायचं की, अशा मध्यवर्ती चौकात कबुतरांना दाणे घालण्याचा फालतू छंद करत बसू नका म्हणून. ही काय वेळ आहे, तुमच्या मागे येऊन, तुम्हाला एखाद्या लहान मुला-प्रमाणे हाताला धरून घरी नेऊन सोडायची ! आज पार्टीमीटिंग – एक तर चिंता, त्यात आणि ...

**म्हातारा** : ( कबूतरांना ) अरे घाबरू नका असे !
माझा मुलगा आलाय मला दम द्यायला, तुम्ही कशाला घाबरता ? तो काय तुमची शिकार करणार ? नाही. तो मला घरी न्यायला आलाय. हं...तुमचं दाणे खाणं चालू द्या अगदी आरामात...
( मुलाला ) एकंदर तुझं पार्टीमधलं वजन वाढू लागलेलं दिसतंय ! ही कबूतरं पण तुला बिचकून उभी राहिल्येत बघ कशी !
( हसतो. उपरोधाने )

**मुलगा** : ( चिडून ) काय पोरकटपणा लावलाय ? तुमच्यासारख्या मोठ्या माणसाला ...

**म्हातारा** : ( मोठ्याने हसून ) मी मोठा...घ्या दाणे, आणखी घ्या. कबूतरांनो... माझ्या ह्या सन्मानाप्रीत्यर्थ तुम्हाला मेजवानी. ( पुन्हा हसतो. )

**मुलगा** : खरंच शोभत नाही डॅडी तुम्हाला असं वागणं...शिवाय ते पक्षाच्या विचारसरणीतही बसत नाही...

**म्हातारा** : पक्षाच्या विचारसरणीत काय बसतं, काय बसत नाही, ते मला चांगलंच कळतंय, तू आता नव्याने शिकवायचा प्रयत्न करू नकोस. मला माहित्येय कदाचित सध्याच्या पार्टी धोरणामध्ये माझं वागणं बसतही नसेल.

**मुलगा** : डॅडी ! ( क्षणाने ) ही जागा पार्टीच्या धोरणाबद्दल चर्चा करण्याची नाही. शिवाय सध्या तुम्ही अध्यक्ष नसलात तरी, पूर्वी अध्यक्ष होतात हे विसरू नका. आणि मला वाटतं, पार्टीत अजूनही तुम्हाला पुरेसा मान आहे.

**म्हातारा** : हो. तुम्हाला पुरेसा वाटेल इतका, पण मला अपमानकारक वाटेल इतका मान नक्कीच आहे. पण स्थान नाही ! आणि स्थान नसलेला मान म्हणजे जपलेली वांझ श्रद्धाच !

**मुलगा** : सत्तेशिवायचं शहाणपण वाटतं हे !

**म्हातारा** : हो, तसंही म्हणू शकतोस तू. म्हणून सर्व निरर्थकपणा दूर करून हा छंद जवळ केलाय. वेळ कसा मजेत जातो बघ... अर्थात् तुला असा आनंद मिळविण्यासाठी माझ्याएवढा म्हातारा होईपर्यंत थांबावं लागेल. तोपर्यंत नुसतं बघणंच. अरे, बघ. बघ तरी त्यांचं दिलखुलास दाणे टिपणं. बघ...बघ...

**मुलगा** : तुम्हीच बघा...मी तुम्हाला पुन्हा एकदा सांगतो. तुमचा वेळ जात नसेल तर टीव्ही बघा. लायब्ररीत जा, आत्मचरित्र लिहा, नाही तर पक्षाच्या विचारांचे वर्ग चालवा.

**म्हातारा** : व्वा ! व्वा ! योजना चांगल्या आहेत. पण त्या तुझ्यासाठीच राखून ठेव.

**मुलगा** : ( रागाने थाळी काढून घेत ) घरी चला आधी. कबूतरांना दाणे घालायची इतकी जर हौस असेल तर, गच्चीत गोळा करा कबूतरं आणि बसा दाणे घालत, वेड्यासारखं बडबडत. झाला तेवढा तमाशा पुरे झाला.

( म्हातारा थाळी ओढून घेतो आणि पुन्हा दाणे घालू लागतो. इतक्यात एक हौशी फोटोग्राफर इथले तिथले स्नॅप्स् मारत येतो. म्हातारा आणि कबूतरं असं दृश्य पाहून खूष होतो. कॅमेऱ्यातून क्षणभर पाहातो. काही तरी कल्पना सुचते म्हणून... )

**फोटोग्राफर** : एक्सक्यूज मी...एक मिनीट, एक मिनीट हं...तसेच...तसेच उभे रहा...प्लीज, लेट मी हॅव धिस...

**मुलगा** : ( लगबगीने, रागाने कॅमेरा खेचून घेतो. ) काय हो, फोटो कोणाचा काढता ? इथले नियम तुम्हाला माहीत नाहीत ?

**फोटोग्राफर** : नियम ? खरंच माहीत नाहीत. मी परदेशी प्रवासी आहे. हा म्हातारबावा आणि ही कबूतरं असं दृष्य खूप भावलं म्हणून... तुम्हाला नाही का आवडलं ?

**मुलगा** : तुम्ही इथून निघून जावंत हे बरं.

**फोटोग्राफर** : पण माझा कॅमेरा तरी द्या; म्हणजे मला...

**मुलगा** : तो जप्त केलाय मी.

**फोटोग्राफर** : पण अशा तऱ्हेनं जप्त करण्याचा अधिकार कोणी दिला तुम्हाला ?

**मुलगा** : हेही विचारण्याचा अधिकार तुम्हाला नाही, तुम्ही इथे परके आहात. असा वाटेल त्या जागेचा, वाटेल त्या माणसाचा आणि वाटेल त्या पशुपक्ष्याचा फोटो तुम्ही मुक्तपणे काढू शकत नाही. त्यातून हे कोणी वाट्टेल ते नाहीत. माझे वडील तर आहेतच पण राष्ट्राच्या दृष्टीने...

**फोटोग्राफर** : राष्ट्राच्या दृष्टीने काय ? असंच काही म्हणालात का आपण ?

**मुलगा** : काही नाही...तुम्हाला नाही...तुम्ही इथून...

**फोटोग्राफर** : ( निघत ) हो...जातोच मी. कमाल आहे ! सर्वच विचित्र आहे इथे !

**मुलगा** : बघितलंत डॅडी, लोकांना हेच हवं असतं...काही तरी विचित्र–विक्षिप्त...परवाच पार्टी मीटिंगमध्ये टीका झाली होती तुमच्या अलीकडच्या वर्तनावर. तुमचं असं हे वागणं पक्ष-नियमांच्या चौकटीत बसत नाही. आणि आपण बनवलेल्या नियमांचं आपणच उल्लंघन करणं म्हणजे...

**म्हातारा** : का ? त्यात अशक्य वाटण्यासारखं काही आहे का ? तेव्हा माझी राजवट होती, मला नियम सोयिस्कर होते म्हणून लादले...आता मी...तसा नाही.

**मुलगा** : सरळ म्हणा की...माझी राजवट नाही म्हणून.

**म्हातारा** : हो, म्हणूनच मला तुमचे नियम पटत नाहीत.

**मुलगा** : म्हणून नियम मोडलेच पाहिजेत, मोडून त्यांच्यावरचा राग व्यक्त केला पाहिजे असं नाही. आता तुम्हाला पटत नसतीलही. पण तुमच्यापेक्षा आताच्या अध्यक्षांना पटणं महत्त्वाचं आहे. समजा, त्या फोटोग्राफरनं तुमचा फोटो घेतला असता आणि त्याचा सवंग प्रसिद्धी-साठी, आपल्या धोरणाच्या उपहासकारक बदनामीसाठी वापर केला असता तर ? तेव्हा कृपाकरून घरी चला...

**म्हातारा** : तू निघ. मी एवढे दाणे संपवून येतोच. ( मुलगा जातो. ) ( कबूतरांना... ) गेला शिकारी. खा आता दाणे पोटभर. मला माहित्येय की, तुम्ही पण वाट बघत होता त्याच्या जाण्याची. अरे, पण तुम्ही असे गप्प का ? फोटो काढला नाही म्हणून, की माझ्या-बद्दल कळलं म्हणून ? नाही, तुम्हाला कशी समजणार आमची भाषा ? फोटोचं जाऊ दे, नंतर खूप काढता येतील...अरे खात का नाही तुम्ही ? काय झालं असं ? आलं लक्षात, नुसतं दाण्यांनी काम भागणार नाही, पाणीही मिळायला हवं. देतो हं पाणी ( पाणी आणून देतो...थोडे क्षण निःस्तब्ध ) कमाल आहे तुमची ! पाणी आणून दिलं तरी दाणे खात नाही ? भूक भागलेली दिसत्ये, की तहानच नाही लागलेली ? पण असं कसं होईल ? खाल्ल्यानंतर पाणी प्यायलाच हवं. त्याशिवाय जहाल विचार पचनी कसे पडतील ? आम्हाला सवय झालीय ! पण तुम्ही का पीत नाही ? का खात नाही ? ( चिडून ) पीता की नाही बोला ? की गोळीनं उडव एकेकाला ? मृत्यूची भीती दाखवल्याशिवाय तुम्ही भानावर येणार नाही. बोला; दाणा खाणार का गोळी ? द्या उत्तर. देता की नाही ? ( क्षणभर शांतता. फडफडण्याचा—फडफडणं दूर गेल्याचा आवाज. ) ( सॉफ्टली ) अरे, असे कुठे निघून चाललात ? माझ्या बोलण्याचा इतका का तुम्हाला राग आला ? असे जाऊ नका रे माणसासारखे, मला एकट्याला सोडून ! तुम्हाला हवं तर, पिऊ नका पाणी. पाण्याचं काय ! आणि दाणेही नाही खाल्लेत तरी...नुसते माझ्या-समोर दिसा; की बस !

माझी सवयच मध्ये आली ..जुन्या सवयी पीळासारख्या...गळून पडत नाही ना...तेच तर वाईट आहे...

आम्ही सर्वांनाच सांगायचो, दाणे घ्या, पण बंदिस्त रहा. तुमचं पोट आम्ही भरू. तुमच्या नैसर्गिक गरजा आम्ही भागवू. पण तुम्ही तुमचं स्वातंत्र्य आम्हाला द्या. सर्व राष्ट्राचाच आम्ही एक पिंजरा केला होता. पिंजऱ्यातून बाहेर पडायचं नाही, बाहेरचं बघायचं नाही, निळं आकाश बघण्याचा हट्ट मुळीच धरायचा नाही...हं, बघायचं ते आम्ही बेतून दिलेलं रेडिमेड पोलादी आकाशच. हेच तत्त्वज्ञान राष्ट्रासाठी वापरलं आणि आमच्यासाठीही.

मात्र आम्ही थोडं स्वातंत्र्य वेगळं काढून ठेवलं होतं आमच्यासाठी. परदेशात आम्ही खूप स्वातंत्र्य उपभोगलं. सरळ घेतलं. बळकावूनही घेतलं. त्या वेळी ती विचारांची बांधीलकी, साम्यवाद सर्वच

सोयिस्करपणे विसरलो. अहो, राष्ट्रही विसरलो तिथे राष्ट्रीयत्वाचे काय घेऊन बसलात ! अर्थात ते सर्व Essential Exception च !
( पुन्हा कबुतरी फडफड. )
म्हणून तुमचं असं मुक्तपण आम्हाला खुणावतंय, ओरबाडतंय, बोचकारतंय. पण हे सर्व आवडते आहे आपणाला, कारण हे भिरभिरेपण हाक मारत्येय. दाणे टिपणं लाजवतंय. अं हं...माझा वर्डस्वर्थ, शेक्सपियर, पिकासो, टागोर कोणी कोणी होणार नाही. कारण सत्तेवर असताना–नसताना ह्या गोष्टी कधीच अनुभवल्या नाहीत. कोणती कला, कला मानली नाही. जहाल विचारसरणी आणि साम्यवाद हेच जीवन आणि त्याचा प्रचार हीच कला. आताही हेच चालू आहे. पण नुस्ता अतिरेक ! तेच आपल्याला पटत नाही. असो. या गोष्टी तुम्हाला सांगण्याच्या नव्हेत...हा आवाज कसला ?
( इतक्यात प्रेसिडेंट येत असल्याची सूचना. म्हातारा इतरत्र पहात. प्रेसिडेंटच्या गार्डस्चे आगमन. म्हातारा मुद्दाम दाणे घालण्यात मग्न.)

**प्रेसिडेंट** : ( येत ) ओहो ! एक्सप्रेसिडेंटसाहेब, आपण इथे ?

**म्हातारा** : कोण ? प्रेसिडेंटसाहेब ? आपण इथे कसे ?

**प्रेसि.** : पार्टी–मीटिंग संपली आणि आता सेक्रेटरीएटमध्ये ' सेशन ' ला चाललो होतो, इतक्यात तुमच्यासारखा कोणी या चौकात दाणे टाकताना दिसला. म्हटलं, संशय खरा की खोटा ते प्रत्यक्ष पाहूनच ठरवावं.

**म्हातारा** : संशय ? कसला संशय ?

**प्रेसि.** : प्रत्यक्षातही ते तुम्हीच निघालात तर !

**म्हातारा** : का ? काय झालं ? विरंगुळा म्हणून कबुतरांना दाणे घालणं या देशात निषिद्ध आहे का ?

**प्रेसि.** : दाणे घालणं अजून तरी नाही, पण हे करण्यापेक्षाही इतर जे काही करीत आहात...

**म्हातारा** : इतर कोणत्या गोष्टी ?

**प्रेसि.** : त्या निषिद्ध करण्यात आल्यावरच तुम्हाला कळतील. तीच भाषा तुम्हाला पटकन समजेल !
मी पण तुमच्याशी काय भलतंच बोलत होतो ! वास्तविक माझ्या निवडीच्या दिवसानंतर आणि...

**म्हातारा** : माझ्या पद्धतशीर हकालपट्टीच्या दिवसानंतर आपण दोघे प्रथमच भेटतो आहोत असंच ना ? काय विलक्षण योगायोग होता तो !

**प्रेसि.** : विलक्षणच ! माझ्याकडून मी खूप प्रयत्न करतो आहे की, आपल्या धोरणांच्या-नियमांच्या आधारे राज्य चालविण्याचा !

**म्हातारा** : ( स्वगत ) अरे व्वा ! मग मला का उडवण्यात आलं ? ( उघड ) तुमचे प्रयत्न नक्कीच यशस्वी होतील !
( दाणे घालणं सुरू. )

**प्रेसि.** : अं हं ! होतील नाहीत, व्हायलाच पाहिजेत.

**म्हातारा** : हो, नाही तर तुम्हालाही इथे दाणे घालण्याचा विरंगुळा पत्करावा लागेल; असंच ना ? माझी हरकत नाही. कबूतरांची असली तरी हरकत नाही. शिवाय इथे एक्स्ट्रा प्लेट्स् आहेतच. मी म्हणतो, तुम्ही आत्तासुद्धा मधूनमधून येत चला इथे, म्हणजे पुढे सवय नसल्याचा त्रास होणार नाही. माझा अनुभव म्हणून सांगतो तुम्हाला.

**प्रेसि.** : ( संतापून ) स्टॉप इट ! माझी सेशनला जायची वेळ झाली, निघतो मी. पुन्हा एकदा निवांतपणी भेटूच आपण ( जातो ).

**म्हातारा** : निवांतपणी ! म्हणजे हकालपट्टी झाल्यावरच. त्याआधी नाही. पाहिलंत कबूतरांनो ! तुमच्यात असतो का राजा ? जुना राजा, नवा राजा म्हणा. तुमच्यात कशा असणार ह्या आमच्या राजकीय जनावरांच्या गोष्टी ? तुम्ही खरंच भाग्यवान आहात ! तुम्हाला माणसासारखं मन नाही, त्यामुळे व्यवहाराचं त्रांगडं सांभाळायचं काम नाही. ज्याला दाणा मिळतो, तो खातो. नाही मिळत, तो खात नाही. इतकं सर्व साधं आणि सोपं. शिवाय तुम्ही तुमच्या पंखांचे इच्छेचे गुलाम, तुम्हाला वाटेल तेव्हाच उडणार. ऊड म्हटल्यावर उडायचं असं नाही. म्हणून तर तुम्हाला कोणी पिंजऱ्यात ठेवत नाहीत. हो, कारण तुम्ही पोपटपंची करून लोकांची करमणूक करू शकणार नाही ना ? खरंच, तुम्ही खरे मुक्त स्वातंत्र्यपक्षी आहात ! हं, स्वातंत्र्यावरून आठवलं. माझ्या कारकीर्दीत एक लेखक होता. नाही, म्हणजे होऊन गेला. स्वातंत्र्याचा, लेखन-स्वातंत्र्याचा जागतिक पुरस्कर्ता. आमच्या विचारांच्या विरोधी पुस्तकं लिहायचा. पण तसं लिखाण करण्याचं परवानापत्रही त्याच्याकडे नव्हतं, की त्यासाठी तो अर्जही करू इच्छित नव्हता. कारण तो आमची सत्ताच मानत नव्हता. एखादा विचार कोणी मानला नाही, कोणाला पटला नाही तर ते समजू शकतं, पण खुद्द सत्तेच्या अस्तित्वालाच नाकारणं कसं सहन होणार ? म्हणून तातडीनं आम्ही त्याला स्वातंत्र्य देण्याची योजना आखली. म्हणजे मीच सुरू केली ती वेगळी प्रथा. त्याला मी चर्चेसाठी बोलावलं. तो खूष झाला. त्याला हे नवं वाटलं. चर्चेत त्याच्या

पुस्तकावर बोललो, त्याची प्रशंसा केली आणि ( हसू लागतो ) आणि आधी ठरल्याप्रमाणे त्याला मागून...स्वातंत्र्याची, स्वातंत्र्यासाठी गोळी घातली.

हो, त्या विचाऱ्याला आम्ही सन्मानाने स्वातंत्र्य दिलं, अगदी लेखन-स्वातंत्र्याची मनमुराद टर उडवून. मी सुरू केलेली ही पद्धत पुढे चालूच राहिली. सोयिस्कर पद्धती सोयिस्करपणे जोपासल्याही जातात. कारण त्यामुळेच पक्षाला नको असलेली व्यक्ती देशाला नको असल्याचे कारण देऊन सहज मारता येते.

( स्तब्धता )

असे प्रसंग सावल्यांसारखे मागे रेंगाळत असतात. त्रास देतात म्हणून हा छंद. तुमच्या ' सर्व विसरण्याचा ' हेवा वाटतो. तुम्हाला मारून टाकण्याइतका प्रेमळ हेवा ! असं काय करता ? पळता का असे ? मी तुम्हाला खरंच मारणार नाही. इतका विश्वास नाही का माझ्या वर ? ( तितक्यात एक लहान मुलगी पळत येते. )

**मुलगी :** आजोबा, केवढी केवढी कबूतरं ही ! मी पकडू त्यांना ?

**म्हातारा :** कोण तू ? आणि अशी धावत का आलीस ? त्यामुळे उडली बघ ती. या रे परत, पळू नका. ए बाळ, ये पकडू नकोस हं त्यांना. हवं तर तू पण दाणे घाल.

**मुलगी :** खरंच मी दाणे घालू ? चालेल तुम्हाला ?

**म्हातारा :** ( चालेल या अर्थी मान हलवून, प्लेट, दाणे पुढे करतो. )

**मुलगी :** ( दाणे घालत ) आजोबा, तुम्ही खूप मोठ्ठे आहात ना ?

**म्हातारा :** मी...मी कसला मोठा ? कोणी सांगितलं तुला ? ह्या कबूतरांनी ?

**मुलगी :** हं, म्हणजे तुम्ही आहातच मोठे. ( प्लेट ठेवत ) मला...माझं एक काम कराल ?

**म्हातारा :** कोणतं ?

**मुलगी :** मला तुम्ही संदेश द्याल ?

**म्हातारा :** वेडे ! माझ्याकडे कसला संदेश मागत्येस ? संदेश सत्तेवर असणाऱ्यांकडे मागायचा असतो.

**मुलगी :** नाही. मला संदेश हवा. आत्ताच हवा. द्या की.

**म्हातारा :** देऊ संदेश ? ( लिहितो. )
' जगण्यात स्वातंत्र्य जपा. '

**मुलगी :** म्हणजे ?

**म्हातारा :** म्हणजे काय ते कळायलाही इतकी वर्षं लागली, तुला काय कळणार ? म्हणजे ना, ' कबूतर व्हा... '

**मुलगी :** सर्वांनी कबूतर व्हायचं ? ( खुषीत ) मग किती मज्जा येईल ! शेवटी मिळाला की नाही संदेश ! आजोबा, किती चांगले आहात तुम्ही. आता बाबांना नेऊन दाखवते. ते म्हणत होते, की तुम्ही देणारच नाही. आलेच हं मी.

( धावत जाते. )

**म्हातारा :** कमाल आहे पोरीची.

( इतक्यात एक अधिकारी येतो. )

**अधिकारी :** माजी अध्यक्ष, आपणास अध्यक्षांचा निरोप आहे. आपणास महत्त्वाच्या धोरणांच्या खास चर्चेसाठी बोलावलं आहे.

**म्हातारा :** येतोच मी. ( अधिकारी निघून जातो. ) तुमच्या खोटया निरोपाचा खरा अर्थ समजला मला. गंजलेली हत्यारं जास्त वेळ गंजत ठेवायची नसतात. ती वेळीच मोडीत काढायची असतात. नाही तर... अशा निरोपांची पद्धत मीच सुरू केली. आणि आता तीच माझ्यासाठी ! काय योगायोग आहे ! त्या प्रथेचा पहिला बळी तो लेखकच होता. त्यानंतर तसे अनेक. स्वतःला, पक्षाला नको असलेले, राष्ट्र विघातक असल्याची कारणं सांगून...

ते जाऊ द्या. any how मी मुक्त होतोय. कबूतरांनो, अगदी तुमच्यासारखा. कधीतरी, कोणत्या ना कोणत्या निमित्ताने ही आयुष्यरेषा उसवली जाणारच होती, तर आता ह्या निरोपाने... एवढंच. विश्वास बसत नाही, पण खरंच मी मुक्त होणार का ? माझं मुक्त होणंही माझ्या हातात नसावं !

पण काय रे कबूतरा, ( जवळ जात ) पण तू असा त्या लेखकासारखा कसा दिसायला लागला आहेस ? असा रोखून बघू नकोस रे. मी येतोय तुझ्याबरोबर. तुझ्यासारखं होणार शेवटी माझं.

पण मी असा बडबडतोय काय ? अध्यक्षांनी मला चर्चेला बोलावलंय. राष्ट्रहिताची चर्चा, केवढी मोठी कामगिरी, केवढा मोठा सन्मान. सन्मानाची किंमत एक गोळी, की मी मुक्त होणार. तोपर्यंत वाट बघत बसा. दाणे खात थांबाल ना तुम्ही ?

( म्हातारा जायला वळतो...

गोळयांचा आवाज...

कबूतरे उडून गेल्याचा आवाज...

मग...मग कायमची शांतता...

...पडदा...

■ ■ ■

# लेखक-परिचय

## अतुल ऊर्फ गजानन पेठे

महाविद्यालयीन शिक्षण चालू आहे.
नुकतेच एकांकिका लेखन चालू केले आहे.
'चेस' एकांकिकेला लेखनाचे 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धेत (१९८३) पारितोषिक.

प्रयोगासाठी संपर्क :
अतुल ऊर्फ गजानन पेठे
'श्रीवीर' ए/२०
विनीत सोसायटी
कोथरूड, पुणे ४११०२९

# चेस

## अतुल पेठे

( पडदा वर जातो, तेव्हा स्टेजवर चाळीशीचा गृहस्थ आरामखुर्चीत वाचत बसलाय. हातात जाड पुस्तक. मागे रॅक्सही अशाच पुस्तकांनी भरलेत. समोर टिपॉयवर चेस आहे. एकंदर बुद्धिवंताचे घर. गृहस्थ प्रो. विद्याधर पाध्ये. बेल वाजते. )

**पाध्ये** : ( मुव्ह करून ) येस् ... येस् ... कम् इन् ...कम् इन् ...डोअर इज ओपन् ...

( एक मुलगा साधारणतः नववीतला आत येतो. हातात वह्या, पुस्तके. )

**पाध्ये** : ( पुस्तकातून नजर न काढता ) हं...नाव ?

**मुलगा** : ( चमकून ) अं ?

**पाध्ये** : नाव ?

**मुलगा** : रोहित !

**पाध्ये** : काय करता आपण ?

**मुलगा** : ( आश्चर्यानं ) सर ... म्हणजे ... मी नववीत ...

**पाध्ये** : ( हसत ) ओहो ... तो नाही का ? सॉरी ... माझ्या क्लासमधला एकुलता एक हुशार विद्यार्थी ! रोहित !! अरे, तुझ्याकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. बरं, कालचा होमवर्क ?

**रोहित** : झाला सर.

**पाध्ये** : गुड् ... गुड् ... लक्षात ठेव, क्लास सुरू होऊन जरी आठच दिवस झालेले असले, तरी अभ्यास चोख हवा. मला पहिल्यापासून 'नीट ॲन्ड रेग्युलर' स्टडी लागतो. पहिल्या महिन्यात सर्व विषय तयार हवेत आणि दुसऱ्या महिन्यात तोंडपाठ ! मागच्या वर्षी कोणत्या क्लासला जात होतास ?

**रोहित** : कोणत्याही नाही.

**पाध्ये** : नाइस् ... गणितात किती मार्क्स पडले ?

**रोहित** : एकशे अठरा !

**पाध्ये** : ( मुव्ह करून ) हं ... दोन अधिक आठ किती ?

**रोहित** : ( आश्चर्याने ) अं ?

**पाध्ये** : प्रश्न अवघड आहे. नीट विचार करून उत्तर दे. दोन अधिक आठ !

**रोहित** : दहा !

पाध्ये : ( एक प्यादं मारत ) गुड्... गड्... बारा गुणिले तीन !

रोहित : छत्तीस !!

पाध्ये : फॅन्टॅस्टिक !...स्कॉलरबॉय !!
( पुस्तक चाळत ) रशियाची राजधानी ?

रोहित : ( आश्चर्यचकित ) अं ?

पाध्ये : सर्व विषयांचा असा अभ्यास मी आजपासून घेणार आहे. रशियाची राजधानी ?

रोहित : मॉस्को !

पाध्ये : ( प्यादं सरकवत ) बढो; और आगे बढो. शिवरायांचा जन्म १६२८ साली की १६३० ?

रोहित : १६२८ ! पण इतिहासकारांत तूर्त मतभेद आहेत.

पाध्ये : फाइन्...कुसुमाग्रज, केशवकुमार आणि केशवसुत ह्यांची मूळ नावं !

रोहित : कुसुमाग्रज म्हणजे वि. वा. शिरवाडकर...

पाध्ये : गुड् ...

रोहित : केशवकुमार म्हणजे प्र. के. अत्रे ...

पाध्ये : हं ... नेक्स्ट...

रोहित : केशवसुत म्हणजे ... केशव ... केशवसुत ( गोंधळतो )

पाध्ये : कोण !

रोहित : ते ... हे ... म्हणजे केशव ...

पाध्ये : ( उठत एका रॅकपाशी जातात. दुसरे पुस्तक चाळत ) लाज वाटायला हवी. अवघड उत्तरं पटकन दिलीस आणि मराठी मातीशी निगडित असलेली सोपी उत्तरं येत नाहीत ? निदान तुझ्या बापाचं...
( लक्षात येऊन सावरत ) ओह् ... सॉरी ...
हे बघ, तुला सर्व पाठ केलं पाहिजे. केशवसुत म्हणजे कृष्णाजी केशव दामले. तीन वेळा म्हण ( रोहित तसे म्हणतो. ) गुड्...पुन्हा गणिताकडं वळू. बारा निम्मे !

रोहित : ( घाम पुसत ) अं...स...सहा !

पाध्ये : ( आरामखुर्ची डोलवत एक प्यादं मारतात ) अठरा पाव ?

रोहित : अठरा ... न ... नऊ ... चार ... साडेचार !

पाध्ये : वाजले किती ?

रोहित : ( घड्याळात पहात ) स...साडेचार...

पाध्ये : ओह !... मोठा काटा, मध्यम काटा आणि लहान काटा ह्यांत फरक काय ?

रोहित : ( अनपेक्षित प्रश्नांनी गोंधळलेला ) मो ... मोठा काटा ... वाजले

किती दाखवतो ... म ... मध्यम ... किती मिनिटं ... छोटा ... सेकंद दाखवतो...

**पाध्ये** : ( प्यादं हातात खेळवत ) नउशे त्रेसष्ठ मधून चारशे तीन घालवले. त्याला नवानं भागून आलेल्या बाकीत सात मिळवले असता येणाऱ्या बाकीचं वर्गमूळ किती ?

**रोहित** : ( पार खल्लास ) प्ली ... प्लीज ... पुन्हा सांगता ?
( पाध्ये 'ते' गणित पुन्हा सांगतात. रोहित असफलपणे 'नउशे त्रेसष्ठ', 'चारशे तीन' करत राहतो )

**पाध्ये** : ( चिडलेले परंतु निकरानं शांत होत. )
इंडोनेशियाची राजधानी ?

**रोहित** : ( घाबरून ) इंडानिया !

**पाध्ये** : (चमकून) इंडानिया ?... गुड् ... व्हेरी गुड् ... हा क्लास प्रोफेसर विद्याधर पाध्यांचा आहे. 'इंडिया–पाकिस्तान वॉर' कशामुळं झालं !

**रोहित** : सी ... सीमा ...

**पाध्ये** : ( हातात छडी खेळवत )
काडेपेटीत काड्या तीन, तीनातल्या दोन काढून आठ ठेवल्या, त्यातल्या चार काड्यांना बारा काड्यांनी गुणले, उरलेल्या उत्तराला साडेबारा काड्यांनी भागले असता येणारी बाकी किती ?

**रोहित** : ( स्तब्ध. मान खाली घातलीय. )

**पाध्ये** : ( सट्‌कन छडी मारतात. रोहित अनपेक्षित फटक्यानं विव्हळतो. )
हुशार विद्यार्थी !! गणितात एकशे अठरा मार्कस्‌ ! ! शिर्षासन येतं ?

**रोहित** : स ... र ... पण ... प्लीज ...

**पाध्ये** : ओबे द ऑर्डर; नो ॲरग्युमेन्ट्स...( नजर देत. )
( रोहित तसे करतो. )
रडतोय ! साधी साधी उत्तरं येत नाहीत ... शिस्तीच्या बाबतीत मी फार कडक आहे. तुझं गणित सुधारावं म्हणून मी शिकस्त करीन... एकोणतीसचा पाढा म्हण. ( रोहित कसाबसा पाचपर्यंत येतो. )
गो ... गो ... अहेड् ... रडून प्रॉब्लेम्स सुटणार आहेत ?
चेसवर चौकटी किती ?

**रोहित** : ( रडत ) चौसष्ठ !

**पाध्ये** : सिनेसृष्टीचा पहिला बोलपट कोणता ?

**रोहित** : आलमपारा !

**पाध्ये** : (तोच धागा पकडत) पारा नाही, आरा ! त्याचा एडिटर कोण होता ?
( रोहित कोसळतो, पाध्ये त्याला नजरेत घेत. )

लक्षात ठेव. शिस्तीच्या बाबतीत मी फार कडक आहे. दोन्ही हात मांडयांखालून घेऊन कान धर...ऊठ ( रोहित कान पकडतो. ) चालायला लाग ... बोल ... भारतात गुलाब किती प्रकारचे ?

रोहित : ( मुसमुसत ) एकशे ... चा ... चार ...

पाध्ये : ( जोरात टप्पल मारत ) तुझ्या बापानं तरी लागवड केली होती का ?

रोहित : प ... प ... पाणी ... प्लीज ...

पाध्ये : पाणी ?... छे ... ( पाण्याचा जग समोर ठेवतात. ) संपव ... ( तो हात मागे घेतो. ) हे सर्व पाणी संपलं पाहिजे ... कुठल्या मिश्रणांचं पाणी बनतं ? त्यात ऑक्सिजन किती पर्सेन्ट ?
( रोहित जग खाली ठेवतो. )
माजलाय ... पाणी फेकतोय ... भारतात जलविद्युत केन्द्रं किती ?
( रोहित निश्चेष्ट. पाध्ये सिगारेट पेटवतात. ) पॉन टू किंग ॲन्ड चेक ?
( पाध्ये रोहितजवळ सरकतायत. अंधार. अंधारात रोहितचा आक्रोश. )
( प्रकाश येईल तेव्हा तोच देखावा. स्टेजवर कुणीही नाही, अस्ताव्यस्त पुस्तके पडली आहेत. पाध्ये मरगळलेल्या अवस्थेत येतात. खुर्चीत बसतात. बेल वाजते. )

पाध्ये : डोअर इज ओपन ...
( दारातून एक स्त्री येते. )

स्त्री : आपण प्रोफेसर विद्याधर पाध्ये ?
( पाध्ये मान डोलवतात. )
गणितज्ञ प्रोफेसर विद्याधर पाध्ये ?

पाध्ये : हं !

स्त्री : मला क्लासला यायचंय तुमच्या !
( पाध्ये गर्रकन वळतात. )

पाध्ये : का ऽऽ य ?

स्त्री : मला क्लास लावायचाय, माझं नाव अनिता ... श्रीमती अनिता ... आडनावाची निदान तुम्हाला तरी गरज नाही ...

पाध्ये : तुम्हाला आणि क्लास ?

अनिता : हो.

पाध्ये : शक्य नाही.

अनिता : का ?

पाध्ये : माझ्या मर्यादेबाहेर आहे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
क्र. 29360 नों. दि. ...
वि. ... ना. ...

**अनिता** : तुमच्या मर्यादेच्या आत यायचा मी प्रयत्न करीन.

**पाध्ये** : हे पाहा, प्लीज गेट् आऊट ...

**अनिता** : थँक्यू ... मी निश्चित जाईन पण उत्तर घेऊन !

**पाध्ये** : कसलं उत्तर ?

**अनिता** : ह्या तुमच्या मर्यादांचं! मर्यादांच्या आत येणाऱ्या तुमच्या सावजांचं !

**पाध्ये** : मी समजलो नाही...

**अनिता** : मीही समजावून घेण्याचा आणि देण्याचा प्रयत्न करीन. मी तुम्हाला उत्तर देईन पण त्या आधी मला उत्तर द्याल ?

**पाध्ये** : प्रयत्न करीन.

**अनिता** : काल रोहितला का मारहाण केलीत ?

**पाध्ये** : रोहित ?

**अनिता** : इयत्ता नववीतला ! माझा मुलगा !!

**पाध्ये** : व्हॉट ? ?

**अनिता** : काल संध्याकाळी क्लासला तो आला होता. आठवाच दिवस होता... त्याचाही नी तुमचाही ! अॅम आय राइट ?

**पाध्ये** : पण ...

**अनिता** : ( आवाजात विलक्षण जरब ) मला फीचे पैसे परत द्या.

**पाध्ये** : तुम्ही प ... पण...

**अनिता** : फीचे पैसे परत द्या !

**पाध्ये** : सी ... आय एम रिटायर्ड पर्सन.

**अनिता** : यु आर नॉट रिटायर्ड बट डिसमिस्ड फ्रॉम द कॉलेज. अॅम आय राइट ?

**पाध्ये** : ओह ... नो...

**अनिता** : हे असत्य आहे ?

**पाध्ये** : पूर्ण !! म्हणजे मीच राजीनामा दिला.

**अनिता** : अच्छा ! अजूनही ती घमेंड गेलेली दिसत नाही. प्रुफ सापडलं नाही, साक्षीदार उभा राहिला नाही ... नाहीतर त्याच वेळेस आत गेला असतात !

**पाध्ये** : प्लीज ... गो ...

**अनिता** : मला उत्तर हवंय.

**पाध्ये** : ( चिडून ) कसलं ?

**अनिता** : रोहितला काल का मारलं गेलं ?

**पाध्ये** : पण हे पहा ... मी ...

अनिता : त्याला लोटाभर पाणी प्यायला लावलंत ... का ?

पाध्ये : त्याला तहान ...

अनिता : त्याच्या कोवळया भागांवर सिगारेटचे चटके दिलेत ! ... का ?

पाध्ये : ( डोकं धरून उठतात ) ओ ... नो ... हे खोटं आहे.

अनिता : जळकी कातडी प्रुफ आहे.

पाध्ये : आय से, गेट आऊट.

अनिता : फीचे पैसे परत द्या.

पाध्ये : पैसे परत मिळू शकत नाहीत.

अनिता : उत्तर !

पाध्ये : शक्य नाही.

अनिता : का ? तुमच्या मर्यादा मी तोडतेय ? मला उत्तर मिळणार नसेल तर ते काढून घ्यावं लागेल.

पाध्ये : आपण मला धमकी दाखवता ?

अनिता : अर्थात् ! मी तुम्हाला जाबच विचारते आहे. माणसाची प्रवृत्ती आपण बदलू शकत नाही ...

पाध्ये : दॅट्स राइट !

अनिता : तरीसुद्धा प्रवृत्तीला शरण न जाता मी विरुद्ध उभी राहिले. मला उत्तर द्या.

पाध्ये : हे ... हे पहा, रोहितनं माझ्या प्रश्नांची उत्तरं नीट दिली नव्हती.

अनिता : कसली उत्तरं ? काडेपेटीत काडया तीन, दोन काढून आठ ठेवल्या, त्यातल्या पहिल्या नऊ काडयांना साडेतीन काडयांनी भागले असता येणाऱ्या बाकीला पावणेचार काडयांनी ...

पाध्ये : ओह् !... स्टॉप इट ...

अनिता : आलम आराचा एडिटर कोण !

पाध्ये : गेट् आऊट.

अनिता : 'इंडिया – पाक वॉर' कुठल्या तत्त्वांवर सुरू झालं !

पाध्ये : प्लीज ... ( असहाय्यपणे खिडकीजवळ जातात. )

अनिता : द्या, उत्तरं द्या सोप्या प्रश्नांची ! ह्या 'सोप्या' प्रश्नांवर शिक्षा काय ? ...वेतानं झोडपणं, पायांमधून हात घालून कान धरणं, जगभर पाणी प्यायला लावणं, सिगारेटचे चटके कोवळया भागांवर देणं ... न जमणाऱ्या उत्तरांवर हा उपाय ? स्वतःच्या पशुत्वाची तहान भागवण्यासाठी एक सोपी रीत ? जवळपासच्या काळयापांढऱ्या चौकटीत येताच शह देण्याची निगरगट्ट मुव्ह ? वजीर आणि प्याद्यांचं चेसिंग ?... तुम्ही भ्याड आहात.

**पाध्ये** : ( खिडकीतून दूरवर पहात ) ऐका तो ध्वनी ! लांबून येणाऱ्या काही वेताल सुरांची सुरावट ! तुमचे मार्ग खुले होतील ! उत्तरांची बाकी मिळेल ! ते जुने सूर काही नवीन उत्तरं देतील ! प्रयत्न करूया ! ( इथे सुरावट कानी पडते. अंधार. प्रकाशात होस्टेलवरची रूम दर्शनी येते. कडी काढल्याचा आवाज. एक पॉश कपड्यातला तरुण ( अमोल सोनटक्के ) येतो. येताच टेप लावतो. बंद करतो. अस्वस्थपणे खुर्चीत अंग टाकतो. विद्याधर पाध्ये येतो. शर्ट काढून हँगरला लावतो. )

**अमोल** : आलास ?

**विद्याधर** : हं !

**अमोल** : विचारून आत आला नाहीस ?

**विद्याधर** : ( चमकून ) म्हणजे ?

**अमोल** : ह्या रूमचा तसा कायदा आहे.

**विद्याधर** : ( हसत ) ओह ... सॉरी !

**अमोल** : तुझ्या बापाची मनीऑर्डर आलीय.

**विद्याधर** : तुझ्याकडे कशी ?

**अमोल** : मीच सही करून घेतली ! फक्त तीनशेच ?

**विद्याधर** : अमोल ?

**अमोल** : च्यायला, सॉरी हं ! भारत – पाक लढ्यात जायबंदी झालेल्या एका वीर जवानाला पेन्शन असं कितीसं असणार !

**विद्याधर** : शट् अप !

**अमोल** : वाऽव् ! ते रक्त तुझ्यातही आहे तर ! वीरश्रीपूर्ण...युयुत्सु...इतक्या दिवसांनंतर आज कळलं ...

**विद्याधर** : मला वाटतं इथंच थांबलेलं बरं !

**अमोल** : ओह ! ... यस्...वर्षाच्या सुरवातीलाच वादविवाद नकोत...त्यातून तू नवीन रूम-पार्टनर ... बाकी कसं काय ?

**विद्याधर** : उत्तम !

**अमोल** : पत्रात लिहिलंय तसं वागा.

**विद्याधर** : म्हणजे तू पत्र वाचलंस ?

**अमोल** : ' रोज रात्री दूध – केळं घे. सकाळी उठल्यावर गणपती अथर्वशीर्ष म्हण. काहीही झालं तरी भारतीय संस्कृती होस्टेलवर राहूनही सुटता कामा नये ' ( हसतो ) ग्रेट, च्यायला ! एकुलत्या एक मुलावर प्रेमाचा धबधबा !

**विद्याधर** : (सोशिकपणे, विषय बदलत.) आज मॅथ्सच्या पीरिअडला तू नव्हतास?

अमोल : कालही नव्हतो आणि नसणारही. बोअर होतो. तो तुमच्यासारख्या स्कॉलरांचा विषय, आम्ही मठ्ठ !!

विद्याधर : विचारण्याचा हेतू तसा नव्हता अमोल. हे बघ, अजूनही चिक्कार वेळ आहे. मी...मी तुला मॅथ्स शिकवीन.

अमोल : कोण ? तू ?

विद्याधर : हो ... म्हणजे ...

अमोल : ( तिरसटपणे ) स्वतःला शहाणा मानायला लागलास की काय ! आहे ती हुशारी स्वतःजवळ ठेव. तुला काय वाटलं दोन वर्षांनी मी मोठा असून ...

विद्याधर : शब्दाचा विपर्यास करण्याची तुला सवयच आहे का ?

अमोल : हे तत्त्वज्ञानही तुझ्याच खिशात ठेव. भाडखाव, साला.

विद्याधर : शिवी ?

अमोल : स्वतःला काय सानेगुरुजींचा बच्चा समजतोस काय ?

विद्याधर : हा वादविवाद बास !

अमोल : ( शांत, पुन्हा एकेरीवर येत ) येताना मला विचारून आत का आला नाहीस ?

विद्याधर : हे काय चाललंय तुझं, अमोल ?

अमोल : अमोल गेला भोसडयात !

विद्याधर : खोली जशी तुझी तशीच माझी देखील आहे, मिस्टर अमोल सोनटक्के !

अमोल : ओह ... आय सी ... म्हणजे माझ्याशी खुन्नस घेतोयस ?

विद्याधर : गेले आठ दिवस पाहतोय तुझं डोकं सरकलंय. सतत माझ्यावर उखडतोस. बोलायचं असेल तर नीट बोल. शीः ! डोकं भणभणायला लागलं. ( शर्ट चढवतो. )

अमोल : कुठं निघालास ?

विद्याधर : प्रत्येक गोष्ट तुला सांगितलीच पाहिजे ?
( विद्याधर ताडकन निघून जातो. अमोल अस्वस्थ. काहीतरी विचाराने हसतो. )

अमोल : क्लॅश ! ( Clash ! )
( अंधार. प्रकाशात विद्याधर अभ्यास करताना दिसतो. शेजारी दुधाचा कप. अमोल आत येतो. धाप लागलेली. )

अमोल : माय ... माय गॉड ...

विद्याधर : काय रे, काय झालं ?

अमोल : बियाँड द एक्स्पेक्टेशन ...

विद्याधर काय झालं तरी काय ?
अमोल प...पाणी ( विद्याधर पाणी देतो. ) सिगारेट...(देतो) काडेपेटी... ( देतो. अमोल सिगारेट पेटवतो. उत्सुकता शिगेला पोहोचलेली )
विद्याधर काय झालं ?
अमोल तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती. हे जर का प्रिन्सिपलना कळलं ना, तर ते तुला रस्टिकेट करतील ... माय गॉड ...
विद्याधर ( चमकून ) म्हणजे ? झालं काय ?
अमोल लाज वाटली पाहिजे असं विचारायला. हे तुझ्या जायबंदी नौजवान परमपूज्य प्रेमळ वडलांना कळलं तर ... ते प्राण सोडतील.
विद्याधर स्टॉप इट. काय झालं ?
अमोल : निदान तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती. ती बातमी कळली तर कॉलेज एका क्षणात पेटेल.
विद्याधर : म्हणजे ?... अरे, झालं काय ?
अमोल : तू ... तू ... प्रदीप लिमयेला खुनाची धमकी दिलीस ?
विद्याधर : व्हॉ ... ट ??
अमोल : होय, प्रदीप लिमयेला खुनाची धमकी !! तुझी चिठ्ठी त्यानंच मला दाखवली.
विद्याधर : हे खोटं आहे.
अमोल : जा सगळयांना ओरडून सांग... त्यांना जर कळलं तर ते तुझा खिमा करतील साल्या. मुलं प्रदीपवर जास्त विश्वास ठेवतील.
विद्याधर : खोटं आहे. मी बंड करून उठेन.
अमोल : ह्या युद्धात तुझे प्रेमळ वडील पूर्ण जायबंदी होतील. कॉलेज तुझ्या-विरुद्ध असेल, तुला रस्टिकेट करण्यात येईल, तुझी दशादशा होईल ... फक्त सगळयांना कळायचा अवकाश !
विद्याधर : हे ... हे थोतांड आहे. कुणाचं तरी कारस्थान !
अमोल : हे खरं असेल ... नसेल. त्याच्याशी मला घेणं नाही ... ते तुला मारतील ... जिवानिशी झोडपतील.
विद्याधर का ऽऽ य ? अमोल मी...
अमोल : शट् अप्. खरं काय आहे ते मी ठरवलंय केव्हाच !
विद्याधर : मी काय करू ?
अमोल : काय वाट्टल ते. तू तुझा 'मुखत्यार' आहेस. गणितातला स्कॉलर तू...ह्या साऱ्या खेळाची गणितंही पटापट सोडवशील ...
विद्याधर : ओह ... नो ... हे कारस्थान आहे. त्याचा मी बळी ... कुणीतरी स्वतःच्या स्वार्थासाठी माझं प्यादं मारण्याचा प्रयत्न करतोय...

अमोल : तुझ्या अक्षरातली चिठ्ठी प्रुफ आहे.

विद्याधर : ( हताश ) ओह ... गॉड ...

अमोल : मी प्रदीपला वगैरे बोलल्लो म्हणून तरी ते शांत आहेत, नाहीतर... जरा कॉफी कर ( विद्याधर कॉफी करतोय ) त्याचे मित्र फार भयाण आहेत. पोत्यात कोंबून मारहाण करतील, टायर मधे घालून बदडतील ... गण्ू तर नखंसुद्धा उपसून काढेल !

विद्याधर : माय गॉड ... पण अमोल मी खरंच सांगतो, मी तशी चिठ्ठी लिहिलेली नाही ...

अमोल : साखर प्रमाणात घाल ...

विद्याधर : तू विश्वास का ठेवत नाहीस ?

अमोल : च्यायला, कपात नको ... मगात आण ...
( विद्याधर कॉफी देतो. तसाच उभा ) बस, उभा का ?
( विद्याधर बसतो )
बाय द वे, तू मला गणित कधीपासून शिकवायला लागतोस? आत्ता बसायचं ?

विद्याधर : नको, आत्ता नको.

अमोल : का ?

विद्याधर : मूड नाही.

अमोल : मूड नाही की तुलाच येत नाही ?

विद्याधर : म्हणजे ?

अमोल : पोकळ गणितज्ञ तू! १२६३ च्या पाव दीडं किती ?

विद्याधर : काय ?

अमोल : काही नाही. तुला येणारच नाही. तू पोकळ. एक अधिक एक ... ?

विद्याधर : दोन !

अमोल : ग्रेट हं !...दोन अधिक दोन ?

विद्याधर : चार !

अमोल : तीन पाणी अधिक तीन पाणी ?

विद्याधर : स...पाणी ?

अमोल : किती पाणी ?...पोकळ लेकाचा ! गणिताचा बुड्यामास्तर ! साधी उत्तरं येत नाहीत...शेंबडा मुलगा सुद्धा चांगली उत्तरं देईल...

विद्याधर : अमोल...

अमोल : आभाळाचा रंग निळा मग पानांचा रंग हिरवा का ?

विद्याधर : अं ?

अमोल : तुझ्या वडिलांनी शत्रूला मारलं तर ते 'जवान.' मग मी तुला मारलं तर मी कोण ?

विद्याधर : तू ... ?

अमोल : त्याच परमपूज्य वडिलांच्या मुलानं धमकी दिली खुनाची तर तो कोण ?

विद्याधर : मी ?...

अमोल : गणितज्ञ ?

विद्याधर : प्लीज अमोल शांत ...

अमोल : शांतता म्हणजे काय ?

विद्याधर : जिथे आवाज नाही ते ...

अमोल : ओह ... शांतता !
( शांत बसतो. विद्याधर उठतो. खुर्चीचा आवाज. )
शांतता भंग ! खुर्चीचा आवाज !!
( विद्याधर कपाळावर हात मारतो. )
शांतता भंग ... कपाळावर हात !!
( विद्याधर असहाय्यपणे धुसफुस करतोय. )
शांतता भंग ... हृदयाची फुसफुस !!
बाय द वे ... आपलं हृदय कुठल्या बाजूला असतं ?

विद्याधर : मला माहीत नाही.

अमोल : गणितज्ञ फुका !! साधं येत नाही !! एक निम्मं आठ हे इ=एम्-सी वर्गच्या सहाय्यानं सिद्ध करून दाखवतोस ?

विद्याधर : गेट आऊट प्लीज...किंवा...किंवा मीच...

अमोल : ओह नो ... मीच जातो... ( जाता जाता ) पण लक्षात ठेव, पाऊल बाहेर टाकलंस तर गणू नखं उपसून काढेल ... भडवा, गणित शिकवणार आहे मला !! ( निघून जातो. विद्याधर चक्रावून जातो. )

विद्याधर : मी ... मी ... फुका गणितज्ञ ?? ... शेंबडथा पोराला येतात ती उत्तरं ... मला ??... मी खुनाची धमकी दिली ??... माझे वडील खुनी ... ओ ... ओह ...गॉड ... स्टॉप इट ! ( डोकं धरतो. )
( प्रकाशात विद्याधर पुन्हा वाचत बसलेला. अमोल येतो.
अंधार. अस्वस्थ )

अमोल : ए ... कॉफी कर ...

विद्याधर : पण कॉ ... कॉफी ...

अमोल : कॉफी !!

विद्याधर : कॉफी संपलीय ...

अमोल : च्या मायला, आणता येत नव्हती ? जायबंदी बापाची मनीऑर्डर आलीय ना ?

विद्याधर : अमोल ...

अमोल : सॉरी, त्या पैशात कॉफी येणार नाही ! हे घे ...
( पन्नासची नोट अंगावर फेकतो. )
ॲश ट्रे ...

विद्याधर : टेबलावर ...

अमोल : आत्ताच गण्या भेटला होता ...
( आपोआप ॲश ट्रे देतो )
माझे कपडे उद्या धुऊन इस्त्री केलेले दिसले पाहिजेत.

विद्याधर : ही चक्क बळजबरी आहे.

अमोल : ( थाडकन् उठत ) रग...रग आहे अजून अंगात. पुन्हा रक्त तापतंय. वडलांना कळलं तर ...

विद्याधर : काय व्हायचं ते होऊ दे पण मी हे सहन ...

अमोल : करणार नाही असंच ना ? ( खिडकीपाशी जातो ) ए, जरा गण्याला बोलव रे ...
( विद्याधर तत्क्षणी थिजून जातो. )

विद्याधर : प्लीज ... अमोल ... गणू ...

अमोल : उसळव ना तुझं रक्त ! लंगड्या जवानाचं पारंपरिक चालत आलेलं ! हुतात्मा करून टाकीन तुला साल्या, मी आहे म्हणून तरी वाचतोयस !
( कडी वाजते. अमोल विद्याधरकडे पहातो. विद्याधर भेदरून हात जोडून कोपऱ्यात. )

विद्याधर : प्लीज ... अमोल ... आय बेग यू...
( अमोल बाहेर जातो )

आवाज : ओह...अच्छा. अरे गण्या उद्या 'पूरब' च्या कट्ट्यावर...अच्छा...
( अमोल आत येतो. )

अमोल : पायाखाली काय आहे ?

विद्याधर : अं ?...ज...जमीन...

अमोल : डोक्यावर ?

विद्याधर : छप्पर...

अमोल : शीर्षासन येतं !

विद्याधर : अं !...न...नाही...

अमोल : शिर्षासन...
( वीद्याधर कसेबसे पाय वर करून राहातो. )

अमोल : पायाखाली ?
विद्याधर : अं ?...म्हणजे...
अमोल : डोक्यावर ?
विद्याधर : ज...ज... ( कोसळतो. )
अमोल : कोसळलास ? हं...ह्या पोकळ गणितज्ञाच्या अंगात कितीसा दम असणार म्हणा ! बस...
( विद्याधर बसतो. )
अमोल : गुरुत्वाकर्षणाचा नियम जर लावला तर तांदुळाचा भात होतो कसा ?
विद्याधर : काऽऽय ?
अमोल : ' क्युरिअस क्रिअेचर्स ' चा राइटर कोण ?
विद्याधर : अ...प...प...पण...
अमोल : येणारच नाही तुला. तुला फक्त १+१ येणार ! एक कांदा अधिक एक बटाटा किती ?
विद्याधर : ( स्वतःवर चिडून ) मला येत नाही !
अमोल : म्हणजे तू कोण ?
विद्याधर : माठ ! पोकळ वासा ! ! फुका गणितज्ञ !बुडया मास्तर ! ! !
अमोल : पाय धर आणि क्षमा माग...
( अंधार. विद्याधर पांघरूण घेऊन झोपलेला. अमोल आत येतो. )
अमोल : ( त्याला हलवत ) विद्याधर...
विद्याधर : ( दचकून ) काऽऽय ?
अमोल : नालायक, झोपलास काय ?
विद्याधर : मला बरं नाहीये.
अमोल : काय झालं, बरं नसायला ?
विद्याधर : डोकं प्रचंड दुखतंय !
अमोल : खोटं ! परत खोटं ? ह्या जवानांच्या रक्तात हा गुणच आहे ! आज परीक्षेला तू लवकर उठलास ?
विद्याधर : मला गणितं आली नाहीत.
अमोल : आज येताना एका मुलीला धक्का दिलास आणि नंतर शिवीही दिलीस ?
विद्याधर : ( मटकन बसत ) काऽऽय ?
अमोल : तुझ्यासारख्या बुद्धिवान, चांगल्या संस्काराच्या, सद्‌गुणी मुलाकडून...
विद्याधर : ( उसळत ) मी...मी नालायक आहे... सडक्या मेंदूचा आहे...
अमोल : तुझ्या वडलांचा काही विचार...
विद्याधर : माझे वडील खुनी...

**अमोल :** तुला फारच बरं नाहीये ? औषध सुचवू ?... कागद खा... हा घे ... ( कागद पुढे करतो. विद्याधर कागद घेतो. )

**विद्याधर :** मी नालायक !! सडक्या मेंदूचा !! खुनी बापाचा मुलगा !! मी खुनाची धमकी दिली, मी मुलीला शिवी दिली, मी साधी उत्तरं दिली नाहीत, मी कागद औषध म्हणून खायचा ? ...यू बास्टर्ड... ( विद्याधर अमोलच्या अंगावर धावून जातो. फ्रीज. अंधार. प्रकाशात विद्याधर पाध्ये खिडकीपाशी उभे. )

**पाध्ये :** ऐकलीत त्या फाटक्या नगाऱ्यावरची टिपरी ? ऐकलंत ते बेसुरी गाणं ? तो हिंस्रपणा मला अजूनही ठळक दिसतोय, पण केवळ संयमानं मी त्याला दूर ठेवतो. ( अनिता हसते ) का ? हसलात का ?

**अनिता :** हा शेवटचा शब्द मला कळला नाही. ' संयम. '

**पाध्ये :** होय, खरं आहे ते. नाहीतर माझा केव्हाच अमोल सोनटक्के झाला असता किंवा एक भित्रा गुलाम...पण...पण मी झालो प्रोफसर... गणिताचा प्रोफेसर ... त्याही परिस्थितीशी टक्कर देत मी शिकलो ... मुलांना हुशार बनवण्याचा प्रयत्न करू लागलो ...

**अनिता :** अमोलसारखा ?

**पाध्ये :** ओह ... नो ... नेव्हर ... अमोल वॉज बास्टर्ड पर्सन ... मी तसा नव्हतो ... आहे त्या संकटाला ... म्हणजे अमोल संकट कधीच वाटत नव्हता ... पण ... पण मी तसा नव्हतो ... नाहीही ... मी गणिताचा प्रोफेसर ... धीरानं तोंड दिलं मी ... म्हणजे मी भित्रा होतो असंही तुम्हाला वाटेल ... पण मी ... शेवटी त्यालाही हाणलाच ... मला धमकी देत होता ... तो गणू काय, खुनाची धमकी नी मुलीला शिवी ... सारी बास्टर्ड कारस्थानं ... त्या क्षणी ... मी भ्यायलोही असेन, पण शेवटी मी ... मी त्याला हाणलाच ...

**अनिता :** मग हा विजय त्याचा की तुमचा ?

**पाध्ये :** ( गोंधळत, सावरत ) हा ... हा विजय ...विजय ... पण असल्या माणसाला असलंच पाहिजे ... मला ... मला पाणी द्यायला सांगितलं, सिगारेट, काडेपेटी ... ओह .. ते ... ॲश ट्रे ... मला घाणेरडे प्रश्न विचारले ... मला कागद खायला दिला ... हे सर्व धमकी दाखवून ... होय मी तसं केलंही असेल, पण तुम्हाला काय माहीत की नवं उपसणं म्हणजे काय असतं ते, त्यांनी पोत्यात कोंबून मारलं असतं ... पण त्या वेळेस ... मी ... मी ते सोसलं...

पण शेवटी मी ... खऱ्याचाच विजय झाला ... पण तुम्ही हे का विचारताय ?

**अनिता :** कारण मी रोहितची आई आहे ...

**पाध्ये :** आई ... आई असालसुद्धा ... त्याचा इथे संबंध काय ... तो बास्टर्ड मला ... माझ्या बापावरून मला बोलायचा ... शत्रूंना मारणारे माझे वडील खुनी होते ... मी खरा असून खोट्या धमकीनं खुनी होतो. अमोल मला गणूची धमकी द्यायचा, म्हणजे अमोल, गणू खुनी ... माझं डोकं खुनी झालं ... साधी उत्तरं आली नाहीत म्हणून मी पेपर कोरा टाकला ... पण तरी मी प्रोफेसर ... आणि आताही तुम्ही मला प्रश्न विचारून ... ( ओरडून ) गो ... गेट आऊट. मला विचारताय प्रश्न ... तुम्हाला काय वाटलं ... माझी उत्तरं ... १२६३ च्या पाव दीडं कितीचं उत्तरं येतं ? ... गेट आऊट ... आय विल थ्रो यू ...

**अनिता :** मी परिस्थितीला शरण जाण्यासाठी आलेले नाही. माझंही नाव श्रीमती अनिता अमोल सोनटक्के आहे ...

**पाध्ये :** काऽऽऽय ? ... अनिता ... अमोल ... सोनटक्के. बास्टर्ड ... अनिता ... अमोल ...

( आरामखुर्चीत बसून भ्रमिष्टासारखं काड्यांचं गणित पुटपुटू लागतात. अनिता चेसजवळ येते. )

**अनिता :** पहिल्याच मुव्हला मेट ?

( चेस उधळवते. खिडकीजवळ उभी. मागून काड्यांचं गणित अखंडपणे चालू आणि — )

■ ■ ■

IRBK-0121360

म. ग्रं. सं. ठाणे. ...
क्र. 29380 ... 6.1.41.46
दि. ...... 31.12.03 ...